# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.०७/२०१९** **दिनांक २१.०८.२०१९**

**स्थळ- साईनिवास अतिथीगृह, शिर्डी** **वेळ- दुपारी ०२.०० वाजता**

श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सर्वसाधारण सभा बुधवार दि.२१.०८.२०१९ रोजी शिर्डी येथील संस्थानचे साईनिवास अतिथीगृहामध्ये दुपारी ०२.०० वाजता आयोजित करणेत आली असलेबाबत जा.नं.एसएसएस/वशी-०४/१८४०/२०१९, दि.१३.०८.२०१९ अन्वये सर्व मा.सदस्यांना कळविणेत आलेले होते. त्यानुसार बुधवार दि.२१.०८.२०१९ रोजी दुपारी ०२.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहामध्ये मा.श्री.सुरेश काशिनाथ हावरे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

०१. मा.श्री.सुरेश काशिनाथ हावरे,अध्यक्ष ०२. मा.श्रीमती अर्चना उत्तमराव कोते, सदस्या

मा.श्री.दी.म.मुगळीकर,भा.प्र.से.
मुख्य कार्यकारी अधिकारी

सभेच्या सुरुवातीस श्री साईबाबांची प्रार्थना करणेत आली.

सदरहू सभेस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकत नसलेबाबत, समिती सदस्य मा.डॉ.राजेंद्र राजाबाली सिंह यांनी ई-मेलव्दारे तर मा.श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे यांनी दि.२०.०८.२०१९ रोजीचे पत्रान्वये कळविले होते, तसेच समिती सदस्य मा.ॲड मोहन मोतीराम जयकर व मा.श्री.बिपीनदादा शंकरराव कोल्हे यांनी दुरध्वनीव्दारे कळविले होते, याची समितीने नोंद घेऊन त्यांना अनुपस्थित राहण्याची अनुमती दिली.

सभेस आवश्यक गणपुर्ती नसल्यामुळे विधी व न्याय विभागाकडील दि.१३ जुलै, २०१७ रोजीचे अधिनियम दुरुस्तीतील कलम ३ (क) पोटकलम (२) मधील तरतूदीनुसार तीस मिनीटाकरीता सभेचे कामकाज तहकुब करणेत येऊन, त्यानंतर दुपारी ०२.३० वाजता सभेचे कामकाज सुरु करण्यात आले.

त्यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांनी विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु केली.

---

**विषय नं.०१** **दिनांक २६.०७.२०१९ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.४३९** **दिनांक २६.०७.२०१९ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करतांना खालील प्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या व त्यास मान्यता देण्यात आली.**

१. निर्णय क्र.३८४- यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी शहरातील अहमदनगर - मनमाड महामार्गावरील गेट नं.०१ जवळ स्कायवॉक (पादचारी पुल) 'डिझाईन व बिल्ड' तत्वावर उभारणेकामी प्राप्त ई-निविदा रद्द करुन ठेकेदार आर.एल.भुतडा, कोपरगाव यांची अनामत रक्कम रु.५१,५००/- परत करण्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-बांधकाम विभाग)

**याऐवजी खालील प्रमाणे वाचण्यात यावे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी शहरातील अहमदनगर - मनमाड महामार्गावरील गेट नं.०१ जवळ स्कायवॉक (पादचारी पुल) 'डिझाईन व बिल्ड' तत्वावर उभारणेकामी प्राप्त ई-निविदा रद्द करुन ठेकेदार आर.एल.भुतडा, कोपरगाव यांची अनामत रक्कम परत करण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.०२** **मालमत्ता विभागाकडील कंत्राटी सल्लागार श्री.कृष्णा विश्वनाथ वालझाडे (सेवानिवृत्त नायब तहसिलदार) यांचे मुदतवाढीबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियमातील तरतूद– श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ चे कलम १७(२)(झ) सर्वसाधारणपणे विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन,देखभाल व प्रशासन करण्याच्याप्रयोजनासाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील,अशी तरतुद आहे.

प्रस्तावना- संस्थानकडील चल-अचल मालमत्तेसाठी स्वतंत्र मालमत्ता विभाग (Estate Department) निर्माण करणेबाबतचा प्रस्ताव विधी विभागामार्फत मा.त्रिसदस्य समितीचे सभेपुढे सादर करण्यात आलेला होता. त्यावर मा.त्रिसदस्य समितीचे दि.०६/११/२०१४ रोजी झालेल्या सभेतील निर्णय क्रं.९८६ नुसार व

आस्थापना विभागाकडील दि.१९/११/२०१४ रोजीच्या आदेशान्वये संस्थान आस्थापनेवर मालमत्ता विभाग नव्याने कार्यान्वित करण्यात आलेला आहे.

मालमत्ता विभागामार्फत खालीलप्रमाणे कामकाज केले जाते.

१) संस्थानचे मिळकत रजिस्टर अद्ययावत ठेवणे.

२) संस्थानसाठी आरक्षित असलेल्या जमीनी खरेदी करणेकामी तसेच आरक्षणा व्यतिरिक्त खाजगी जमीनी खरेदी करणेकामी संस्थानकडे प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी करणे,जागेची पाहणी करणे व उचित कार्यवाही करणे.

३) देणगी स्वरुपात मिळकती स्विकारणेबाबतच्या प्रस्तावांची छाननी करणे,मिळकतीची पाहणी करणे व उचित कार्यवाही करणे.

४) खरेदी केलेल्या मिळकतींच्या व दान स्वरुपात प्राप्त झालेल्या मिळकतींच्या नोंदी महसुल दप्तरी अद्ययावत करुन घेणे.

५) खरेदी घेतलेल्या व दान स्विकारलेल्या मिळकतींची शासकीय मोजणी करुन हद्दी निशाण्या ठरवून घेणे.

६) संस्थान मालकीच्या कृषीक जमीनी आवश्यकतेनुसार अकृषीक करणेकामीचे प्रस्ताव तयार करणे व सक्षम अधिकारी यांचेकडेस सादर करुन उचित कार्यवाही करणे.

७) मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांचेकडील भूसंपादनाबाबतचे प्रकरणी समन्वय साधून उचित कार्यवाही करणे.

८) विविध न्यायालयात सुरु असलेल्या केसेसबाबत आवश्यक ती कार्यवाही करणे.

९) संस्थान मालकीच्या भाडेतत्वावर दिलेल्या अथवा द्यावयाच्या मिळकतींचे करारनामे करुन घेणे.

१०) संस्थानचे मालमत्तेबाबतचे शासकीय कर,नगरपंचायत कर व ग्रामपंचायत कर इ.भरणेबाबत कार्यवाही करणे.

११) संस्थानने भाडेपट्ट्याने घेतलेल्या मिळकतींचे भाडे व स्थानिक कर भरणा करणे.

१२) संस्थानच्या मिळकती भाडेकराराने देणेकामी प्रस्ताव सादर करणे,भाडेकराराने दिलेल्या मिळकतींच्या वापराची मुदत वाढवून देणे व भाडेकरारनामे करुन घेणे.

१३) मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयाप्रमाणे पालखी थांब्यासाठी जागांचा शोध घेणे,जागा उपलब्ध करणे,जागेची निश्चिती करणे व पुढील उचित कार्यवाही करणे.

१४) सर्व राज्यातील मुख्य शहरात संस्थानचे माहीती केंद्र उभारणेकामी जागा उपलब्ध करणे.

१५) वर्षातील उत्सवांचे नियोजनासाठी आवश्यकतेप्रमाणे जमीनी अधिग्रहीत करणेबाबतची कार्यवाही करणे.

१६) महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाकडील जमीनी कायमस्वरुपी खरेदी करणेकामीचे प्रस्ताव व तद्नुषंगाने कार्यवाही करणे.

१७) संस्थानचे स्थावर मालमत्तेबाबत योग्य नियोजन करणे,देखभाल करणे,वेळोवेळी मिळकतींना भेटी देणे व त्याबाबत असलेल्या अडचणी दूर करणे,वरिष्ठांना अहवाल सादर करणे.

सदर कामकाजासाठी सल्लागार म्हणून श्री.कृष्णा विश्वनाथ वालझाडे (सेवानिवृत्त नायब तहसिलदार) यांची कंत्राटी पध्दतीने मासिक रु.१२,०००/- एकत्रित मानधनावर प्रथमत: दि.१९/१०/२०१५ ते दि.१८/१०/२०१६ या एक वर्षाच्या कालावधीसाठी नेमणूक करण्यात आलेली होती.

तदनंतर मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/११/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.७६६ अन्वये त्यांचे नेमणुकीची मुदत दि.१९/१०/२०१६ पासून पुढे एक वर्ष कालावधीसाठी म्हणजेच दि.१९/१०/२०१६ ते दि.१८/१०/२०१७ या कालावधीसाठी मासिक रु.१५,०००/- मात्र एकत्रित मानधनावर मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

तदनंतर मा.व्यवस्थापन समितीचे दि.२३/१०/२०१७ रोजीच्या सभेतील निर्णय क्रं.८९९ प्रमाणे त्यांच्या नेमणुकीची मुदत दि.१९/१०/२०१७ ते दि.१८/१०/२०१८ या एक वर्ष कालावधीसाठी वाढवून देण्यात आलेली आहे.

तदनंतर मा.व्यवस्थापन समितीचे दि.२०/११/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.७२४ प्रमाणे त्यांच्या नेमणुकीची मुदत दि.१९/१०/२०१८ ते दि.१८/०९/२०१९ या कालावधीसाठी एकत्रित रक्कम रु.२५,०००/- मात्र इतक्या मासिक मानधन तत्वावर मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

श्री.कृष्णा विश्वनाथ वालझाडे (सेवानिवृत्त नायब तहसिलदार) यांनी त्यांचे कार्यकालात मालमत्ता विभागाकडे खालीलप्रमाणे कामे केलेली आहेत.

१) मौजे निमगाव-को-हाळे येथील संस्थान मालकीच्या अकृषिक बखळ जागेवरील सन २०१३-१४ व सन २०१४-१५ या दोन वर्षाचे कालावधीसाठी ग्रामपंचायतीने आकारलेली कराची रक्कम प्रति वर्ष रु.१२,७८,०००/- प्रमाणे दोन वर्षांची रक्कम रु.२५,५६,०००/- इतकी ग्रामपंचायतीकडून माफ करुन घेतली असून उर्वरित सन २०१५-१६, २०१६-१७ व २०१७-१८ या तीन वर्षांसाठी ग्रामपंचायत कराची प्रतिवर्ष रक्कम रु.१२,७८,०००/- ऐवजी प्रतिवर्ष रक्कम रु.६,३९,०००/- इतकी किमान दराने आकारणी करणेकामी ग्रामपंचायतीस भाग पाडलेले आहे.

२) मौजे शिर्डी येथील सर्वे नं.१७१/१२ मधील नियोजित बसस्थानक व भक्तनिवास इमारतीचे बांधकाम संस्थानचे निधीतून करणे व त्यापैकी काही क्षेत्राचा वापर संस्थानसाठी भाडेपट्टयाने करणेविषयी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांचेशी करावयाचे करारनाम्याचे प्रकरणी व त्याचे मुद्रांक शुल्क मा.मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालयाकडून निश्चित करुन घेणेकामीचे प्रकरणी कामकाज केलेले आहे.

३) मौजे घारी,ता.कोपरगाव येथील संस्थान मिळकतीच्या भूसंपादनाची नुकसान भरपाईची रक्कम रु.२,८४,७६५/- इतकी सन २००४ पासून शासनाकडे प्रलंबित आहे. ती संस्थानला मिळणेकामीचे प्रकरण करुन सदरची रक्कम मिळणेकामी दिवाणी न्यायालयात प्रकरण करणेत आलेले आहे.

४) मौजे निघोज येथील श्री.काशिनाथ गोविंद पाटील,रा.कोपरी यांनी त्यांचे मालकीच्या साई पालखी निवारा येथीलशासकीय मुल्यांकन रक्कम रु.३२,२७,१३,५००/- इतक्या किंमतीच्या इमारत बी व डी दान केल्या संबंधातील कागदपत्र प्राप्त करुन तपासून मा.मुद्रांक जिल्हाधिकारी,अहमदनगर यांचेकडून मुल्यांकन निश्चित करुन घेवून नोंदणीकृत दानपत्र करुन घेणेबाबतचीकार्यवाही पूर्ण केली असून त्याप्रमाणे संस्थानच्या नावाने महसुल दप्तरी व ग्रामपंचायत दप्तरी नोंदी करुन घेतलेल्या आहेत. तसेच इमारत डी चे अपूर्ण असलेले काम पूर्ण करुन घेणेकामी पाठपुरावा करणेत येत आहे.

५) शिर्डी येथील द्वारावती भक्तनिवास चे सर्वे नं.१४८/१,१४८/२/१,१४८/२/२,१४८/२/३ चा अकृषिक सारा माफी अनुज्ञेय असताना कामगार तलाठी यांनी सन २०१६-१७ या वर्षासाठी सदर क्षेत्राचा अकृषिक सारा मागणी नोटीस दिलेली होती. सदर बाब कामगार तलाठी,शिर्डी यांचे निदर्शनास आणून देवून त्यासाठीची अकृषिक सारा मागणी नोटीस रद्द करुन घेतली.

६) मौजे पांढुर्ली,ता.सिन्नर येथील संस्थान मालकीची जमीन गट नं.१९ क्षेत्र ०.४९ आर या अकृषिक जमीनीचा आकार महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ चे कलम ११७(३) चे तरतुदीनुसार माफ होणेबाबतचे प्रकरण तयार करुन मा.उपविभागीय अधिकारी,निफाड भाग,निफाड यांचेकडेस सादर करण्यात आले आहे व पाठपुरावा करीत आहे.

७) संस्थानसाठी आरक्षित असलेल्या जमीनींपैकी काही जमीन खरेदी करणेसाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी करुन खरेदी करणेकामीची कार्यवाही पूर्ण केलेली आहे.

८) खरेदी केलेल्या जमीनींची शासकीय मोजणी करुन घेवून महसुल दप्तरी रेकॉर्ड ऑफ राईटला संस्थानच्या नावाने नोंदी करुन घेतलेल्या आहेत.

९) मौजे निमगाव-को-हाळे येथील शेती महामंडळाचे जमीनीपैकी भुसंपादनाद्वारे संस्थानला प्राप्त झालेल्या स.नं.८७ व ८८ मधील क्षेत्रात प्रस्तावित लाडू इमारत व वाणिज्य प्रयोजनासाठी बांधकाम परवानगी मिळणेकामीचा प्रस्ताव मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांचेकडेस सादर करणेत आला असून परवानगीसाठी पाठपुरावा करणेत येत आहे.

१०) मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांचेकडील संस्थानसाठी प्रलंबित असलेली भूसंपादन प्रकरणे तातडीने निर्गत करणेकामी समन्वय साधून पाठपुरावा केलेला आहे. त्यात आरक्षण क्रं.३४ ची भुसंपादन कार्यवाही यापूर्वीच दि.२९/०४/२०१५ रोजी पूर्ण झालेली होती. मात्र भुसंपादित क्षेत्राचा ताबा संस्थानला मिळणेस ऊशिर होत होता. त्याकामी पाठपुरावा करुन भुसंपादन क्षेत्र ६९०३ चौमी.चा ताबा संस्थानला दि.०७/०३/२०१८ रोजी मिळविलेला आहे व त्याप्रमाणे महसुल दपत्री रेकॉर्ड ऑफ राईटला संस्थानचे नावाने नोंदी करुन घेतलेल्या आहेत.

११) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांच्यासाठी ''जमीन खरेदी धोरण'' निश्चित करणेबाबतचा प्रस्ताव शासनाकडे मा.वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली तयार करुन पाठविलेला आहे.

१२) महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाकडील क्षेत्र ५२ हेक्टर ३५ आर इतके संस्थानला कायमस्वरुपी खरेदी मिळणेकामीचा प्रस्ताव सादर करणेत येवून त्यात वरिष्ठ पातळीवर पाठपुरावा करणेचे कामकाज चालू आहे.

१३) मुंबई ते शिर्डी या मार्गावर संस्थानचे पालखी थांबे उभारणेकामी प्राप्त झालेल्या दोन अर्जदारांच्या प्रस्तावातील क्षेत्राची समक्ष पाहणी केली असून त्याप्रमाणे सदर क्षेत्राचे दानपत्र करुन घेणेकामीचे कामकाज चालू केलेले आहे.

१४) मौजे रुई,ता.राहाता येथे संस्थानचे वैद्यकीय संकुल प्रस्तावित आहे. त्यासाठी संस्थान मालकीच्या क्षेत्रालगत असलेल्याव जमीन खरेदीकामी श्री.भंडारी व श्री.भनसाळी यांचेकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावाप्रमाणे जमीन खरेदी करणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयाप्रमाणे शासनाकडे जमीन खरेदी धोरण अंतर्गतचा प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे.

१५) श्रीं चे शताब्दी उत्सव कालावधीत आवश्यकतेनुसार खाजगी व शेती महामंडळाची जमीन वेळोवेळी अधिग्रहण करणेची कार्यवाही पूर्ण केलेली आहे.

१६) सध्यस्थितीत मा.उच्च न्यायालयात श्री.बाबासाहेब बाबुराव गोंदकर यांनी संस्थानचे विरोधात दाखल केलेल्या दाव्याचे कामकाज चालू आहे. त्या संदर्भात शासनाकडेस मुद्देनिहाय अहवाल सादर करणेत आलेला आहे. तसेच साखरबाई हरीभाऊ शेळके यांची जमीन संस्थानला भुसंपादनाद्वारे खरेदी करणेचे प्रकरण देखील मा.उच्च न्यायालयात चालू आहे. या दोन्ही प्रकरणी उचित कार्यवाही करणेचे कामकाज चालू आहे.

१७) मालमत्ता व भुसंपादन संबंधात विविध कोर्टात उदा.दिवाणी न्यायालय,राहाता, कोपरगाव, दिवाणी न्यायालय, व.स्तर, कोपरगाव, सत्र न्यायालय, कोपरगाव, उच्च न्यायालय,औरंगाबाद व सर्वोच्च न्यायालय,दिल्ली इ.कोर्टात चालू असलेल्या सुमारे ३० केसेसमध्ये नियमाप्रमाणे कार्यवाही करणेकामी मार्गदर्शन करीत आहे.

१८) संस्थानच्या ताब्यात असलेल्या मोफत सर्वे नं.१ पैकीचे क्षेत्रासंबंधात शासकीय स्तरावर प्रलंबित असलेल्या दंडात्मक कार्यवाहीचे प्रकरणी कामकाज चालू आहे.

१९) संस्थानसाठी आरक्षित असलेले आरक्षण क्रं.३९ हे मा.उच्च न्यायालय,खंडपीठ,औरंगाबाद यांचेकडील आदेशाप्रमाणे रद्द करणेची कार्यवाही करणेत आली असून शासनाकडे भुसंपादनापोटी जमा करणेत आलेली अनामत रक्कम परत मिळणेकामी मागणी प्रकरण केलेले आहे.

२०) मौजे शिर्डी येथील नगरपंचायत हद्दीतील सर्वे नं.५७/९५ क्षेत्र ०.०१ आर ही कै.महतछत्री यांचे मालकीची स्वकष्टार्जित मिळकत त्यांचे मृत्यूनंतर श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांना देण्याची त्यांची इच्छाअसल्याचे त्यांचे दि.०७/०९/२००५ रोजीच्या अर्जावरुन स्पष्टपणे दिसून आलेने सदरचा अर्ज हेच त्यांचे इच्छापत्र (मृत्युपत्र) संबोधून ते दिवाणी न्यायालयात दाखल करुन मे.कोर्टाकडून प्रोबेट करुन घेणेकामीचे प्रकरण तयार करुनसंस्थान पॅनलवरील वकील ॲड.जे.के.गोंदकर यांना त्याप्रमाणे मे.कोर्टात उक्त मिळकतीस संस्थानचे नाव लावणेकामीचे आदेश प्राप्त करुन घेणेकामी सुचित केलेले आहे.

२१) मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयाप्रमाणे शिर्डी विकास योजना आरक्षण व प्रारुप विकास आराखडा (सुधारीत) मधील संस्थानसाठी प्रस्तावित असलेली आरक्षणे रद्द करणेकामी संबंधीत कार्यालयांकडे प्रस्ताव सादर केले आहेत.

२२) संस्थान मालकीच्या भाडेकराराने दिलेल्या मिळकतींचे करारनामे करणेत आलेले आहेत.

२३) संस्थान मालमत्तेची देखभाल करणेकामी वेळोवेळी मिळकतींना भेटी देणेत आलेल्या आहेत व अडचणींचे निराकरण करणेत आलेले आहे.

२४) कार्यालयाचे दैनंदिन कामकाजात कार्यालयीन टिपण्या,मा.व्यवस्थापन समितीचे सभेपूढे सादर करावयाच्या टिपण्या व इतर पत्रव्यवहार नियमितपणे सादर करणेत आलेले आहेत.

भविष्यात मालमत्ता विभागामार्फत खालीलप्रमाणेची कामे करावयाची आहेत.

१) मुंबई ते शिर्डी,औरंगाबाद ते शिर्डी,पुणे ते शिर्डी,अहमदनगर ते शिर्डी, भंडारदरा ते शिर्डी या मार्गांवर संस्थानचे पालखी थांबे उभारणेचे प्रस्तावित आहे. त्यासाठी जागांचा शोध घेणे,जागा दानपत्र घेणे, जागा खरेदी घेणे याबाबतची प्रकरणांची छाननी करणे इ.

२) सर्व राज्यांच्या महत्वाच्या ठिकाणी संस्थानचे माहिती केंद्र उभारणेचे प्रस्तावित आहे. त्यासाठी जागा निश्चिती करणे, जागा उपलब्ध करणे व तत्संबंधी कामकाज करणे.

३) महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाची जमीन कायमस्वरुपी खरेदी करणे.

४) मौजे रुई,ता.राहाता येथे संस्थानचे वैद्यकीय संकुल प्रस्तावित आहे. त्यासाठी संस्थान मालकीच्या क्षेत्रालगत असलेली श्री.भंडारी/भनसाळी यांची जमीन खरेदी करणेकामी कागदपत्रांची छानणी करणे,मोजणी करुन घेणे व त्यासंबंधीत कोर्ट प्रकरणी कामकाज पाहणे.

५) मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयाप्रमाणे संस्थानसाठीची यापूर्वीची आरक्षणे रद्य करणे व संस्थानच्या मिळकतींवर टाकलेली आरक्षणे रद्य करणेकामीची कार्यवाही करणे.

६) मालमत्ता व भुसंपादन संबंधात विविध कोर्टात उदा.दिवाणी न्यायालय,राहाता, कोपरगाव, दिवाणी न्यायालय,व.स्तर,कोपरगाव,सत्र न्यायालय, कोपरगाव, उच्च न्यायालय,औरंगाबाद व सर्वोच्च न्यायालय, दिल्ली इ.कोर्टात चालू असलेल्या ३० केसेमध्ये उचित कार्यवाही करणे.

७) संस्थानचे ताब्यात असलेल्या मोफत सर्वे नं.१ पै.चे क्षेत्रासंबंधात शासकीय स्तरावर प्रलंबित असलेल्या दंडात्मक कार्यवाहीचे प्रकरणी कामकाज पाहणे.

८) मोफत सर्वे नं.१ च्या क्षेत्राचा ताळमेळ घेणेचे प्रकरणी कार्यवाही करणे.

९) यापूर्वीचे भुसंपादन प्रकरणात शासनाकडे संस्थानने भरलेली अनामत रक्कम परत मिळणेकामीचे प्रस्ताव तयार करणे व पाठपुरावा करणे.

१०) मौजे येसगाव येथील पालखी थांब्याची जागा संस्थानचे नावावर करुन घेणेकामी कार्यवाही करणे.

११) संस्थान मालकीच्या जमीनींच्या पोटहिश्श्यांचे सामीलीकरण करणेचे प्रस्ताव तयार करणे.

१२) अभिलेख कक्षात पाठवावयाचे कागदपत्रांची छाननी करुन रेकॉर्ड अद्ययावत करणे.

१३) मिळकत रजिस्टर नव्याने करुन ते अद्ययावत करणे. इ.कामे करावयाची आहेत.

विभागाचा अभिप्राय- श्री.कृष्णा विश्वनाथ वालझाडे, कंत्राटी सल्लागार (सेवानिवृत्त नायब तहसिलदार) यांची नेमणुकीची मुदत दि.१८/०९/२०१९ रोजी संपत आहे. त्यांनी उपरोक्तप्रमाणे समाधानकारक कामे केलेली असून मालमत्ता विभागाचे दैनंदिन कामकाजात देखील त्यांचे मार्गदर्शन होत आहे. मालमत्ता विभागामार्फत भविष्यात उपरोक्तप्रमाणे कामे प्रस्तावित आहेत. उपरोक्त कामांच्या वाढत्या व्यापाच्या दृष्टिने यापुढेही श्री.कृष्णा विश्वनाथ वालझाडे,कंत्राटी सल्लागार (सेवानिवृत्त नायब तहसिलदार) यांच्या सेवेची मालमत्ता विभागास आवश्यकता आहे.

यास्तव कंत्राटी सल्लागार श्री.कृष्णा विश्वनाथ वालझाडे (सेवानिवृत्त नायब तहसिलदार) यांचे नेमणुकीची पुढील मुदत दि.१९/०९/२०१९ ते दि.१८/०९/२०२० या एक वर्षे कालावधीसाठी प्रचलित पध्दतीने कामगार विभागामार्फत कर्मचारी ठेकेदाराकडून पूर्वीचेच एकत्रित रक्कम रु.२५,०००/- मात्र इतक्या मासिक मानधन तत्वावर कंत्राटी कर्मचारी म्हणून मुदतवाढ देता येईल.

प्रस्ताव- कंत्राटी सल्लागार श्री.कृष्णा विश्वनाथ वालझाडे (सेवानिवृत्त नायब तहसिलदार) यांचे नेमणुकीची पुढील मुदत दि.१९/०९/२०१९ ते दि.१८/०९/२०२० या एक वर्षे कालावधीसाठी प्रचलित पध्दतीने कामगार विभागामार्फत कर्मचारी ठेकेदाराकडून पूर्वीचेच एकत्रित रक्कम रु.२५,०००/- मात्र इतक्या मासिक मानधन तत्वावर कंत्राटी कर्मचारी म्हणून मुदतवाढ देणेच्या मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.४४०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.कृष्णा विश्वनाथ वालझाडे, सेवानिवृत्त नायब तहसिलदार यांना कंत्राटी सल्लागार म्हणून एकत्रित रक्कम रु.२५,०००/- मात्र इतक्या मासिक मानधन तत्वावर कंत्राटी कर्मचारी म्हणून प्रचलित पध्दतीने कामगार विभागामार्फत कर्मचारी ठेकेदाराकडून दि.१९/०९/२०१९ ते दि.१८/०९/२०२० या एक वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.०३** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचेमार्फत कोलकता येथे माहिती केंद्र सुरु करणेबाबत शिर्डी साई श्रध्दा सेवा ट्रस्ट, कोलकत्ता यांचे दि.२१.०६.२०१९ रोजीचे पत्र.**

**प्रस्ताव-** अधिनियमातील तरतूद- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(२)(ठ) मध्ये श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य,त्यांच्या लिला व तयांची शिकवण याबाबतच्या उपयकुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालविल व त्याचा विस्तार करील,अशी तरतुद आहे.

प्रस्तावना- श्रीमती सुजया मुखर्जी,चेअरमन,शिर्डी साई श्रध्दा सेवा ट्रस्ट,कोलकता यांनी त्यांचेकडील उपरोक्त विषयांकित पत्रान्वये, "We would like to bring it to your kind notice that thousands of devotees from West Bengal,Eastern as well as North-Eastern India visit Shirdi Saibaba temple at Shirdi every year. Most of the devotees do not have access to internet or direct

contact with the Saibaba Sansthan Trust, Shirdi. Thus, they come to our temple premises in Kolkata with a lot of questions regarding.

a. Food and lodging near the Saibaba Temple at Shirdi.

b. Transport.

c. Pujas, Aratis etc.

d. Availability of Prasadam, Baba's preachings, mission and advice.

e. Books on Baba's immortal activities etc.

We on behalf of Shirdi Sai Seva Trust Kolkata try our best to serve the devotees in this respect. It is necessary to state in brief that the Shirdi Sai Shraddha Seva Trust, Kolkata runs with very limited resources as obtained from the devotees (as donation/subscription) to fulfill the greatest teaching of Saibaba - ‘love all,serve all’. The following programs have been carried out by this organization since 1999 for the benefit of the poor.

a. Anna Daan after Baba's Pujas and Aartis.

b. Clothes and blanket distribution to the poor.

c. Bhajan, Satsang, Dhyan and spiritual discourse for upliftment of the moral character of the devotees.

d. Free medical and eye camps, distribution of spectacles and arrangement of cataract operation separately if necessary.

e. Arrangement of free books, copies, tution fees to the poor children.

f. Assistance to the poor people for arranging weddings of their children.

Presently,this organization has also conceived various welfare activities for women empowerment.

Threfore, in the backdrop of the present activities we believe that an imformation centre at a convenient place in Kokata will be able to provide all the required information on shirdi Saibaba temple, Shirdi to numerous devotees. The information centre will also create a great liaison between Shirdi Saibaba temple, shirdi and its kolkata counterpart. In this regard proper infrastructural facilities such as office room (15*10.5 sq ft) with computer, suitable manpower, store room (6*5 sq.ft) and also a vacant space (around 12*10.5 sq.ft) for multi-purpose use adjacent to the office room, etc. can be provided (a sketch of the suggested layout is attached for you reference) we would also like to propose the construction of a Sai temple attached to this information centre to attract more devotees to the information centre.

Thus, we sincerely hope to have you kind consent and necessary help for this great effort to facilitate the sarced journey of the devotees to Saibaba temple at Shirdi”, असेबाबत इकडेस कळविलेले आहे.

विभागाचा अभिप्राय– अर्जदार यांनी कोलकता येथे संस्थानचे माहिती केंद्र सुरु करणेसाठी आवश्यक असलेली जागा व आवश्यक ती साधनसामुग्री उपलब्ध करुन दिल्यास कोलकता येथे संस्थानचे माहिती केंद्र सुरु करता येईल.

प्रस्ताव–कोलकता येथे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे माहिती केंद्र सुरु करणे अथवा न करणेच्या निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४४१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी साई श्रध्दा सेवा ट्रस्ट, कोलकत्ता यांनी माहिती केंद्र सुरु करणेसाठी आवश्यक असलेली जागा व आवश्यक ती साधनसामुग्री उपलब्ध करुन दिल्यास संस्थानचे इतर ठिकाणी सुरु असलेल्या माहिती केंन्द्राच्या धर्तीवर कोलकत्ता येथे संस्थानचे माहिती केंद्र सुरु करण्यास मान्यता देण्यात आली.** **(कार्यवाही- मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.०४** **मौजे शिर्डी ता.राहाता येथे ना-नफा-ना-तोटा तत्वावर अतिथीगृह (गेस्ट हाऊस) बांधण्यासाठी एक एकर जागा मिळणेबाबत श्री.टी.भानुप्रसाद राव (एमएलसी) अध्यक्ष, ऑल इंडिया वेलामा असोशिएशन, हैद्राबाद यांचे मा.मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना उद्देशुन लिहीलेले दि.०३.०७.२०१९ रोजीचे पत्र.**

**प्रस्ताव-** अधिनियमातील तरतूद-श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एक वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,अशी तरतूद आहे.

प्रस्तावना- श्री.टी.भानुप्रसाद राव,(एमएलसी),अध्यक्ष,ऑल इंडीया वेलामा असोशिएशन,हैद्राबाद यांनी त्यांचेकडील दि.०३/०७/२०१९ रोजीच्या पत्रान्वये मा.मुख्यमंत्री महोदय,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचेकडेस मौजे शिर्डी,ता.राहाता येथे ना-नफा तत्वावर अतिथीगृह (गेस्ट हाऊस) बांधण्यासाठी एक एकर जागा मिळणेबाबत विनंती केलेली आहे. सदरचे पत्र मा.मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र शासन,मुंबई यांचे कार्यालयाकडील जा.क्रं.३९२९५७२ दि.०८/०७/२०१९ अन्वये इकडेस प्राप्त झाले असून त्यावर मा.मुख्यमंत्री महोदय,महाराष्ट्र राज्य यांनी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,श्री साईबाबा संस्थान,शिर्डी यांना उद्येशून सदर प्रस्ताव तपासून तात्काळ कार्यवाही करणेचे निर्देश दिलेले आहेत.

सदर पत्राचे अवलोकन केले असता त्यात All india Velama Association is a non-profit organization registered under the Societies Act in the State of Telangana about 40 years ago.The Associaton is headquartered at Hyderabad has a membership of over 10,000 people from the states of Telangana,Andhra Pradesh,Tamilnadu, Maharashtra,Karnataka etc.and organizes many programmes for the benefit and welfare of society solely by donations from members.

All India Velama Association established hostels for both Boys and Girls Separately with free boarding and lodging for poor students,running old age homes,and costructed Choultries (guest houses) in religious shrines like Srisailam in Andhra Pradesh,Basara and Vemulawada in Telangana.The choultry proposals at Yadadri in Telangana and Tirumala in A.P.are in pipeline.We provide free meals to all residents and visiting pilgrims and guests in our choultries.The services and facilities of all institutions run by our associations are free and sometimes at nominal cost and open to all communities.

Every year million people from the state of Telangana,Andhra Pradesh visit Shirdi for darshan of Sri Saibaba Shrine and face problems with regard to stay and accommodation.The Association would like to construct a choultry at shiridi for the benefit of pilgrims visiting from the state of Telangana and Andhra Pradesh.

In this regard,we request the Honourable chief minister to recommend to the Government of Maharashtra and Shri Saibaba Sansthan Trust,Shirdi,the Governing and Administrative body of Shri Saibaba's Samadhi Temple to allot about an acer of land at Shiridi to the Association.We assure to construct the choultry in a year and make it available to pilgrims visiting Shirdi from all over India.

Look forward to for favourable action at the earliest, असेबाबत नमूद केलेले आहे.

विभागाचा अभिप्राय- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे मालकीचे शिर्डी येथे १) साईआश्रम भक्तनिवास-१, २) साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) ३) द्वारावती भक्तनिवास ४) साईउद्यान भक्तनिवास ५) शांतीनिकेतन भक्तनिवास ६) साईआश्रम भक्तनिवास-२इ.भक्तनिवास असून त्यात साईभक्तांसाठी ऑनलाईन रुम व दर्शन बुकींग करण्याची संस्थानमार्फत अल्पदरात सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. याशिवाय शिर्डी येथे समक्ष येणा-या साईभक्तांसाठी ऐनवेळेस रुम बुकींग व दर्शनपास सुविधा देखील पुरविण्यात येत आहेत. सदर सर्व भक्तनिवासात निवासी साईभक्तांसाठी नाष्टा,चहा,कॉफी,दुध,बिस्कीटे व जेवण या सुविधा पुरविण्यात येत आहेत. तेंव्हा या व्यतिरिक्त शिर्डी येथे अन्य अतिथीगृह (गेस्ट हाऊस) ची आवश्यकता नसावी,अशी इकडील धारणा आहे.

उक्त ऑल इंडीया वेलामा असोशिएशन,हैद्राबाद या संस्थेने शिर्डी येथे ना-नफा तत्वावर अतिथीगृह बांधणेसाठी एक एकर जागा मिळणेकामी उपरोक्त पत्रात विनंती केलेली आहे. तथापि उक्त संस्थेस शिर्डी येथे अतिथीगृह बांधणेसाठी

संस्थान मालकीची शिर्डी हद्यीत विनाआरक्षित एक एकर जागा उपलब्ध नाही. तसे मा.मुख्यमंत्री महोदय यांचे कार्यालयास मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार कळविता येईल.

प्रस्ताव- मौजे शिर्डी,ता.राहाता येथे ना-नफा तत्वावर अतिथीगृह (गेस्ट हाऊस) बांधण्यासाठी एक एकर जागा मिळणेबाबत श्री.टी.भानुप्रसाद राव,(एमएलसी),अध्यक्ष,ऑल इंडीया वेलामा असोशिएशन,हैद्राबाद यांचे मा.मुख्यमंत्री महोदय,महाराष्ट्रराज्य,मुंबई यांना उद्येशून लिहीलेले दि.०३/०७/२०१९ रोजीचे पत्राचे अनुषंगाने उक्त संस्थेस शिर्डी येथे अतिथीगृह बांधणेसाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे मालकीची शिर्डी हद्यीत विनाआरक्षित एक एकर जागा उपलब्ध नाही, असेबाबत मा.मुख्यमंत्री महोदय,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचे कार्यालयास कळविणेच्या निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४४२** **सदरचा प्रस्ताव अमान्य करण्यात आला.**

**(कार्यवाही- मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.०५** **आर्थिक अनुदान मागणी करीता आलेल्या अर्जाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीकडे अर्थसहाय्य मागणीसाठी दररोज, नोंदणीकृत संस्था, शासकीय कार्यालये, निमशासकीय संस्था, तसेच वैयक्तीकरित्या अर्ज येत असतात. सदरच्या अर्जांद्वारे, १) बांधकाम, २) आश्रमातील लोकांचा खर्च, ३) वाचनालयासाठी पुस्तके-फर्निचर, ४) दवाखान्यासाठी मशिनरी / औषधे, ५) संमेलने, स्पर्धा, शिबिरे, ६) दुष्काळी भागाकरीता चारा/अन्नधान्य/पाणी ७) मुलांच्या शिक्षणासाठी मदत, ८) विधवा/निराधार/अपंग यांना दैनंदिन खर्चासाठी मदत, ९) व्यवसाय सुरू करणेकरीता मदत, १०) मुलांचे लग्नासाठी मदत, ११) जळीत झाल्याने मदत, अशाप्रकारे अनेक कारणासाठी अनुदान मागणी केली जाते.

संस्थान अधिनियम तरतुद:- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिडी अधिनियम २००४ कलम १७ मधील (२)(ण) "मानव जातीचे कल्याण करणा-या किंवा आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल."

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, अधिनियम २००४ चे कलम २१(२) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या विविध प्रयोजनासाठी पुरेशा तरतूदी केल्यानंतर, विश्वस्तव्यवस्थेच्या निधीत शिल्लक राहीली असल्यास अशा शिल्लक रक्कमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरण योग्य उत्पन्नाच्या तीस टक्कयापेक्षा अधिक नसेल एवढा भाग,समितीस वेळोवेळी खालील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी वापरता व खर्च करता येईल.

कलम २१ (२) (एक) " छाननी समितीच्या शिफारसीनुसार व राज्य शासनाचे पूर्व मान्यतेने नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था, किंवा नोंदणीकृत सोसायटी यांचेकडून कोणतीही शैक्षणिक संस्था, क्रिडा अकादमी वा संस्था, सार्वजनिक वाचनालय, रूग्णालय, आधारगृह, किंवा इतर धर्मदाय अथवा धार्मिक संस्था, अथवा कला वा साहित्याशी संबंधित असलेली सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था, किंवा नोंदणीकृत सोसायटी यांची स्थापना व देखभाल करून घेणेसाठी, अशी तरतुद आहे.

संस्थानकडे अनुदान मागणीसाठी दाखल झालेले अर्ज

दि.०१.०७.२०१७ ते ३१.०७.२०१९ कालावधीत आर्थिक अनुदान मागणी करीता आलेले अर्ज खालीलप्रमाणे-

| अ.नं. | अर्जदाराचा/ संस्थेचे नाव व पत्ता | प्रयोजन | शेरा |
|---|---|---|---|
| १ | प. पु. श्री माई महाराज संस्थान ट्रस्ट, औरंगाबाद | मंदीर बांधकामासाठी | |
| २ | Adaikalam Blind Welfare Trust | अंधासाठी मदत | |
| ३ | Shree Neelkanth Brahmeshwar Vanadurga Trust Bradez Goa | मंदीरासाठी मदत | |
| ४ | Bright Future Organization For The Blind, Mumbai | अंध मुलांच्या शैक्षणीक साहित्यासाठी | |
| ५ | छत्रपती प्रमिला राजे सर्वोपचार रुग्णालय कोल्हापूर | एम.आर. आय मशीनसाठी | |
| ६ | Bright Future Organization For The Blind, Mumbai | अंध मुलांच्या शैक्षणीक साहित्यासाठी | |
| ७ | श्री शुभंकर परब, सिंधदुर्ग | पाणीपुरवठासाठी मदत | |

| | | | |
|---|---|---|---|
| ८ | युवा कौशल्य विकास केंद्र सोलापूर | महिला उन्नतीसाठी | |
| ९ | के. माहेश्वरी | दुष्काळ निवारणासाठी | |
| १० | The Bene-Israel Conference Education Fund | गरीब मुलांच्या शिक्षणासाठी | |
| ११ | श्री शुभम भिकाजी चेचार, कोल्हापूर | शिक्षणासाठी | |
| १२ | श्री त्र्यंबक बापुराव गजभार, बार्शी | उसनवारी परत करणेसाठी | |
| १३ | शेतकरी बचाव कल्याणकारी बहूउद्देशीय संस्था, यवतमाळ | सिंचन प्रकल्पासाठी | |
| १४ | वनिता समाज अमरावती | शाळेसाठी मदत | |
| १५ | श्री किशोर भागचंद कटारिया, अहमदनगर | शैक्षणीक मदत | |
| १६ | श्री भालचंद्र रामचंद्र धुढरे,कोल्हापूर | व्यवसायासाठी मदत | |
| १७ | श्री पांडूरंग पालखी सोहळा चॅरिटेबल ट्रस्ट, सोलापूर | पालखी सोहळयासाठी मदत | |
| १८ | श्रीमती हर्षा सोमनाथ आव्हाड, | घरासाठी काढलेले कर्ज भरणेसाठी | |
| १९ | फलटण मेडीकल फौंडेशन, रक्तपेढी, फलटण | रक्तपेढीसाठी मदत | |
| २० | वरदान प्राथमिक विद्यामंदीर, सातारा | शाळेसाठी संगणक | |
| २१ | मध्य रेल्वे मंडळ, सोलापूर, श्री हितेंद्र मलहोत्रा | साईनगर शिर्डी रेल्वेस्थानकासाठी मदत | |
| २२ | साकोलकर चॅरीटेबल हॉस्पीटल रिसर्च सेंटर, औरंगाबाद | हॉस्पीटलसाठी मदत | |
| २३ | श्री ए. डी. पाटील सार्वजनिक वाचनालय गुडाळ, कोल्हापूर | वाचनालय मदत | |
| २४ | राहाता तालुका तालीम संघ, | कुस्ती स्पर्धासाठी | |
| २५ | चि. जयेश चंद्रभान पाटील, येवला | शिक्षणासाठी मदत | |
| २६ | श्री साईनाथ मनोहर ननावरे, पुणे | शिक्षणासाठी मदत | |
| २७ | श्री संत ज्ञानेश्वरी पारायण मंडळ फलटण | अन्नदानासाठी मदत | |
| २८ | श्री मिलींद मधुकर पवार, बारामती | शिक्षणासाठी | |
| २९ | संस्थान श्री एकनाथ महाराज विश्वस्त मंडळ, पैठण | भाविकांच्या सोयी सुविधेसाठी | |
| ३० | श्री साई भक्त मंडळ धूपखेडा औरंगाबाद | मंदीर परिसर विकासासाठी | |
| ३१ | ग्रामपंचायत कार्यालय, धूपखेडा औरंगाबाद | गावातील विकासासाठी | |
| ३२ | सरपंच, ग्रामपंचायत पिंपरी दुमाला, | कर्णबधीर मुलांच्या ऑपरेशनसाठी | विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र |
| ३३ वि | छत्रपती प्रमिला राजे सर्वोपचार रुग्णालय कोल्हापूर विधी व न्याय विभागाचे पत्र. | एम.आर. आय मशीनसाठी | मा.आ.श्रीअमल महादेवराव महाडिक, कोल्हापूर |
| ३४ भा गा चा | श्री योगेश देशपांडे, पुणे | भारतीय जवानांच्या मदतीसाठी | विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र |

अभिप्राय :-

१) वैयक्तीक आर्थिक मदत देणेबाबत अधिनियमात स्पष्ट तरतूद नाही.

२) आर्थिक मदत मागणीकरीता दिलेल्या अर्जाबाबतची सद्यस्थितीची अर्जदार विचारणा करीत असतात. त्याबाबत संबंधितांना त्यांच्या "अर्जाबाबतची सद्यस्थिती कळविणेबाबतच्या विषयावर मा.त्रिसदस्य समितीचे दि.०८.१०.२०१३ रोजीचे सभेत निर्णय क्र.७६६ अर्जदारास अर्जाची सद्यस्थिती कळविण्याची आवश्यकता नाही" असे ठरले आहे. "

३) वैद्यकीय उपचारासाठी श्री साईनाथ रुग्णालयाकडून वैद्यकीय अनुदान दिले जाते त्यामुळे वैद्यकीय उपचारासाठींचे अर्ज विचारात घेऊ नये.

४) अधिनियम २००४ मध्ये ज्या बाबीसाठी अनुदानची स्पष्ट तरतूद आहे फक्त त्याच अर्जाचा अनुदान देतांना विचार व्हावा असे मत आहे.

प्रस्ताव:- दि.०१.०७.२०१९ ते दि .३१.०७.२०१९ या कालावधीत आलेले अर्ज मा. व्यवस्थापन समितीचे अवलोकनार्थ व निर्णयार्थ सादर .

**निर्णय क्र.४४३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, दि.०१.०७.२०१९ ते दि.३१.०७.२०१९ या कालावधीत आलेल्या आर्थिक अनुदान मागणी अर्जांचे अवलोकन करुन त्यांची नोंद घेण्यात आली.**

(कार्यवाही-लेखाशाखा)

---

**विषय नं.०६** **संस्थानचे विविध विभागामध्ये कार्यरत असलेल्या संगणक संचासाठी Microsoft Licenses खरेदी करणेकामी येणाऱ्या खर्चास व याकामी प्रचलीत पध्दतीने खरेदी प्रक्रिया राबविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद:- कलम १७ (१) भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे.

मा.व्यवस्थापन समितीचा ठराव क्रं. :- ०१. दि.०७.११.२००९ निर्णय क्रं. ७९९
०२. दि.१६.०२.२०१६ निर्णय क्रं. १५८
०३. दि.०४.०४.२०१८ निर्णय क्रं. २७५

प्रास्ताविक:- संस्थानचे विविध विभागांचे मागणीनुसार कार्यालयीन कामकाजाकरीता आवश्यक संगणके, संगणकीय साहित्य, सॉफ्टवेअर लायसन्सेस संस्थानचे प्रचलीत पद्धतीनुसार खरेदी करून कार्यान्वीत करणे व त्यासंबंधी व्यवस्थापनाचे कामकाज इकडील विभागामार्फत केले जाते. सद्यस्थितीत, संस्थानचे विविध विभागांमध्ये (संस्थान शैक्षणिक संकुल व श्री साईबाबा संस्थान रुग्णालये वगळता) कार्यान्वीत असलेल्या सर्व्हर व संगणकांचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| **अ.नं.** | **तपशिल** | **माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत खरेदी** | **साईटेक प्रकल्पाअंतर्गत खरेदी** | **एकूण** |
|---|---|---|---|---|
| ०१ | सर्व्हर | ०२ | २० | २२ |
| ०२ | संगणके/लॅपटॉप | १७० | १८० | ३५० |
| | एकूण | १७२ | २०० | ३७२ |

उपरोक्तप्रमाणे कार्यान्वीत असलेल्या सर्व्हर व संगणकावर आवश्यक असलेले सॉफ्टवेअर लायसन्सेस वेळोवेळी आवश्यकतेनुसार खरेदी करुन कार्यान्वीत करणेत आलेले आहेत. सदर लायसन्सेसमध्ये Microsoft Windows व Microsoft Office चा समावेश आहे. सद्यस्थितीत Microsoft Office चे खरेदी करुन कार्यान्वीत असलेल्या लायसन्सेसचा तपशिल पुढीलप्रमाणे.

| अ.नं. | तपशिल | माहिती तंत्रज्ञान विभागा मार्फत खरेदी | साईटेक प्रकल्पा अंतर्गत खरेदी | एकूण |
|---|---|---|---|---|
| ०१ | Microsoft Office 2003 (सन-२००५ मध्ये खरेदी करुन साईटेक प्रकल्पा अंतर्गत कार्यान्वीत) | २० | -- | २० |
| ०२ | Microsoft Office 2007 (साईटेक प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत.) | -- | १०० | १०० |
| ०३ | Microsoft Office-2017 (सन-२०१६ मध्ये खरेदी करुन कार्यान्वीत) | १२५ | -- | १२५ |
| | एकूण | १४५ | १०० | २४५ |

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०४.०४.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. २७५ अन्वये M/s Tata Sons यांनी तयारी दर्शविलेप्रमाणे “साईटेक प्रकल्प-०२” अंतर्गत त्यांचेमार्फत Application बाबतची सर्व कार्यवाही तसेच Data Centre, Cloud Based Services, Hardware & Network बाबत सल्ला व

व्यवस्थापनाबाबतची कार्यवाही विनामुल्य स्वरुपात मे.टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस यांचेमार्फत सुरू करणेत आलेली आहे. त्यानुसार “साईटेक प्रकल्प-०२” अंतर्गत प्रामुख्याने पुढीलप्रमाणे कार्यवाही करणे प्रस्तावीत आहे.

१. कार्यान्वीत कार्यप्रणालींचे अद्यावतीकरण करणे.

२. आवश्यकतेनुसार नविन प्रणाली विकसीत करुन कार्यान्वीत करणे.

३. साईटेक प्रकल्पाअंतर्गंत कार्यान्वीत करणेत आलेले सर्व्हर, संगणके, संगणकीय साहित्य, नेटवर्क साहित्य यांचे आर्युमान संपुष्टात आल्याने आवश्यकतेप्रमाणे सदर साहित्य खरेदी करुन कार्यान्वीत करणे.

४. आवश्यकतेप्रमाणे सॉफ्टवेअर लायसन्सेस खरेदी करुन कार्यान्वीत करणे.

नमुद केलेप्रमाणे मे.टाटा सन्स यांचेमार्फत मे. टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस यांनी प्रकल्पाअंतर्गंतची प्रत्यक्षात कार्यवाही दि.०१.०९.२०१८ पासून सुरू केलेली आहे. सदर कार्यवाहीअंतर्गंत संस्थानचे विविध विभागांमध्ये कार्यान्वीत संगणक संचांसाठी मायक्रोसॉफ्ट यांचे आवश्यक लायसन्सेसबाबत मे.टिसीएस यांनी संबंधीत प्रतिनिधींशी चर्चा केली असता, त्यांनी संस्थानने खरेदी केलेले सॉफ्टवेअर लायसन्सेस, प्रत्यक्षात वापरात असलेले सॉफ्टवेअर व भविष्यातील गरज याचे अवलोकन करणेकरीता त्यांचेमार्फत मे.केपीएमजी यांचे प्रतिनिधी शिर्डी येथे येऊन अहवाल सादर करतील, असे ई-मेलद्वारे कळविलेले होते. त्यानुसार मायक्रोसॉफ्ट यांचेमार्फत मे.केपीएमजी यांचे प्रतिनिधीं यांनी दि.२६ व २७ एप्रिल, २०१९ रोजी शिर्डी येथे येऊन संदर्भीय विषयी माहिती तंत्रज्ञान विभाग, ई.डी.पी.विभाग (रुग्णालये) व मे.टिसीएस यांचे प्रतिनीधी यांचेबरोबर चर्चा करुन तसेच प्रत्यक्ष संगणकांची तपासणी करुन याबाबतचा अहवाल दि.०९.०५.२०१९ रोजीचे ई-मेलद्वारे सादर केलेला आहे. सदर अहवालावर सविस्तर चर्चेअंती पुढीलप्रमाणे सॉफ्टवेअर लायसन्सेस संस्थानने खरेदी करणे आवश्यक असल्याचे मायक्रोसॉफ्ट यांनी दि.०७.०६.२०१९ रोजीचे ई-मेलद्वारे कळविलेले आहे.

| Sr No | Products | Qty | Dept |
|---|---|---|---|
| 01 | SQL Server Standard Core Lic. | 02 | Hospital |
| 02 | SQL CAL | 200 | Hospital |
| 03 | Windows Server Std. Core | 06 | Hospital |
| 04 | Windows Server CAL | 200 | Hospital |
| 05 | Windows Operating System | 200 | Hospital |
| 06 | Windows Server CAL | 104 | IT |
| 07 | Office Professional/Enterprise | 31 | IT |
| 08 | Office Standard | 16 | Hospital |

उपरोक्तप्रमाणे रुग्णालये विभागाकरीता खरेदी करावयाचे लायसन्सेसबाबत पुढील कार्यवाही करणेबाबत ईडीपी विभाग यांना आयटी विभागाचे पत्राद्वारे कळविणेत आलेले आहे. तसेच उर्वरीत लायसन्सेस खरेदी करणेबाबत मे.टिसीएस यांना त्यांचा अभिप्राय देणेबाबत कळविणेत आलेले होते. त्यानुसार मे.टिसीएस यांनी दि.१९.०६.२०१९ रोजीचे ई-मेलद्वारे पुढीलप्रमाणे अभिप्राय दिलेला आहे.

मायक्रोसॉफ्ट यांचे अहवालानुसार कळविणेत आलेले लायसन्सेस हे संस्थानने खरेदी केलेले लायसन्सेस व प्रत्यक्ष वापर यातील तफावत असल्याने मायक्रोसॉफ्ट यांचेमार्फत पुढील कायदेशीर कार्यवाही टाळणेच्या दृष्टीने सदरचे लायसन्सेस खरेदी करणे अत्यावश्यक आहे. मे.टिसीएस यांचे तंत्रज्ञांसाठी कार्यप्रणाली विकसीत करणेकामी आवश्यक लायसन्सेस व मायक्रोसॉफ्ट यांनी कळविलेप्रमाणेचे लायसन्सेस यांचा विचार करता पुढीलप्रमाणे लायसन्सेस खरेदी करणे आवश्यक आहेत.

| Sr.No | Description of Software | Part Code | Qty |
|---|---|---|---|
| 01 | Visio Pro 2019 SNGL OLP NL | D87-07498 | 04 |
| 02 | MS Office Std 2019 SNGL OLP NL Chrty | 021-10608 | 50 |
| 03 | WinSvrCAL SNGL LicSAPk OLP NL Chrty UsrCAL | R18-00191 | 150 |

मायक्रोसॉफ्ट यांचे अहवालानुसार व मे.टिसीएस यांनी दिलेल्या अभिप्रायानुसार उपरोक्तप्रमाणेचे लायसन्सेस खरेदी करणेकामी येणारे अंदाजे खर्चाबाबत या क्षेत्रातील विविध पुरवठाधारकांकडे विचारणा केली असता, संबंधीतांनी पुढीलप्रमाणे दर कळविलेले आहेत.

| Sr. No | Description | Qty | M/s Prestige | M/s Minitek | M/s Veertag | M/s Microsoft | Avge rate | Total Amount |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 01 | Visio Pro 2019 SNGL OLP NL | 04 | 14,639/- | -- | 16,600/- | 15,930/- | 15,723/- | 62,892 /- |
| 02 | MS Office Std 2019 SNGL OLP NL Chrty | 50 | 7,105/- | 9,521/- | 8,055/- | 7,788/- | 8,117/- | 4,05,850 /- |
| 03 | WinSvrCAL SNGL LicSAPk OLP NL Chrty UsrCAL | 150 | -- | 1,154/- | 976/- | 974/- | 1,035/- | 1,55,250 /- |
| | | | | | | | **Total Amount -** | **6,23,992/- + Tax** |

मे.टिसीएस यांचे अभिप्रायानुसार, उपरोक्त तपशिलातील नमुद Visio Pro 2019 SNGL OLP NL (Qty-04), MS Office Std 2019 SNGL OLP NL Chrty (Qty-50) व WinSvr CAL SNGL LicSAPk OLP NL Chrty UsrCAL (Qty-150) लायसन्सेस खरेदी करणेस येणारे रक्कम रुपये ६,२३,९९२/- + कर मात्रचे खर्चास तसेच याकामी संस्थानचे विहीत पद्धतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

मागणी:- प्रास्ताविकेत नमुद केलेप्रमाणे Microsoft कंपनीने संस्थानमध्ये वापरात असलेल्या संगणकांवरील मायक्रोसॉफ्टचे विविध सॉफ्टवेअरचे ऑडीट केले असुन दि.१६.०५.२०१९ रोजीचे ई-मेलद्वारे ऑडीट रिपोर्टबाबतची माहिती कळविलेली आहे. सदर अहवालाबाबत मे.टिसीएस यांनी दिलेल्या अभिप्रायानुसार Visio Pro 2019 SNGL OLP NL (Qty-04), MS Office Std 2019 SNGL OLP NL Chrty (Qty-50) व WinSvrCAL SNGL LicSAPk OLP NL Chrty UsrCAL (Qty-150) लायसन्सेस खरेदी करणेस येणारे रक्कम रुपये ६,२३,९९२/-+ कर मात्रचे खर्चास तसेच याकामी संस्थानचे विहीत पद्धतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करणेस मान्यता असावी, हि नम्र विनंती.

संस्थान अधिनियम / ठराव या नुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान :- तांत्रिक, प्रशासकीय व आर्थिक

विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:- Microsoft कंपनीने संस्थानमध्ये वापरात असलेल्या संगणकांवरील मायक्रोसॉफ्टचे विविध सॉफ्टवेअरचे ऑडीट केले असुन दि.१६.०५.२०१९ रोजीचे ई-मेलद्वारे ऑडीट रिपोर्टबाबतची माहिती कळविलेली आहे. सदर अहवालाबाबत मे.टिसीएस यांनी दिलेल्या अभिप्रायानुसार Visio Pro 2019 SNGL OLP NL (Qty-04), MS Office Std 2019 SNGL OLP NL Chrty (Qty-50) व WinSvrCAL SNGL LicSAPk OLP NL Chrty UsrCAL (Qty-150) लायसन्सेस खरेदी करणेस येणारे रक्कम रुपये ६,२३,९९२/- + कर मात्रचे खर्चास तसेच याकामी संस्थानचे विहीत पद्धतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सविनय सादर.

**निर्णय क्र.४४४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे विविध विभागामध्ये कार्यरत असलेल्या संगणक संचासाठी Microsoft Licenses खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणाऱ्या रक्कम रु.६,२३,९९२/-+कर मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-माहिती तंत्रज्ञान विभाग)**

---

**विषय नं.०७** **श्री. शंभु सोनी, पत्रकार, मुंबई व श्री.अमित कुमार सिंग, ग्रेटन नोयडा (उ.प्र.) यांचे ई-मेलबाबत.**

**प्रस्ताव-** श्री.शंभू सोनी, पत्रकार मुंबई यांनी श्री साईबाबा संस्थानला दि.०२/०८/२०१९ रोजी ई-मेल पाठविला असुन त्यात त्यांनी ''एक जैन मुनि का साई बाबा के बारे में एक आपत्ति जनक विडियो वायरल हो रहा है | उसे देखकर मुझे बहुत दुःख हुआ | वह आपको भेज रहा हूं | आपको एक्शन लेना चाहिए |'' असे म्हटले आहे. तसेच त्यांनी ई-मेल सोबत सदरचे जैन मुनीचा व्हिडीओ जोडला आहे.

याबाबत आणखी एक साईभक्तश्री.अमित कुमार सिंग,ग्रेटन नोयडा(उ.प्र.) यांचा दि.०२/०८/२०१९ रोजीचा ई-मेल प्राप्त झाला असुन त्यात त्यांनी "My Name is AMIT KUMAR SINGH, Living in greater Noida, Uttar Pradesh and I am "SHIRDI SAI" devotee. Today I received a video message on group watts app which says against about "LORD SAI BABA". Where in, a

Jain muni uses some false language and propagate the same against sai baba in public meeting . Which has hurts my sentiments. Devotees like me were very saddens with this . The same video also have been uploaded on Youtube , link shared below .

I request your legal team to kindly stop circulating such messages in watts App and ban such users/person for doing the same . Also please investigate if this is pre-planed activity by such anti social elements to create a social dis balance in the regions for dividing hindus&muslims .

I again request you to Kindly take some appropriate action on such videos:. https://www.youtube.com/watch?v=FvQl9XldqbM&t=13s Please help me out , I am crying hard to catch this muni .... Please .... –Amit Mobile – 9891090264" असे नमुद केलेले आहे.

श्री.शंभू सोनी, पत्रकार मुंबई यांचे उपरोक्त ई-मेल सोबत जोडलेल्या व्हिडीओ क्लिपचे अवलोकन केले असता त्यामध्ये एक जैन मुनी, प्रवचन देतांना दिसत असुन त्याचे समोर अनेक लोक बसलेले दिसत आहे. सदर जैन मुनी याने त्याचे प्रवचना मध्ये श्री साईबाबांबद्दल अतिशय चुकीची माहिती गलिच्छ शब्दामध्ये सांगतांना दिसून येत आहे. सदर मुनी सांगत असलेली माहिती धादांत खोटी व निराधार आहे. सदरचा व्हिडीओ क्लिप पाहिल्यानंतर एक साईभक्त म्हणून प्रत्येकाचे मनामध्ये या मुनीबद्दल चिड निर्माण होते. सदरचे व्हिडीओ क्लिप मध्ये या मुनिचे नाव अथवा कार्यक्रम कोणते ठिकाणी झाला आहे हे लक्षात येत नाही.

श्री साईबाबांचा महिमा व त्यामुळे दिवसेंदिवस शिर्डी मध्ये येणारे साईभक्तांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहेत. त्यामुळे संस्थानला प्राप्त होणारी देणगी मोठया प्रमाणात वाढत आहे. श्री साईबाबांचे देशपरदेशात अनेक मंदिरे असुन तेथे दर्शनासाठी जाणा-या भक्तांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे यापुर्वीही अशाप्रकारे व्दारका पीठाचे शंकराचार्य यांनी श्री साईबाबांचे विषयी गैरसमज पसरविण्याचा प्रयत्न केला होता. त्यावेळीही अशाप्रकारे अनेक साईभक्त व ग्रामस्थ यांनी त्यांचेवर कारवाई करणेबाबत संस्थानला निवेदने दिलेली होती. त्यावेळी सदरचा विषय निर्णयार्थ मा. त्रिसदस्यीय समितीचे दि.०३.०८.२०१४ रोजी झालेल्या सभेपुढे सादर करणेत आला होता त्यावर निर्णय क्र. ६४४ अन्वये ''उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, या प्रकरणी संस्थानमार्फत कोणत्याही प्रकारची कार्यवाही करणेत येऊ नये, असे ठरले.''असे ठरले होते.

तसेच श्री.रमेश जोशी अध्यक्ष, साईधाम चेरिटेबल ट्रस्ट यांनीही अशाप्रकारे गैरसमज पसरविण्याचा प्रयत्न केला तसेच श्री साईबाबांच्या विरुद्ध मा.उत्तराखंड उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचीकेत इंटरव्हेन्शन ॲप्लीकेशन दाखल करणेबाबत, दि.०८/०८/२०१४ रोजी संस्थानला पत्र दिले होते.

प्रस्तुतचा विषय संस्थानचे मा.त्रिसदस्य समितीचे दि.२५/०९/२०१४ रोजीचे सभेत विषय नं. ३५ अन्वये सादर केला होता. सदर सभेत याबाबत पुढिल प्रमाणे नि.क्र ८४३ अन्वये ''यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.रमेश जोशी विश्वस्त, साईधाम चेरिटेबल ट्रस्ट, मुंबईयांचे पत्राची दखल घेऊ नये असे समितीने ठरविले.''असा निर्णय झालेला होता. अशाप्रकारे श्री साईबाबांवर निराधार व चुकीचे आरोप करणा-यावर कोणतीही कारवाई न करण्याचे यापुर्वी संस्थानचे व्यवस्थापनाचे धोरण होते.

तरी श्री.शंभू सोनी, पत्रकार मुंबई व श्री.अमित कुमार सिंग,ग्रेटर नोयडा(उ.प्र.) यांचे ई-मेलनुसार जैन मुनी यांचेवर करावयाचे पुढील कारवाईबाबत निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४४५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तुत प्रकरणी या क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींचा कायदेशीर सल्ला घेण्यात यावा,असे ठरले.**

**(कार्यवाही- विधी विभाग)**

---

**विषय नं.०८** **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील General Surgery या विभागाकरीता Harmonic Scalpel यंत्राकरीता Consumbal साहित्य खरेदी व १ नग harmonic Scalpel Machine Upgrade करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालयातील General O.T. या विभागाने दि. १०/०८/२०१८ रोजीच्या मागणीपत्रान्वये त्यांचेकडे उपलब्ध असलेल्या Johnson & Johnson कंपनीचे HarmonicScalpel Machine चे Probe मिळणेबाबत मागणी केली आहे तसेच श्री साईबाबा रुग्णालयातील General Surgery विभागाने इकडील प्राप्त दि. २९/०१/२०१९ रोजीच्या मागणीपत्रान्वये त्यांचेकडे उपलब्ध असलेल्या Johnson & Johnson कंपनीच्या Harmonic Scalpel Machine साठी Probe मिळणेबाबत मागणी केली आहे.

श्री साईनाथ व श्री साईबाबा रुग्णालयामध्ये शल्यचिकित्सशास्त्र या विभागामध्ये वर्षाला साधारणत: अंदाजे ७०० शस्त्रक्रिया दुर्बिणीव्दारे होतात याकरिता Harmonic Probe Consumable ची आवश्यकता असते.

सदरचे Probe हे Harmonic Scalpel Machine करिता आवश्यक असून Probe शिवाय यंत्र वापरता येणे शक्य नाही तसेच रुग्णांवर उपचार करणे आवश्यक आहे. सदरचे Harmonic Probe चा उपयोग दुर्बिणीव्दारे केल्या जाणा-या सर्व मोठया जनरल शस्त्रक्रियाकरिता वापरण्यात येते. सदरहू Probe खरेदी न केल्यास यांचा रुग्णसेवेवर परिणाम होऊ शकतो व शस्त्रक्रिया करण्यात अडथळा निर्माण होऊ शकतो.

श्री साईनाथ रुग्णालयात यापूर्वी ०२ नग Harmonic Scalpel GEN 11 Model चे मशीन असून मशीन व Probe च्या वापराचा तपशील खालील प्रमाणे

| Sr. No. | Model & Code | Installation Year | Hospital | Consumption of Consumble Material | Amount |
|---|---|---|---|---|---|
| 1 | GEN 11 | 2014 | General Surgery Department, Shri Sainath Hospital | 2 Nos. Harmonic Probe , 1 Nos. Enseal Probe & 1 Nos. Handpiece (Cable) | 1370250.00 |
| 2 | GEN 11 | 2018 | Gynaecology Department, Shri Sainath Hospital | 5 Nos. Harmonic Probe & 1 Nos. Handpiece (Cable) | 1280000.00 |

श्री साईबाबा हॉस्पिटलकरिता यापूर्वी ०१ नग Harmonic Scalpel GEN 4 Model चे मशीन असून मशीन व Probe च्या वापराचा तपशील खालील प्रमाणे

| Sr. No. | Model & Code | Installation Year | Hospital | Consumption of Consumble Material | Amount |
|---|---|---|---|---|---|
| 1 | GEN 4 | 2011 | General O.T., Shri Saibaba Hospital | 5 Nos. Harmonic Probe & 1 Nos. Handpiece (Cable) | 1150000.00 |

सन २०१६ मध्ये 8 Nos. Harmonic Probe , 10 Nos. Enseal Probe & 2 Nos.Handpiece (Cable) खरेदी करण्यात आलेला आहे.

श्री साईनाथ व श्री साईबाबा हॉस्पिटलकमध्ये उपलब्ध असलेल्या Johnson & Johnson कंपनीचे HarmonicScalpel Machine व त्याकरिता लागणारे Probe हे Monopoly असल्यामुळे त्याच कंपनीचे उपलब्ध करुन द्यावे अशी मागणी केली आहे. तसेच सदर मागणी कामी संबंधित डॉक्टरांना फेर विचारणा करण्यात येऊन, मागणीची खात्री करण्यात आलेली आहे.

त्यानुसार Johnson & Johnson कंपनीकडून Probe खरेदीकामी दर घेण्यात आलेले आहे. त्यानुसार येणा-या खर्चाचा तपशिल खालील प्रमाणे

1) Shri Sainath Hospital

| Sr. No. | Model & Code | Qty | Rate Per Unite in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1 | HAR36 | 20 | 36500.00 | 730000.00 |
| 2 | HARH36 | 15 | 35000.00 | 525000.00 |
| 3 | HARHD36 | 10 | 38000.00 | 380000.00 |
| 4 | HP054 (Hand piece with cable) | 03 | 95000.00 | 285000.00 |
| 5 | HPBLUE (Hand piece with cable) | 03 | 110000.00 | 330000.00 |
| 6 | HAR17F | 10 | 32000.00 | 320000.00 |
| 7 | HAR 9F | 02 | 30000.00 | 60000.00 |
| | | | Total Amt. in Rs. | 2630000.00 |
| | | | 12% GST | 315600.00 |
| | | | **Total Amt. in Rs. + 12% GST** | **2945600.00** |

**2) Shri Saibaba Hospital**

| Sr. No. | Model & Code | Qty | Rate Per Unite in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1 | HAR36 | 10 | 36500.00 | 365000.00 |
| 2 | HARH36 | 10 | 35000.00 | 350000.00 |
| 3 | HARHD36 | 05 | 38000.00 | 190000.00 |
| 4 | HDH05 | 10 | 20000.00 | 200000.00 |
| 5 | HAR17F | 5 | 32000.00 | 160000.00 |
| 6 | NSLG2S35 | 5 | 36000.00 | 180000.00 |
| 7 | NSLG2C35A | 10 | 33712.92 | 337129.20 |
| 8 | HP054 (Hand piece with cable) | 01 | 95000.00 | 95000.00 |
| 9 | HPBLUE (Hand piece with cable) | 01 | 110000.00 | 110000.00 |
| | | | **Total Amt. in Rs.** | **1987129.20** |
| | | | **12% GST** | **238455.50** |
| | | | **Total Amt. in Rs. + 12% GST** | **2225584.70** |

श्री साईनाथ रुग्णालयातील General O.T. व श्री साईबाबा रुग्णालयातील General Surgery या विभागाकरिता Johnson & Johnson कंपनीकडून Probe खरेदीकामी रक्कम रू.५१,७१,१८४.७०/- पूर्णाकींत रक्कम रु. ५१,७१,१८५/- (अक्षरी रू. एकावन्न लाख एकात्तर हजार एकशे पंच्याऐंशी मात्र ) इतका खर्च अपेक्षित आहे.

मागणी– श्री साईनाथ रुग्णालयातील General O.T. व श्री साईबाबा रुग्णालयातील General Surgery या विभागांकरिता Johnson & Johnson कंपनीकडून Probe ची मागणी केलेली आहे.

सदर बाबत Johnson & Johnson कंपनीला Monopoly बाबत विचारले असता, त्यांनी दि.०७/०३/२०१९ रोजीचे पत्रान्वये कळविले की,Harmonic Scalpel Machine हे Johnson & Johnson कंपनीच बनविते व त्याला लागणारे Probe हे देखील Johnson & Johnson कंपनीचे लागतात तसेच Johnson & Johnson कंपनीने पत्रान्वये कळविले की, श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये सध्या उपलब्ध असलेले Harmonic GEN 4 मशीन २०११ साली कार्यान्वित करणेत आलेले होते ते आता कालबाह्य झालेले आहे. त्यामुळे सदर कंपनीने पत्रान्वये कळविले आहे की, GEN 04 Upgradeation Programm अंतर्गत आपण ३७ Probes एकावेळेस खरेदी केल्यास, आपले कालबाह्य झालेले GEN 04 मशीन परत घेऊन, आपणास नवीन अत्याधुनिक असे रक्कम रु. १४, ६४,७७४ इतक्या किंमतीचे GEN 11 मशीन मोफत देण्यात येईल. तसेच अजून एक विशेष बाब म्हणून सदर बरोबर एक वेळेस कमीत-कमी ७५ Probes खरेदी केल्यास अजून एक १४,६४, ७७४/- GEN 11 किमंतीचे मशीन मोफत देण्यात येईल, परंतु, आपल्या जुन्या GEN 04 मशीनची दि.३१/०३/२०१९ पर्यंतची घसारा किंमत ही रक्कम रु.१,१५,१३०/- इतकी येत आहे. सदरची रक्कम ही ५०,०००/- पेक्षा जास्त असल्यामुळे संस्थान अधिनियम २००४ मधील कलम नं. १७ (४) अन्वये सदरकामी शासनाची पूर्वमान्यता घ्यावी लागणार आहे.

सदर मान्यता प्राप्त झाल्यानंतर सदर मशीन संबंधित कंपनीला देता येईल, याबाबत कंपनीशी चर्चा केली असता, शासनाची मान्यता मिळालेनंतर सदर मशीन आम्हांला दिले तरी चालेल असे, त्यांनी सांगितले आहे.

श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयातील वापरणारे डॉक्टर यांची मागणी ही एकूण १२० Probes म्हणजेच एकूण रक्कम रु. ५१,४८,७८५/- इतक्या किंमतीची आहे. व दोन्हीही schemes चा फायदा घेऊन आपणास याबरोबर रक्कम रु. २९,२९,५४८/- किंमतीचे मशीन मोफत स्वरुपात मिळणार आहे.

सदर schemes साठी संबंधित कंपनीने दोन वेगवेगळ्या पुरवठा आदेश देणेबाबत विनंती केलेली आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे

पुरवठा आदेश क्र. १

| Sr. No. | Product Code | Qty | Unit Per Price | MRP | Total Amt. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | HAR 36 | 30 | 36500.00 | 62770.00 | 1095000.00 |
| 2 | HARH 36 | 2 | 35000.00 | 51689.00 | 70000.00 |
| 3 | NSLG2S35A | 2 | 33713.00 | 32067.00 | 67426.00 |
| 4 | HAR 17F | 2 | 32000.00 | 56016.00 | 64000.00 |
| 5 | HARHD36 | 1 | 38000.00 | 64412.00 | 38000.00 |
| | Total Qty | ३७ Probe | | Total Amt. | 1334426.00 |
| | | | | 12%GST | 160131.12 |
| | | | | Total Amt. + 12%GST | 1494557.12 |

पुरवठा आदेश क्र. २

| Sr. No. | Product Code | Qty | Unit Per Price | MRP | Total Amt. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | HARH 36 | 23 | 35000.00 | 51689.00 | 805000.00 |
| 2 | HARHD36 | 14 | 38000.00 | 64412.00 | 532000.00 |
| 3 | HPO54 | 4 | 95000.00 | 140494.00 | 380000.00 |
| 4 | HP BLUE | 4 | 110000.00 | 192423.00 | 440000.00 |
| 5 | HAR 17 F | 13 | 32000.00 | 56016.00 | 416000.00 |
| 6 | HAR 9 F | 2 | 30000.00 | 48611.00 | 60000.00 |
| 7 | HDH 05 | 10 | 20000.00 | 32102.00 | 200000.00 |
| 8 | NSLG 2S35A | 8 | 33713.00 | 62067.00 | 269704.00 |
| 9 | NSLG 2S35 | 5 | 36000.00 | 56016.00 | 180000.00 |
| | | | | Total Amt. | 3282704.00 |
| | | | | 12%GST | 393924.48 |
| | | | | Total Amt. + 12%GST | 3676628.48 |

वरील तक्ता व कंपनीची Scheme चा विचार करता GEN 4 मशीन Upgradion करिता P.O. No. 1. मधील ३७ Probe व अजून ०१ नग नवीन मशीन मोफत मिळणेकरिता P.O. No. 2 मधील ७५ Probe सुरुवातीला मागविता येतील व उर्वरित Probe वापरणा-या डॉक्टरांच्या मागणीनुसार वेळोवेळी मागवता येतील असे मत आहे.

संस्थान अधिनियम / ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान :-

१) अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालये चालविण्यात येतात.

२) शासकीय विभागानी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठी कार्यपध्दतीची नियमावली नुसार शासन निर्णय क्र.भांखस–२०१४/प्र.क्र.८२/भाग–३/उद्योग–४, दि.०१/१२/२०१६ अन्वये परिच्छेद ३.२.६–एकल स्त्रोत खरेदी- एकल स्त्रोत पुरवठादाराच्या निवडीमध्ये गुणवत्ता आणि खर्चाच्या संबंधात स्पर्धेमुळे जे फायदे मिळतात ते फायदे मिळत नाहीत. तसेच अशा निवडीत पारदर्शकतेची उणीव असते आणि त्यामुळे अस्वीकारर्ह प्रथांना प्रोत्साहन मिळते. त्यामुळे एकल स्त्रोत निवड पध्दत फक्त खाली नमूद केलेल्या अपवादात्मक परिस्थितीत वापरण्यात येते :-

अ) खरेदीची वस्तू फक्त एका विशिष्ट विक्रेत्याकडे उपलब्ध असते किंवा खरेदीच्या विषयाच्या संदर्भात फक्त विशिष्ट विक्रेत्याला अधिकार (जेंव्हा वस्तू एकच विशिष्ट विक्रेत्याकडे उपलब्ध असते किंवा एका विशिष्ट विक्रेत्याला अधिकार असतात.) असतात ज्यामुळे अन्य कोणताही किंवा बदली पर्याय उपलब्ध नसतो व अन्य कोणत्याही खरेदी पध्दतीचा अवलंब करणे शक्य नसते.

आ) वस्तू, साधने, तंत्रज्ञान किंवा सेवा एका विक्रेत्याकडून खरेदी केल्यानंतर अतिरिक्त वस्तुंचा पुरवठा देखील त्याच विक्रेत्याकडून, प्रामाणिकरणामुळे किंवा अनुरुपतेच्या कारणामुळे, खरेदी कार्यालयाच्या गरजा मूळ खरेदीच्या परिणामकारकतेमुळे भागविल्या गेल्याने तसेच, मूळ खरेदीच्या तुलनेत प्रस्तावित खरेदीचा मर्यादीत लहान आकार – तुलनेने कमी प्रमाणात खरेदी, किंमतींचा वाजवीपणा आणि पर्यायी वस्तू किंवा सेवा अनुरुप नसणे इ. बाबी विचारात घेऊन, खरेदी कार्यालयाने खरेदी करण्याचा निर्णय घेणे.

इ) जुन्या Harmonic Scalpel Machine ची घसारा वजा जाता दि. ३१/०३/२०१९ अखेर किंमत रु.१,१५,१३०/- इतकी होत आहे. सदरची रक्कम ही रु. ५०,०००/- पेक्षा जास्त असल्यामुळे संस्थान अधिनियम २००४, मधील कलम नं. १७ (४) अन्वये सदरचे खरेदीपूर्वी शासनाची पूर्व मान्यता घ्यावी लागणार आहे.

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:- श्री साईनाथ रुग्णालयातील General O.T. या विभागाने दि.१०/०८/२०१८ रोजीच्या मागणीपत्रान्वये त्यांचेकडे उपलब्ध असलेल्या Johnson & Johnson कंपनीचे HarmonicScalpel Machine चे Probe मिळणेबाबत मागणी केली आहे तसेच श्री साईबाबा रुग्णालयातील General Surgery विभागाने इकडील प्राप्त दि. २९/०१/२०१९ रोजीच्या मागणीपत्रान्वये त्यांचेकडे उपलब्ध असलेल्या Johnson & Johnson कंपनीच्या Harmonic Scalpel Machine साठी Probe मिळणेबाबत मागणी केली आहे.

श्री साईनाथ व श्री साईबाबा रुग्णालयामध्ये शल्यचिकित्सशास्त्र या विभागामध्ये वर्षाला साधारणत: अंदाजे ७०० शस्त्रक्रिया दुर्बिणीव्दारे होतात याकरिता Harmonic Probe Consumable ची आवश्यकता असते.

सदरचे Probe हे Harmonic Scalpel Machine करिता आवश्यक असून Probe शिवाय यंत्र वापरता येणे शक्य नाही तसेच रुग्णांवर उपचार करणे आवश्यक आहे. सदरचे Harmonic Probe चा उपयोग दुर्बिणीव्दारे केल्या जाणा-या सर्व मोठया जनरल शस्त्रक्रियाकरिता वापरण्यात येते. Probe खरेदी न केल्यास यांचा रुग्णसेवेवर परिणाम होऊ शकतो व शस्त्रक्रिया करण्यात अडथळा निर्माण होऊ शकतो. त्यामुळे त्यांनी नवीन सदरहू Probe ची मागणी केलेली आहे. तसेच Harmonic Scalpel Machine खरेदी करतांनी जूने मशीन बायबॅक करुन नवीन मशीन मोफत घेण्यास व जूने मशीनची घसारा किंमत ही दि. ३१/०३/२०१९ पर्यंत रक्कम रु. १,१५,१३०/- इतकी असल्याने सदरची रक्कम ही ५०,०००/- पेक्षा जास्त असल्यामुळे संस्थान अधिनियम २००४ मधील कलम नं. १७ (४) अन्वये सदरकामी शासनाची पूर्वमान्यता घ्यावी लागणार आहे. सदर मान्यता प्राप्त झाल्यानंतर सदर मशीन संबंधित कंपनीला देता येईल, तरी यासंदर्भात शासन खरेदी नियमावलीतील परिच्छेद ३.२.६ – एकल स्त्रोत खरेदी याप्रमाणे पुढील कार्यवाही करता येईल.

तरी, श्री साईबाबा हॉस्पिटलमधील GEN 04 Machine Upgradation करणेकामी M/s. Johnson & Johnson यांना पुरवठा आदेश क्र.१ नुसार ३७ नग Probe कामी पुरवठा आदेश देणेस व पुरवठा आदेश क्र. २ नुसार १११ नग Probes चा पुरवठा आदेश देऊन ०१ नग नवीन GEN 11 मशीन मोफत घेणेसाठी ७५ नग Probes लगेचच मागवून घेणे व रक्कम रु.५१,७१,१८५/- (अक्षरी रू. एकावन्न लाख एकात्तर हजार एकशे पंच्याऐंशी मात्र ) इतक्या खर्चास व जूने मशीनची घसारा किंमत ही रक्कम रु.१,१५,१३०/- इतकी येत असून त्याकामी शासनाची पूर्व परवानगी घेण्याचा प्रस्तावास मान्यता असावी, ही विनंती.

**निर्णय क्र.४४६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील General O.T. व श्री साईबाबा रुग्णालयातील General Surgery या विभागाकरिता Johnson & Johnson कंपनीकडून एकुण १२० नग Probe खरेदी करणेस व त्या कामी येणाऱ्या रक्कम रु.५१,७१,१८५/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. सदर कंपनीने दिलेल्या Scheme नुसार जुने GEN 04 Machine Upgradation करणेकामी उपरोक्त प्रस्तावात नमुद पुरवठा आदेश क्र.१ मधील ३७ नग Probe तसेच एक नवीन GEN 11 मशीन मोफत घेणेसाठी पुरवठा आदेश क्र.२ मधील ७५ नग Probe लगेच मागवुन घेण्यात यावे,असे ठरले. तसेच जुने GEN 04 मशीनची घसारा किंमत रक्कम रु.१,१५,१३०/- इतकी असल्याने सदर मशीन बायबॅक करणेकामी मान्यतेसाठी शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात यावा,असे ठरले.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.०९** **श्री साईनाथ रुग्णालयातील निरुपयोगी लिनन साठा रजिष्टरमधुन निर्लेखित करणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम-२००४ मधील तरतूद:- कलम १७ (१) व १७ (२) (ण) मानवजातीचे कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल.

मा. व्यवस्थापन समिती ठराव क्र.:- नवीन प्रस्ताव.

प्रस्तावीक :-श्री साईनाथ रुग्णालयाचे लिनन विभागामध्ये सर्व वार्ड /ओटी. यांचेकडून अतिशय जीर्ण व रक्ताच्या डागांनी खराब झालेले तर काही फाटलेल्या अवस्थेत निरुपयोगी लिनन(कालावधी दि. ०१.०४.२०१८ ते ३१.०३.२०१९ अखेर) जमा झालेले आहे. सदरचे लिनन दैनंदिन व सततच्या वापरामुळे खराब झालेले असून ते वापरायोग्य नाही.

आजमितीस विविध वार्ड /ओटी. मधून जमा झालेल्या खराब, निरुपयोगी लिननची तपशीलवार माहिती " परिशीष्ट अ "मध्ये सादर केली आहे. सदर लिनन खरेदीची एकूण किंमत ४,३०,३११.५० /- (अक्षरी रक्कम रुपये चार लाख तीस हजार तीनशे अकरा आणी पैसे पन्नासमात्र ) इतकी आहे.

विभागाचा अभिप्राय व स्पष्ट मत:- सदर लिननच्या खरेदीस सुमारे पाच-सहा वर्षांचा कालावधी झालेला असून त्याचे आयुष्यमान त्याच्या वापरापासुन साधारणतः फक्त पाच ते सहा महिने इतकेच असते. तसेच, रुग्णालयाकडील लिनन हे संसर्गजन्य (Infected)असल्यामुळे त्याची अभिलेख कक्षामार्फत विक्री करता येत नाही तसेच ते इतर विभागास अन्य वापराकामी देताही येत नसल्याने त्याची घसारा किंमत निरंक दर्शविण्यात येते. त्यामुळे, ते वेळीच जाळून, नष्ट करुन त्याची विल्हेवाट लावणे आवश्यक आहे.

सदर लिनन हे संस्थानच्या अंतर्गत लेखापरीक्षण विभागाकडून प्रत्यक्ष तपासणी करण्यात आलेले असून ते जाळून नष्ट करणेस व साठा रजिष्टर मधून निर्लेखित करण्यास मान्यता असावी.

सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समिती सभेसमोर निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४४७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील निरुपयोगी लिनन साठा जाळून नष्ट करण्यास तसेच रजिष्टरमधुन निर्लेखित करण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- श्री साईनाथ रुग्णालय)**

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा सुरु करण्यात आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०१** **दि.१९.०८.२०१९ रोजी शिर्डी येथे झालेल्या स्थानिक उपसमिती सभेचे इतिवृत्त वाचुन कायम करणे.**

**निर्णय क्र.४४८** **दिनांक १९.०८.२०१९ रोजी शिर्डी येथे झालेल्या स्थानिक उपसमिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तातील खालील शिफारशींना पुष्टी देण्यात आली.**

**१** **नविन साठवण तलाव या ठिकाणी स्ट्रीट लाईट उभारणी करणे व पॅनेल खरेदी करुन बसविणेकामी उघडण्यात आलेल्या निविदांमधील न्युनत्तम दर निविदाधारकांशी चर्चा/वाटाघाटी होऊन निर्णय होणेबाबत.**

नविन साठवण तलाव याठिकाणी स्ट्रीट लाईट उभारणी करणे व पॅनेल खरेदी करुन बसविणेकामी ऑनलाईन ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती.

| | | |
|---|---|---|
| ०१ | खरेदी करावयाचे साहित्य / वस्तुचा तपशिल | नविन साठवण तलाव याठिकाणी स्ट्रीट लाईट उभारणी करणे व पॅनेल खरेदी करुन बसविणेकामी. |
| ०२ | मागणी | - |
| ०३ | ई-निविदा प्रसिध्दी | दि.१९-०६-२०१९ ते दि.११-०७-२०१९ |
| ०४ | वृत्तपत्राच्या अधिसुचनेच्या व्यतिरिक्त चौकशी कशी पाठवली जाते ? | www.mahatenders.gov.in, संस्थान वेबसाईट, दि.१९-०६-२०१९ दै.सकाळ, पुणे व दै.लोकमत, अहमदनगर या वर्तमानपत्रात व ठेकेदारांना ई-मेल व्दारे. |
| ०५ | तर तसे, कोणाला पाठविले ? | दि.१७-०६-२०१९ रोजी ८२ ठेकेदारांना ई-मेलव्दारे. |
| ०६ | निविदा सुरु झालेची दिनांक व वेळ | दि.१९-०६-२०१९, वेळ सकाळी १०.०० वाजेपासून<br>टेक्निकल बीड दि. १८-०७-२०१९<br>कमर्शियल बीड दि. २४-०७-२०१९ |
| ०७ | प्राप्त निविदाकारांची संख्या. | ०४ |
| ०८ | पात्र निविदाकारांची संख्या. | ०४ |
| ०९ | सर्व निविदाकारांनी नमुने दिली आहेत का. | नमुने मागविण्यात आले नाही. |
| १० | सर्व निविदाकारांनी बयाणा रक्कम आदा केली आहे का. | सर्व निविदाकारांनी बयाणा रक्कम भरलेली आहे. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ११ | जर नमुने दिले नाही, तर का. | | ई-निविदेत नमूद केले आहे. | |
| १२ | निविदाकारांनी सादर केलेले दर- | | | |
| | अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | | ई-निविदा रक्कम रुपये |
| | १ | मे.ओम पॉवर सिस्टिम,रायगड | | रु. १७,९६,५७९/- |
| | २ | मे.राजसन इलेक्ट्रॉनिक्स, नाशिक | | रु. १९,८०,७८६/- |
| | ३ | मे.साई सिद्धी एंटरप्राईजेस, राहाता | | रु. १७,०९,८२०/- |
| | **४** | **मे.एकविरा इलेक्ट्रिकल वर्क्स ॲण्ड सर्व्हीसेस,नाशिक** | | **रु. १४,५१,९३०/-** |
| १३ | यापुर्वी केलेल्या खरेदीचा तपशील आणि खरेदी दर | | | |
| | अ.क्र. | वर्ष | परिमाण | दर प्रती सेट रु. |
| | - | - | - | - |
| १४ | मागील वर्षात वापरण्यात आलेल्या परिमाणाचा तपशिल- | | | |
| | अ.क्र. | तपशिल | वर्ष | खर्च परिमाण |
| | - | - | - | - |
| १५ | सध्याची शिल्लक स्थिती | | - | |
| १६ | मागील खरेदी दर | | - | |
| १७ | मागील पुरवठादार | | - | |
| १८ | सध्याचे न्युनतम निविदाकाराने सादर केलेले दर | | रु. १४,५१,९३०/- | |
| १९ | सध्याचे न्युनतम निविदाकाराचे नाव | | मे.एकविरा इलेक्ट्रिकल वर्क्स ॲण्ड सर्व्हीसेस,नाशिक | |
| २० | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला आहे का. | | होय. | |
| २१ | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला असल्यास उपस्थितींची नावे. | | मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, मा.उप मुख्य कार्यकारीअधिकारी, मा.मुख्य लेखाधिकारी, मा.प्र.कार्यकारी अभियंता आणि उपकार्यकारी अभियंता (विद्युत) | |
| २२ | इस्टिमेट कॉस्ट | | रु. २१,६७,९४८/- | |
| २३ | घाऊक आणि किरकोळ दर यांचे तपशील अदांजे रु. ----- प्रति सेट मार्केट रेट रु. ---- | | | |
| २४ | मागील खरेदी | सध्याचे प्राप्त दर | फरक | % ने कमी / जास्त |
| | - | - | - | - |

२५). संक्षिप्त टिप:- विद्युत विभागाचे मागणीप्रमाणे नविन साठवण तलाव याठिकाणी स्ट्रीट लाईट उभारणी करणे व पॅनेल खरेदी करुन बसविणेकामी ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या.

सदर ई-निविदेमध्ये ०४ निविदाकारांनी भाग घेतला होता. याकामी तांत्रिक निविदेमध्ये पात्र ठरलेल्या चार निविदाधारकांच्या कमर्शियल निविदा दि.२४-०७-२०१९ रोजी उघडण्यात आल्या. यामध्ये उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील गडद व अधोरेखीत केलेले मे.एकविरा इलेक्ट्रिकल वर्क्स ॲण्ड सर्व्हीसेस,नाशिक यांचे न्युनतम दर रु.१४,५१,९३०/- येत आहे.

तरी न्युनतम दरधारक मे.एकविरा इलेक्ट्रिकल वर्क्स ॲण्ड सर्व्हीसेस,नाशिक यांचेशी ई-निविदेत दिलेल्या न्यनतम दराबाबत चर्चा / वाटाघाटी होऊन निर्णय होणेकामी सदरचा विषय मा.स्थानिक उपसमितीचे सभेत शिफारशीसाठी सादर.

**प्रस्तुत प्रकरणी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम निविदाधारक मे.एकविरा इलेक्ट्रिकल वर्क्स ॲण्ड सर्व्हीसेस,नाशिक यांचे प्रतिनिधी श्री.माधव बिरारी हे आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. उपसमितीने त्यांचेशी दर कमी करणेबाबत चर्चा केली असता त्यांनी दर कमी करणेस असमर्थता दर्शविली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, नविन साठवण तलाव या ठिकाणी स्ट्रीट लाईट उभारणी करणे व पॅनेल खरेदी करुन बसविणेकामी निम्नतम निविदाधारक मे.एकविरा इलेक्ट्रिकल वर्क्स ॲण्ड सर्व्हीसेस,नाशिक यांचे सर्व करांसहीत रक्कम रु. १४,५१,९३०/-मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

**(कार्यवाही- विद्युत विभाग)**

---

**२ श्री साई प्रसादालय, साई धर्मशाळा, साईबाबा भक्तनिवासस्थान व इंग्लिश मिडीयम स्कुल या ठिकाणच्या कार्यालयाचे व सबस्टोअर रुमचे दरवाज्यांवर कंट्रोल स्विच बसविणेकामी उघडण्यात आलेल्या निविदांमधील न्युनत्तम दर निविदाधारकांशी चर्चा वाटाघाटी होऊन निर्णय होणेबाबत.**

श्री साई प्रसादालय, साई धर्मशाळा, साईबाबा भक्तनिवासस्थान व इंग्लिश मिडीयम स्कुल याठिकाणच्या कार्यालयाचे व सबस्टोअर रुमचे दरवाज्यांवर कंट्रोल स्वीच बसविणेकामी ऑनलाईन ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती.

| | | |
|---|---|---|
| ०१ | खरेदी करावयाचे साहित्य / वस्तुचा तपशिल | श्री साई प्रसादालय, साई धर्मशाळा, साईबाबा भक्तनिवासस्थान व इंग्लिश मिडीयम स्कुल याठिकाणच्या कार्यालयाचे व सबस्टोअर रुमचे दरवाज्यांवर कंट्रोल स्वीच बसविणे. |
| ०२ | मागणी | - |
| ०३ | ई-निविदा प्रसिध्दी | दि.१९-०६-२०१९ ते दि.१९-०७-२०१९ |
| ०४ | वृत्तपत्राच्या अधिसुचनेच्या व्यतिरिक्त चौकशी कशी पाठवली जाते ? | www.mahatenders.gov.in, संस्थान वेबसाईट, दि.१९-०६-२०१९ दै.लोकमत, अहमदनगर व दै.पुण्यनगरी, पुणे या वर्तमानपत्रात व ठेकेदारांना ई-मेल व्दारे. |
| ०५ | तर तसे, कोणाला पाठविले ? | दि.१७-०६-२०१९, दि.०४-०७-२०१९ व दि.११-०७-२०१९ रोजी ८२ ठेकेदारांना ई-मेलव्दारे. |
| ०६ | निविदा सुरु झालेची दिनांक व वेळ | दि.१९-०६-२०१९, वेळ सकाळी १०.०० वाजेपासून<br>टेक्निकल बीड दि. २४-०७-२०१९, कमर्शियल बीड दि. ०३-०८-२०१९ |
| ०७ | प्राप्त निविदाकारांची संख्या. | ०३ |
| ०८ | पात्र निविदाकारांची संख्या. | ०३ |
| ०९ | सर्व निविदाकारांनी नमुने दिली आहेत का. | नमुने मागविण्यात आले नाही. |
| १० | सर्व निविदाकारांनी बयाणा रक्कम आदा केली आहे का. | सर्व निविदाकारांनी बयाणा रक्कम भरलेली आहे. |
| ११ | जर नमुने दिले नाही, तर का. | ई-निविदेत नमूद केले आहे. |
| १२ | निविदाकारांनी सादर केलेले दर- | |

| | अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | ई-निविदा रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| | १ | मे.लक्ष्मी एंटरप्राईजेस, नाशिक | रु. ४,९०,२५१/- |
| | **२** | **मे.साई सिद्धी एंटरप्राईजेस, राहाता** | **रु. ४,०६,३८०/-** |
| | ३ | मे.श्री बनशंकरी एंटरप्राईजेस डोंबिवली (ई) | रु. ७,२०,७०७/- |

| १३ | यापुर्वी केलेल्या खरेदीचा तपशील आणि खरेदी दर | | | |
|---|---|---|---|---|
| | अ.क्र. | वर्ष | परिमाण | दर प्रती सेट रु. |
| | - | - | - | - |
| १४ | मागील वर्षात वापरण्यात आलेल्या परिमाणाचा तपशिल- | | | |
| | अ.क्र. | तपशिल | वर्ष | खर्च परिमाण |
| | - | - | - | - |

| | | |
|---|---|---|
| १५ | सध्याची शिल्लक स्थिती | - |
| १६ | मागील खरेदी दर | - |
| १७ | मागील पुरवठादार | - |
| १८ | सध्याचे न्युनतम निविदाकाराने सादर केलेले दर | रु. ४,०६,३८०/- |
| १९ | सध्याचे न्युनतम निविदाकाराचे नाव | मे.साई सिद्धी एंटरप्राईजेस, राहाता |
| २० | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला आहे का. | होय. |
| २१ | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला असल्यास उपस्थितींची नावे. | मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, मा.उप मुख्य कार्यकारीअधिकारी, मा.मुख्य लेखाधिकारी,<br>मा.प्र.कार्यकारी अभियंता आणि उपकार्यकारी अभियंता (विद्युत) |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २२ | इस्टिमेट कॉस्ट | | रु. ४,१९,२३८.६४ | |
| २३ | घाऊक आणि किरकोळ दर यांचे तपशील अदांजे रु. ----- प्रति सेट मार्केट रेट रु. ---- | | | |
| २४ | मागील खरेदी | सध्याचे प्राप्त दर | फरक | % ने कमी / जास्त |
| | - | - | - | - |

२५). संक्षिप्त टिप:- विद्युत विभागाचे मागणीप्रमाणे श्री साई प्रसादालय, साई धर्मशाळा, साईबाबा भक्तनिवासस्थान व इंग्लिश मिडीयम स्कुल याठिकाणच्या कार्यालयाचे व सबस्टोअर रुमचे दरवाज्यांवर कंट्रोल स्वीच बसविणेकामी ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या.

सदर ई-निविदेमध्ये ०३ निविदाकारांनी भाग घेतला होता. याकामी तांत्रिक निविदेमध्ये पात्र ठरलेल्या तीन निविदाधारकांच्या कमर्शियल निविदा दि.०३-०८-२०१९ रोजी उघडण्यात आल्या. यामध्ये उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील गडद व अधोरेखीत केलेले मे.साई सिद्धी एंटरप्राईजेस, राहाता यांचे न्युनतम दर रु. ४,०६,३८०/- येत आहे.

तरी न्युनतम दरधारक मे.साई सिद्धी एंटरप्राईजेस, राहाता यांचेशी ई-निविदेत दिलेल्या न्यनतम दराबाबत चर्चा / वाटाघाटी होऊन निर्णय होणेकामी सदरचा विषय मा.स्थानिक उपसमितीचे सभेत शिफारशीसाठी सादर.

**प्रस्तुत प्रकरणी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम निविदाधारक मे.साई सिद्धी एंटरप्राईजेस, राहाता हे आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. उपसमितीने त्यांचेशी दर कमी करणेबाबत चर्चा केली असता त्यांनी दर कमी करणेस असमर्थता दर्शविली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालय, साई धर्मशाळा, साईबाबा भक्तनिवासस्थान व इंग्लिश मिडीयम स्कुल या ठिकाणच्या कार्यालयाचे व सबस्टोअर रुमचे दरवाज्यांवर कंट्रोल स्विच बसविणेकामी निम्नतम निविदाधारक मे.साई सिद्धी एंटरप्राईजेस, राहाता यांचे सर्व करांसहीत रक्कम रु.४,०६,३८०/-मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

**(कार्यवाही- विद्युत विभाग)**

---

**३ श्री साईबाबा संस्थान परिसरात लावणेत आलेल्या सर्व वॉटर कुलरचे एक वर्ष कालावधीकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रक्ट देणेकामी प्राप्त ई-निविदेतील निम्नत्तम दरधारकाशी चर्चा वाटाघाटी करणेबाबत.**

| | | |
|---|---|---|
| ०१ | कामाचे नांव | श्री साईबाबा संस्थान परिसरात लावणेत आलेल्या सर्व वॉटर कुलरचे एक वर्ष कालावधीकरीता वार्षिक कॉम्प्रसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रक्ट देणेकामी. |
| ०२ | प्रशासकीय मान्यता | मा. व्यवस्थापन समिती दिनांक २६/०२/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र. १२२ |
| ०३ | अंदाजे खर्च | रु. ६,००,०००/- |
| ०४ | प्रस्तावाची थोडक्यात माहिती. | श्री साईबाबा संस्थान परिसरात लावणेत आलेल्या सर्व वॉटर कुलरचे एक वर्ष कालावधीकरीता वार्षिक कॉम्प्रसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रक्ट (CAMC) देणेकरीता ई-निविदा मागविणेस व याकामी येणा-या रुपये ६,००,०००/- मात्रचे अपेक्षित खर्चास मा. व्यवस्थापन समिती दिनांक २६/०२/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र. १२२ अन्वये मान्यता घेणेत आलेली आहे. |
| ०५ | ई-निविदा तपशिल - | ई निविदा नोटीस महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर अपलोड करण्यात आली होती. ई निविदा अपलोड करण्याची मुदत दिनांक १८.०६.२०१९ ते दिनांक २६.०६.२०१९ पर्यंत देण्यात आली होती. मात्र मुदतीत दोनच निविदा प्राप्त झालेली असल्याने दिनांक ०४.०७.२०१९ पर्यंत मुदतवाढ देणेत आली. सदर मुदतीत दोनच निविदा प्राप्त झालेल्या असल्याने दिनांक ११.०७.२०१९ पर्यत दुस-यांदा मुदतवाढ देणेत आली होती. |
| | I. कामाची मुदत | ३६५ दिवस |
| | II. तांत्रिक निविदा उघडण्याची दिनांक व वेळा | दिनांक १८/०७/२०१९ सकाळी ११ : ०० वाजता |
| | III. प्राप्त ई-निविदा | ०२ |

| | | |
|---|---|---|
| | IV. प्राप्त ई-विदाधारकांनी सर्व आवश्यक कागदपत्रे ऑनलाईन जमाकेले आहेत का ? | होय |
| | V. सर्व निविदाधारकांनी EMD भरलेले कागदपत्रे जमा केले आहेत का ? | होय |
| | VI. मागील वर्षाकरीता निम्नत्तम दर रूपये | -<br>,७०,०००/- |
| | VII. मागील निम्नत्तम दर धारक | - मे. हेरंब एंटरप्राईजेस, जळगाव |

ई-निविदा प्रक्रियातील तांत्रिकदृष्टया पात्र निविदाधारकांनी दिलेल्या दराचा तपशील.

| अ.नं. | निविदाधारकांचे नाव | ई-निविदेतील प्राप्त दर रक्कम | शेरा |
|---|---|---|---|
| १. | मे. कैलास रेफ्रिजरेशन वर्क्स, मुंबई | 5,25,200.00 | L - 1 |
| २. | मे. हेरंब एंटरप्राईजस, जळगाव | 5,41,960.00 | L - 2 |

उपरोक्त तपशिला नुसार,

श्री साईबाबा संस्थान परिसरात लावणेत आलेल्या सर्व वॉटर कुलरचे एक वर्ष कालावधीकरीता वार्षिक कॉम्प्रसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रक्ट (CAMC) देणेकरीता मे. कैलास रेफ्रिजरेशन वर्क्स, मुंबई यांचे रक्कम रुपये - 5,25,200/- (अक्षरी रक्कम रूपये - पाच लाख, पंचवीस हजार, दोनशे) मात्र निम्नत्तम असुन त्यांचेशी प्राप्त दराबाबत चर्चा / वाटा घाटी करून पुढील कार्यवाही करणे करीता मा. व्यवस्थापन समिती सभेस शिफारस करणेकामी सदरचा प्रस्ताव मा. उपसमितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**प्रस्तुत प्रकरणी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम निविदाधारक मे. कैलास रेफ्रिजरेशन वर्क्स, मुंबई हे आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी अनुपस्थित होते. तथापी त्यांनी ई-निविदेत नमुद केलेले दर अंतिम असल्याचे ई-मेल व्दारे कळविले आहे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थान परिसरात लावणेत आलेल्या सर्व वॉटर कुलरचे एक वर्ष कालावधीकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रक्ट देणेकामी निम्नतम निविदाधारक मे. कैलास रेफ्रिजरेशन वर्क्स, मुंबई यांचे सर्व करांसहीत रक्कम रु.५,२५,२००/-मात्र अंतिम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

**(कार्यवाही- मेकॅनिकल विभाग)**

---

४ **श्री साई प्रसादालयात चपाती व पुरीचा आटा मळणी करणेकरीता चार नविन आटा मळणी मशिन्स खरेदी कामी प्राप्त ई-निविदेतील निम्नत्तम दरधारकाशी चर्चा/वाटाघाटी करणेबाबत.**

| | | |
|---|---|---|
| १ | कामाचे नाव | श्री साईप्रसादालयात चार नविन आटा मळणी मशिन्स खरेदी |
| २ | प्रशासकिय मान्यता | मा. व्यवस्थापन समिती दिनांक ३०.०१.२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. ६४ |
| ३ | अंदाजे खर्च | रु. १४,१६,०००/- |
| ४. | प्रस्तावाची थोडक्यात माहीती | श्री साईप्रसादालयात चपाती व पुरीचा आटा मळणी करणेकरीता चार नविन आटा मळणी मशिन्स खरेदी कामीविहीत पद्धतीने ई निविदा राबविणेस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु. रु. १४,१६,०००/- मात्रचे खर्चास मा. व्यवस्थापन समिती दिनांक ३०.०१.२०१९ रोजीचे सभेतील निर्णय कं. ६४ मान्यता मिळालेली आहे. |
| ५ | ई निविदा तपशिल | ई निविदा नोटीस महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या बेबसाईटवर अपलोड करण्यात आली होती. ई निविदा अपलोड करण्यची मुदत दिनांक ०९.०७.२०१९ ते २२.०८.२०१९ देणेत आली होती. |
| | I. कामाची मुदत | ६० दिवस |
| | II. तांत्रिक निविदा उघडणेची दिनांक व वेळ | दिनांक ३.०८.२०१९ दिनांक ११.०० वा. |

| | | |
|---|---|---|
| | III. प्राप्त ई निविदा | ०४ |
| | IV. प्राप्त ई निविदा धारकांनी सर्व आवश्यक कागदपत्रे ऑनलाईन जमा केले आहेत का ? | होय |
| | V. सर्व निविदा धारकांनी EMD भरलेले कागदपत्र जमा केले आहेत का ? | होय |
| | VI. मागील वर्षाकरीता निम्नत्तम दर रु. | -- |
| | VII. मागील निम्नत्तम दरधारक | -- |

ई निविदा प्रक्रियातील तांत्रिक दुष्टया पात्र निविदाधारकांनी दिलेल्या दराचा तपशिल

| अ नं. | निविदाधारकांचे नाव | नग | निविदेतील प्रती नग दर रक्कम रु. | एकुण दर रक्कम रुपये | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्रविन ॲन्ड कंपनी मुंबई | ४ | २,७६,१००/- | ११,०४,४००/- | L1 |
| २ | आर्या इंजिनिअरींग, पुणे | ४ | ३,४८,०००/- | १३,९२,०००/- | L 3 |
| ३ | मे. सायनर्जी स्टॅम्पींगस, नाशिक | ४ | २,८०,८४०/- | ११,२३,३६०/- | L 2 |
| ४ | जय किशन मशिन टुल्स, मोरबी | ४ | ३,८३,५००/- | १५,३४,०००/- | L 4 |

उपरोक्त तपशिलानुसार श्री साईप्रसादालयात चार नविन आटा मळणी मशिन्स खरेदीकामी मे. प्रविण ॲन्ड कं. , मुंबई यांचे दर रक्कम रुपये ११,०४,४००/- ( अक्षरी रक्कम रुपये आकरा लाख चार हजार चारशे मात्र) निम्नत्तम असून त्यांचेशी प्राप्त दराबाबत चर्चा व वाटाघाटी करुन पुढिल कार्यवाही करणेकरीता सदरचा विषय मा.स्थानिक उपसमिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**प्रस्तुत प्रकरणी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम निविदाधारक मे.प्रविण ॲन्ड कं., मुंबई हे आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी अनुपस्थित होते. तथापी त्यांनी ई-निविदेत नमुद केलेले दर अंतिम असल्याचे ई-मेल व्दारे कळविले आहे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालयात चपाती व पुरीचा आटा मळणी करणेकरीता चार नविन आटा मळणी मशिन्स खरेदी कामी निम्नतम निविदाधारक मे.प्रविण ॲन्ड कं., मुंबई यांचे सर्व करांसहीत रक्कम रु.११,०४,४००/-मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

**(कार्यवाही- मेकॅनिकल विभाग)**

---

५ **श्री साईबाबा भक्तनिवासस्थान येथील रुम्स मधील लोखंडी वस्तुचे रंगकाम करणेकामी प्राप्त ई-निविदेतील निम्नत्तम दरधारकाशी चर्चा/वाटाघाटी करणेबाबत.**

| | | |
|---|---|---|
| १ | कामाचे नाव | श्री साईबाबा भक्तनिवासस्थान येथील रुम्स मधील लोखंडी वस्तुचे रंगकाम करणे |
| २ | प्रशासकिय मान्यता | मा. व्यवस्थापन समिती दिनांक ६.०६.२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. २८८ |
| ३ | अंदाजे खर्च | रु. ११,१३,३५०/- |
| ४. | प्रस्तावाची थोडक्यात माहीती | श्री साईबाबा भक्निवासस्थान खोल्यामधील लोखंडी कॉट, रॅक, टिपॉय व आरशा फ्रेम यांना कलर (स्प्रे पेंटींग ) देणेकामी विहीत पद्धतीने ई निविदा राबविणेस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु. ११,१३,३५०/-मात्रचे खर्चास मा. व्यवस्थापन समिती दिनांक ६.६.२०१९ रोजीचे सभेतील निर्णय कं. २८८ मान्यता मिळालेली आहे. |
| ५ | ई निविदा तपशिल | ई निविदा नोटीस महाराष्ट शासनाच्या www.mahatenders.gov.inया बेबसाईटवर अपलोड करण्यात |

| | | |
|---|---|---|
| | | आली होती. ई निविदा अपलोड करण्यची मुदत दिनांक २६.०७.२०१९ ते १.०८.२०१९ देणेत आली होती. |
| | I. कामाची मुदत | ९० दिवस |
| | II. तांत्रिक निविदा उघडणेची दिनांक व वेळ | दिनांक ३.०८.२०१९ दिनांक ११.०० वा. |
| | III. प्राप्त ई निविदा | ०३ |
| | IV. प्राप्त ई निविदा धारकांनी सर्व आवश्यक कागदपत्रे ऑनलाईन जमा केले आहेत का ? | होय |
| | V. सर्व निविदा धारकांनी EMD भरलेले कागदपत्र जमा केले आहेत का ? | होय |
| | VI. मागील वर्षाकरीता निम्नत्तम दर रु. | -- |
| | VII. मागील निम्नत्तम दरधारक | -- |

ई निविदा प्रक्रियातील तांत्रिक दुष्ट्या पात्र निविदाधारकांनी दिलेल्या दराचा तपशिल

| अ नं. | निविदाधारकांचे नाव | निविदेतील प्राप्त दर रक्कम रु. | शेरा |
|---|---|---|---|
| १ | शिदे स्वप्निल भाऊसाहेब, सिन्नर | १९,९७,८२७.२० | L 2 |
| २ | साई इंजिनिअरींग वर्क्स, वैजापुर | ३९,५२,३००.०० | L 3 |
| ३ | विजया पेन्टस, शिर्डी | ७,१५,७७०.०० | L 1 |

उपरोक्त तपशिलानुसार श्री साईबाबा भक्निवासस्थान खोल्यामधील लोखंडी कॉट, रॅक, टिपॉय व आरशा फ्रेम यांना कलर (स्प्रे पेंटींग) देणेकामी मे.विजया पेन्टस, शिर्डी यांचे दर रक्कम रुपये ७,१५,७७०/- (अक्षरी रक्कम रुपये सात लाख पंधरा हजार सातशे सत्तर मात्र) निम्नत्तम असून त्यांचेशी प्राप्त दराबाबत चर्चा व वाटाघाटी करुन पुढिल कार्यवाही करणेकरीता सदरचा विषय मा.स्थानिक उपसमिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**प्रस्तुत प्रकरणी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम निविदाधारक मे.विजया पेन्टस, शिर्डी यांचे प्रतिनिधी श्री.प्रताप पाडेकर हे आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. उपसमितीने त्यांचेशी दर कमी करणेबाबत चर्चा केली असता त्यांनी दर कमी करणेस असमर्थता दर्शविली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा भक्तनिवासस्थान येथील रुम्स मधील लोखंडी वस्तुचे रंगकाम करणेकामी निम्नतम निविदाधारक मे.विजया पेन्टस, शिर्डी यांचे सर्व करांसहीत रक्कम रु.७,१५,७७०/-मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

**(कार्यवाही- मेकॅनिकल विभाग)**

---

६ **श्री साईबाबा संस्थानचे ॲडव्होकेट पॅनलवर नेमणूक देणेबाबत ॲड संदेश एच.पोटे, मुंबई यांचा अर्ज.**

श्री संदेश एच. पोटे, ॲडव्होकेट हायकोर्ट, स्पेशल पब्लीक प्रोसीक्युटर, मुंबई यांनी संस्थान ॲडव्होकेटपॅनलवर नेमणुक करणेकामीचा दि. ०४/०४/२०१९ रोजी विनंती अर्ज केलेला आहे. सदर अर्जात त्यांनी नमुद केले की त्यांना विविध न्यायालयात, वेगवेगळ्या कोर्ट केसेसमध्ये कामकाज केले बाबतचा १५ वर्षे वकीली व्यवसायाचा अनुभव आहे.

विधी विभागामार्फत कोर्ट केसेससाठी वार्षिक रु.१९,८०,०००/- मात्र अंदाजपत्रकीय तरतूद असून ब-याचशा केसेसमध्ये ॲडव्होकेट पॅनलवरील ॲडव्होकेट्स फी घेत नाहीत. सध्या संस्थान ॲडव्होकेट पॅनलवर खालील ॲडव्होकेटस् नियुक्त आहेत.

| अ.नं. | ॲडव्होकेटचे नाव | त्यांचेकडे असलेल्या प्रकरणांची संख्या |
|---|---|---|
| मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे संस्थानचे पॅनलवर ॲडव्होकेटसची नेमणूक केलेली नाही. परंतु खालील ॲडव्होकेटसना कामकाजासाठी नियुक्त केलेले आहे. | | |
| १ | ॲड.श्री.संजय खर्डे, कोल्हार | ०१ |
| मा.उच्च न्यायालय, मुंबई | | |
| २ | ॲड. श्री.कुलदिप एस. पाटील, मुंबई | ०१ |
| ३ | ॲड. श्री.सचिन शानबाग, मुंबई | ०१ |
| ४ | ॲड. श्री.विनोद शहा, मुंबई | आजपर्यंत काम दिलेले नाही. |
| ५ | ॲड. श्री.आर.आय. जोशी | आजपर्यंत काम दिलेले नाही. |
| मा.उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद | | |
| ६ | ॲड. श्री.आर.एन. धोर्डे, औरंगाबाद (सिनीयर कौन्सील) | ०६ |
| ७ | ॲड. श्री.अनिल बजाज, औरंगाबाद (सिनीयर कौन्सील) | आजपर्यंत काम दिलेले नाही. |
| ८ | ॲड. श्री.विनायक होन, औरंगाबाद (सिनीयर कौन्सील) | आजपर्यंत काम दिलेले नाही. |
| ९ | ॲड. श्री.नितिन भवर, औरंगाबाद | २७ |
| १० | ॲड. श्री.संजय आर. चौकीदार, औरंगाबाद | ०३ |
| ११ | ॲड. श्री.राजेंद्र रघुवंशी, औरंगाबाद<br>(सध्या औरंगाबाद येथे प्रॅक्टीस करत नाही.) | आजपर्यंत काम दिलेले नाही. |
| १२ | ॲड. श्री.बाबासाहेब वाघ, औरंगाबाद<br>(यांची न्यायाधीश म्हणून नेमणूक झालेली आहे. ) | आजपर्यंत काम दिलेले नाही. |
| १३ | ॲड. श्री.संदिप एकनाथ गोंदकर, शिर्डी | सध्या संस्थानचे कामकाज दिलेले नाही. |
| **मा.जिल्हा व सत्र न्यायालय, अहमदनगर** | | |
| १४ | ॲड. श्री.अशोक पाटील, अहमदनगर | १५ |
| १५ | ॲड. श्री.ए.आर. गाडेकर, राहुरी | सध्या संस्थानचे कामकाज दिलेले नाही. |
| १६ | ॲड. श्री.प्रसन्न बिंगी, अहमदनगर | आजपर्यंत काम दिलेले नाही. |
| १७ | ॲड. श्री.संजय सलालकर, अहमदनगर | आजपर्यंत काम दिलेले नाही. |
| १८ | ॲड. श्री.दत्तात्रय वाय. जंगले, अहमदनगर | आजपर्यंत काम दिलेले नाही. |
| **मा.अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय, कोपरगाव** | | |
| १९ | ॲड. श्री.एम. पी. गुजराथी, कोपरगाव | ०३ |
| २० | ॲड. श्री.एस.डी. कुलकर्णी, कोपरगाव | १४ |
| २१ | ॲड. श्री.एस.एम.वाघ, कोपरगाव | ०१ |
| २२ | ॲड. श्री.आर. एस. जपे, कोपरगाव | ०३ |
| २३ | ॲड. श्री.रमेशचंद्र ठोळे, कोपरगाव | आजपर्यंत काम दिलेले नाही. |
| २४ | ॲड. श्री.मच्छिंद्र खिल्लारी, कोपरगाव | आजपर्यंत काम दिलेले नाही. |
| २५ | ॲड. श्री.आर.के. वाघ, कोपरगाव | आजपर्यंत काम दिलेले नाही. |
| २६ | ॲड. सौ.नंदा लहाडे, कोपरगाव | आजपर्यंत काम दिलेले नाही. |
| **मा.दिवाणी कनिष्ठ स्तर न्यायालय, राहाता** | | |
| २७ | ॲड. श्री.जे.के. गोंदकर, शिर्डी | ०८ |
| २८ | ॲड. श्री.बी.व्ही.कोते, शिर्डी | आजपर्यंत काम दिलेले नाही. |
| २९ | ॲड. श्री.राजेश व्ही. नाईक, राहाता | आजपर्यंत काम दिलेले नाही. |
| ३० | ॲड. श्री.पी.बी.बावके, राहाता | आजपर्यंत काम दिलेले नाही. |
| ३१ | ॲड. श्री.ए.डी. गमे, राहाता | आजपर्यंत काम दिलेले नाही. |
| ३२ | ॲड. श्री.नितिन विखे, राहाता | आजपर्यंत काम दिलेले नाही. |
| ३३ | ॲड. श्री.अविनाश जे. बोठे, राहाता | आजपर्यंत काम दिलेले नाही. |

विभागाचा स्पष्ट अभिप्राय-

(१) मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे संस्थानच्या केसेस ज्युरीडिक्शन मुळे खुपच कमी असतात, तेथे दाखल झालेल्या केसेस कालांतराने मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे वर्ग होत असतात.

(२) संस्थानसाठी नवीन अॅडव्होकेट पॅनल नेमणूकीसाठी मा.व्यवस्थापन समितीचे दि.१/६/२०१८, रोजीचे सभेमध्ये प्रस्ताव सादर केला असता, त्यावर निर्णय क्र.३७८ अन्वये, यावर सविस्तर चर्चा होऊन,

मा.अॅड मोहन मोतीराम जयकर, सदस्य यांनी सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालयातील केसेससाठी आणखी वकीलांची नावे सुचवावीत व सदर प्रस्ताव उपसमिती समोर सादर करावा असे ठरलेले आहे.

दरम्यान अॅड. संदेश एच. पोटे,मुंबई यांना संस्थानचे अॅडव्होकेट पॅनलवर नेमणूक होणे बाबत, असा विषय मा. व्यवस्थापन समितीचे दि.६/६/२०१९, रोजीचे सभेत ठेवणेत आलेला होता, त्यावर निर्णय क्र.२०६, अन्वये यावर सविस्तर चर्चा होऊन, "सदर विषय मा. स्थानिक उपसमितीचे सभेसमोर सादर करण्यात येऊन अॅड. संदेश एच. पोटे,मुंबई यांना मुलाखतीसाठी बोलविण्यात यावे , असे ठरले आहे. "

मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयान्वये अॅड. संदेश एच. पोटे,मुंबई यांची मुलाखत घेऊन त्यांची संस्थानचे अॅडव्होकेट पॅनलवर नेमणूक करणे बाबतचा विषय मा.उपसमितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तुत प्रकरणी समिती सदस्य मा.अॅड मोहन जयकर यांचा अभिप्राय घेऊन त्यांचे सल्ल्यानुसार कार्यवाही करण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

**(कार्यवाही- विधी विभाग)**

---

**७ अॅड संदिप सुधाकर देशमुख, मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये संस्थानचे वतीने विनामुल्य कामकाज पाहणेकरीता संस्थानचे अॅडव्होकेट पॅनलवर नेमणूक होणेबाबत.**

उपरोक्त विषयान्वये, अॅड. संदीप सुधाकर देशमुख यांनी दि.०८/०२/२०१९, रोजीचा अर्ज पाठविला असून त्यात त्यांनी खालील प्रमाणे नमुद केले आहे.

"I, the undersigned, am practicing exclusively before the Hon'ble Supreme Court of India as an Advocate. I have been certified to be an "Advocate-On - Record" (AOR) by the Hon'ble Supreme Court of India.

I am desirous of representing the holy Trust before the Hon'ble Supreme Court Of India and hence do hereby grant my consent for consideration of my requisition for being appointed as Standing Counsel on Pro-Bono basis (free of cost) for the shreeSai Baba Sansthan Trust (Shirdi). Please note that, I am interested in representing the Holy Trust at no cost towards conducting the matters/ representing the Trust before the Hon'bleSuperme Court Of India. I hereby also assure to represent the Trust with complete devotion and integrity at my command.

Please find copy of my Curriculum Vitae attached herewith "

मा. सर्वोच्च न्यायालयात संस्थानचे वतीने कामकाज पहाणेकामी संस्थान अॅडव्होकेट पॅनलवर अॅडव्होकेटची नेमणूक केलेली नाही, परंतू आवश्यकते नुसार अॅड. संजय खर्डे, यांना वकीलपत्र देवून कामकाज पाहिले जाते व केलेल्या कामाची वकील फी अदा करण्यात येते.

मा. व्यवस्थापन समितीचे दि.०१.०६.२०१८ रोजीचे सभेत श्री साईबाबा संस्थानसाठी नवीन अॅडव्होकेट पॅनल तयार करणे बाबतचा विषय सादर करणेत आला होता, त्यावर निर्णय क्र.३७८ अन्वये सविस्तर चर्चा होऊन,मा.अॅड मोहन मोतीराम जयकर,सदस्य यांनी सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालयातील केसेससाठी आणखी वकीलांची नावे सुचवावीत व सदर प्रस्ताव उपसमितीसमोर सादर करावा असे ठरले आहे.

दरम्यान अॅड. संदीप सुधाकर देशमुख, यांनी मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये संस्थानचे वतीने विनामुल्य (free of cost) कामकाज पहाणेस तयारी दर्शविली असल्याने त्यांची संस्थानचे अॅडव्होकेट पॅनलवर नियुक्ती करता येईल , असा विषय मा. व्यवस्थापन समितीचे दि.६/६/२०१९, रोजीचे सभेत ठेवणेत आलेला होता, त्यावर निर्णय क्र.२०७, अन्वये यावर सविस्तर चर्चा होऊन, सदर विषय मा. स्थानिक उपसमितीचे सभेसमोर सादर करण्यात येऊन अॅड. संदीप सुधाकर देशमुख यांना मुलाखतीसाठी बोलविण्यात यावे , असे ठरले आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयान्वये ॲड. संदीप सुधाकर देशमुख, यांची मुलाखत घेऊन त्यांची संस्थानचे ॲडव्होकेट पॅनलवर नेमणूक करणे बाबतचा विषय मा.उपसमितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तुत प्रकरणी समिती सदस्य मा.ॲड मोहन जयकर यांचा अभिप्राय घेऊन त्यांचे सल्ल्यानुसार कार्यवाही करण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

**(कार्यवाही- विधी विभाग)**

---

**८ साईबाबा भक्तनिवासस्थान, साईप्रसाद निवासस्थान व व्दारावती भक्तनिवास या विभागाकडील इमारतीमध्ये व परिसरात पेस्ट कंट्रोल (किटकनाशक औषध फवारणी) करणेबाबत.**

संस्थानचे साईबाबा भक्तनिवासस्थान, साईप्रसाद निवासस्थान, व्दारावती निवासस्थान, या विभागाकडील इमारतीमध्ये व परिसरात पेस्ट कंट्रोल (किटकनाशक औषध फवारणी) करणेबाबत ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती.

| | | |
|---|---|---|
| १ | खरेदी करावयाचे साहित्य / वस्तुचा तपशिल. | साईबाबा भक्तनिवासस्थान, साईप्रसाद निवासस्थान व व्दारावती निवासस्थान, या विभागाकडील इमारतीमध्ये व परिसरात पेस्ट कंट्रोल (किटकनाशक औषध फवारणी) करणेबाबत |
| २ | मागणी | पेस्ट कंट्रोल सर्व्हिस (वार्षीक सहा फवारणी) दि.०१.०९.२०१९ ते दि.३१.०८.२०२० |
| ३ | ई-निविदा प्रसिध्दी दिनांक | २१.०७.२०१९ |
| ४ | वृत्तपत्राच्या अधिसुचनेच्या व्यतिरिक्त चौकशी कशी पाठवली जाते ? | www.mahatenders.gov.in, संस्थान वेबसाईट |
| ५ | तर तसे, कोणाला पाठविले ? | ---- |
| ६ | निविदा सुरू झालेची दिनांक व वेळ | दि.२२.०७.२०१९ ते दि.३१.०७.२०१९ सायं. ५ वाजेपर्यंत. |
| ७ | प्राप्त निविदाधारकांची संख्या. | **०८ (आठ)** |
| ८ | पात्र निविदाधारकांची संख्या. | **०५ (पाच)** |
| ९ | सर्व निविदाधारकांनी नमुने दिली आहेत का ? | निविदेत नमुने मागविलेले नाहीत. |
| १० | सर्व निविदाधारकानी बयाणा रक्कम आदा केली आहे का ? | होय |
| ११ | जर नमूने दिले नाही तर का ? | पेस्ट कंट्रोल सर्व्हिस संबधित असल्याने निविदेत नमुने मागविलेले नाहीत. |
| १२ | निविदाधारकांनी सादर केलेले दर – | |

| अ.क्रं | निविदाधारकांचे नाव | सादर केलेले दर प्रती चौ.फुट रु. | स्थिती |
|---|---|---|---|
| १ | PEST TERMINATORS,PUNE. | 1.10 | L1 |
| २ | PEPCOPP PEST CONTROL SERVICES PVT. LTD. MUMBAI . | 1.15 | L2 |
| ३ | HINDUSTAN INSECTICIDES, MUMBAI. | 1.50 | L3 |
| ४ | PEST CONTROL M.WALSHE, MUMBAI. | 1.50 | L3 |
| ५ | CENTRAL WAREHOUSING CARPORATION, NAVI MUMBAI. | 1.98 | L4 |

१३ यापुर्वी केलेल्या खरेदीचा तपशील आणि खरेदी दर –

| अ.क्रं. | वर्ष | परिमाण | दर क्षेत्र प्रती चौ.फुट. रु.पैसे |
|---|---|---|---|
| १ | सन २०१८-२०१९ | **७,७७,२१४/-** | सर्व्हिस चार्जेस दर १.५५ रु.पैसे |

१४ मागील वर्षात वापरण्यात आलेल्या परिमाणाचा तपशिल –

| अ.क्रं. | तपशिल | वर्ष | खर्च परिमाण |
|---|---|---|---|
| १ | पेस्ट कंट्रोल (औषध फवारणी करणेबाबत) | २०१८-२०१९ | **७,७७,२१४/-** |

| | | |
|---|---|---|
| १५ | सध्याची शिल्लक स्थिती | --- |
| १६ | मागील खरेदी दर | सर्व्हिस चार्जेस दर प्रती चौ.फुट १.५५ रु.पैसे |
| १७ | मागील पुरवठादार | सन २०१८-१९ मे. पेस्ट कंट्रोल, एम.वॉल्श, मुंबई |
| १८ | सध्याचे न्युनतम निविदाधारकांचने सादर केलेले दर | १.१० रु. पैसे |

| | | |
|---|---|---|
| १९ | सध्याचे न्युनतम निविदाधारकांचे नाव | **मे. पेस्ट टर्मिनेटर्स, पुणे.** |
| २० | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला आहे का | होय. |
| २१ | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला असल्यास उपस्थितांची नावे. | मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, मा.उपमुख्य कार्यकारी अधिकारी मा.मुख्य लेखाधिकारी तथा प्रशासकिय अधिकारी, मा. प्रशासकीय अधिकारी. |
| २२ | घाऊक आणि किरकोळ दर यांचे तपशील अंदाजे प्रति क्षेत्र.चौ.फुट मार्केट रेट १.५५ रु.पैसे. | |
| २३ | मागील खरेदी   सध्याचे प्राप्त दर   फरक   % ने कमी / जास्त | |
| | १.५५   १.१०   ४५ पैसे | |

संक्षिप्त टीप- मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६/०६/२०१९ रोजीचे विषय नं.५४ व निर्णय क्र.२२६ नुसार यावर सविस्तर चर्चा होऊन, दि.०१/०९/२०१९ ते दि. ३१/०८/२०२० या एक वर्ष कालावधीसाठी साईबाबा भक्तनिवासस्थान , साईप्रसाद निवासस्थान व व्दारावती भक्तनिवास या तिनही विभागांकडील इमारतीमध्ये व परिसरात पेस्ट कंट्रोल करणे कामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणा-या साईबाबा भक्तनिवासस्थान , साईप्रसाद निवासस्थान व व्दारावती भक्तनिवासस्थान विभागासाठी एकत्रित अंदाजे खर्च रक्कम रु.७,२४,५२१.१८/- + रु.१,३०,४१३.८१/-(१८ % GST) अशी एकुण रक्कम रु.८,५४,९३५/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.

सदर कामाचे तीन विभागाकडील क्षेत्रफळ त्यामध्ये साईबाबा भक्तनिवासस्थान-१,७३,२६८.०० चौ.फुट, साईप्रसाद निवासस्थान- ४६,५५४.११ तसेच व्दारावती निवासस्थान- २,०५,११७.०० चौ.फुट या तीनही विभागाचे एकुण क्षेत्रफळ ४,२४,९३९.११ चौ.फुट इतके आहे.

मागणी:- दि.१४/०८/२०१९ रोजी खरेदी समिती सभेसमोर उघडण्यात आलेले कमर्शिअल (वाणिज्यीक) बिड निविदेमध्ये मे. पेस्ट टर्मिनेटर्स,पुणे. यांचे कर वगळुन दर प्रती चौ.फुटास रु.१.१० इतके असून मंजुर दरानुसार रक्कम रु.४,६७,४३३.०२+GST १८% रक्कम ८४,१३७.९४ असे एकुण रक्कम रु. ५,५१,५७०.९६/- (अक्षरी रक्कम रु. पाच लाख एकावन्न हजार पाचशे एकाहत्तर मात्र) इतकी होत असून सदर दरांबाबत चर्चा वाटाघाटी करुन निर्णय होणेकामी सदरचा प्रस्ताव मा. उपसमिती सभेत शिफारशीसाठी सादर.

**प्रस्तुत प्रकरणी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम निविदाधारक मे. पेस्ट टर्मिनेटर्स, पुणे हे आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. उपसमितीने त्यांचेशी दर कमी करणेबाबत चर्चा केली असता त्यांनी दर कमी करणेस असमर्थता दर्शविली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, साईबाबा भक्तनिवासस्थान, साईप्रसाद निवासस्थान व व्दारावती भक्तनिवास या विभागाकडील इमारतीमध्ये व परिसरात पेस्ट कंट्रोल (किटकनाशक औषध फवारणी) करणेकामी निम्नतम निविदाधारक मे. पेस्ट टर्मिनेटर्स, पुणे यांचे प्रति चौरस फुट रु.१.१० प्रमाणे रक्कम रु.४,६७,४३३.०२+GST १८% रक्कम रु. ८४,१३७.९४ असे एकुण रक्कम रु.५,५१,५७०.९६/-मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, तसेच औषध फवारणी करणेपुर्वी संबधीत विभागाने औषधांचा दर्जा तपासून घ्यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा भक्तनिवासस्थान)**

---

**९   श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता खरेदी करावयाचे विविध प्रकारचे मशिनरी/उपकरणांमधील Bi-Pap Ventilator With Accessories खरेदी करणेकामी चर्चा विनिमय करुन पुरवठा आदेश देणेबाबत.**

| | | |
|---|---|---|
| १) | कामाचे नाव | श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता खरेदी करावयाचे विविध प्रकारचे मशिनरी / उपकरणेमधील Bi-Pap Ventilator With Accessories खरेदीकामी चर्चा विनिमय करुन पुरवठा आदेश देणे बाबत |
| २) | प्रशासकीय मान्यता | दि.०८/०१/२०१८ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.५५ |
| ३) | अंदाजपत्रकीय रक्कम | एकत्रित प्रस्ताव रु. ८,१०,५८,२३२/- (Bi-Pap Ventilator With Accessories खरेदीकामी रक्कम रु. ५,००,०००/- चे खर्चास मान्यता |

| | | |
|---|---|---|
| | | मिळालेली आहे.) |
| ४) | प्रस्तावित कामाबाबत माहिती | दि.०८/०१/२०१८ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.५५ अन्वये यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पीटलमधील एकूण १०८ नग व श्री साईनाथ रूग्णालयातील १६ नग असे एकूण १२४ नग मशिन्स पाच वर्ष वॉरंटीसह खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.८,१०,५८,२३२/- मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली होती. त्यामध्ये Bi-Pap Ventilator With Accessories खरेदीकामी रक्कम रु. ५,००,०००/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे. |
| ५) | निविदा तपशिल | अ) प्रथम निविदा मागविणेस मंजूरी :-<br>दि.२६/०१/२०१८रोजीचे मंजूर टिपणीन्वये वर्तमानपत्रात जाहिरात देऊन दि.२०/०२/२०१८ ते दि.१३/०३/२०१८ पर्यंत ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या, तसेच दि.२२/०२/२०१८ रोजीच्या प्री-बिड मिटींग मध्ये निविदाधारकांनी उपस्थित केलेल्या शंकाचे Ammendment तयार करण्यात येऊन दि. २८/०३/२०१८ पर्यंत ऑनलाईन ई-निविदाभरण्याचा कालावधी ठेवण्यात आलेला होता. सदर जाहिरातीबाबत India Mart, Justdial इ. वेबसाईटवर देखील Enquiry टाकण्यात आलेली होती, तसेच आपल्याकडे उपलब्ध असलेल्या पुरवठाधारकांना ई-मेल व फोनद्वारे देखिल कळविले होते. त्यास अनुसरुन सदरहू खरेदीकामी एकही निविदा प्राप्त झालेली नाही,त्यामुळे सदरहू खरेदीकामी शासन निर्णयानुसार -<br>१) दि.२९/०३/२०१८ रोजीचे मंजुर टिपणीन्वये प्रथम मुदतवाढ :- दि.०४/०४/२०१८ पर्यंत, त्यास अनुसरुन एकही ई-निविदा प्राप्त झालेली नाही.<br>२) दि.०५/०४/२०१८ रोजीचे मंजूर टिपणीन्वये दुसरी मुदतवाढ:- दि.०८/०४/२०१८ पर्यंत, ठेवण्यात आली होती.परंतु, सदर मशिनरी खरेदीकामी मुदतवाढ देऊन देखील एकही निविदा प्राप्त झाली नाही, त्यामुळे सदरमशिनरी खरेदीकामी फेर निविदा मागविण्यात आल्या आहेत.<br>ब) दुस-यांदा निविदा मागविणेस मंजूरी:- दि.१६/०४/२०१८ रोजीचे मंजूर टिपणीन्वये वर्तमान पत्रात जाहिरात देऊन दि.०६/०६/२०१८ ते दि.२५/०६/२०१८ या कालावधीत ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या, त्यास अनुसरुन सदर मशिन खरेदीकामी एकही निविदा प्राप्त झालेली नाही, त्यामुळेसदर खरेदीकामी शासन निर्णयानुसार -<br>१) दि.२५/०६/२०१८ रोजीचे मंजूर टिपणीन्वये प्रथम मुदतवाढ:- दि.०२/०७/२०१८ पर्यंत, त्यास अनुसरुन एकही ई-निविदा प्राप्त झालेली नाही.<br>२) दि.०२/०७/२०१८ रोजीचे मंजूर टिपणीन्वये दुसरी मुदतवाढ:- दि.०९/०७/२०१८ पर्यंत ठेवण्यात आली होती.परंतु, सदर खरेदीकामी मुदतवाढ देऊनदेखील एकही निविदा प्राप्त झालेली नाही, त्यामुळे सदर खरेदीकामी फेर निविदा मागविण्यात आलेल्या आहेत.<br>क) तिस-यांदा निविदा मागविणेस मंजुरी:-दि.११/०८/२०१८ रोजीचे मंजूर टिपणीन्वये फेर-ई-निविदा मागविणेस मान्यता घेऊन दि.२४/०९/२०१८ ते दि.१२/१०/२०१८ या कालावधीत फेर ई-निविदा मागविणेत आल्या होत्या. त्यास अनुसरुन एकही निविदा प्राप्त झाली नव्हती, त्यामुळे शासन निर्णयानुसार -<br>१) दि.१२/१०/२०१८ रोजीच्या मंजुर टिपणीन्वये प्रथम मुदतवाढ :- दि. १९/१०/२०१८ पर्यंत त्यास अनुसरुन १ ई निविदा प्राप्त झालेली होती. |

| | | |
|---|---|---|
| | | २) दि.१९/१०/२०१८ रोजीच्या मंजूर टिपणीन्वये दुसरी मुदतवाढ :- दि.२६/१०/२०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. दोन वेळेस मुदतवाढ देऊन देखील एकच ई-निविदा प्राप्त झाल्यामुळे प्राप्त ०१ ऑनलाईन निविदा दि.२९/११/२०१८ रोजीचे मा.खरेदी समितीपुढे उघडण्यात येवून त्यांचा तांत्रीक बाबींचा तक्ता तयार करुन तो बायोमेडिकल विभागाकडुन तपासुन घेण्यात आलेला होता, परंतु प्राप्त निविदाधारक तांत्रिकदृष्ट्या अपात्र झाल्यामुळे फेर निविदा मागविण्यात आलेल्या आहे.<br>ड) चौथ्यांदा निविदा मागविणेस मंजूरी :-<br>दि.१४/०१/२०१९ रोजीचे मंजूर टिपणीन्वये चौथ्यांदा ई-निविदा मागविण्यास मान्यता घेऊन दि.२३/०२/२०१९ ते दि.१५/०३/२०१९ या कालावधीत फेर ई-निविदा मागविणेत आल्या, त्यास अनुसरुन ०२ निविदा प्राप्त झाल्या होत्या, त्यानंतर शासन निर्णयानुसार -<br>१) दि.१६/०३/२०१९रोजीच्या मंजूर टिपणीन्वये प्रथम मुदतवाढ :- दि.२२/०३/२०१९ पर्यंत त्यास अनुसरुन २ ई निविदा प्राप्त.<br>२) दि.२२/०३/२०१९रोजीच्या मंजूर टिपणीन्वये दुसरी मुदतवाढ :- दि.२९/०३/२०१९ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. त्यानुसार, ०३ तांत्रिक निविदा प्राप्त झालेल्या आहेत. |
| अ) | निविदा कालावधी | ३६ दिवस |
| ब) | तांत्रिक लिफाफा उघडणेची दिनांक | दि. . ०५/०६/२०१९ रोजीचे मा.खरेदी समितीचे सभेपुढे समक्ष उघडण्यात आलेल्या आहेत. |
| क) | निविदा प्रक्रियेत भाग घेणा-या ठेकेदारांची संख्या | दि. ३०/०५/२०१९ रोजीचे मंजूर टिप्पणीन्वये प्राप्त झालेल्या ०३ तांत्रिक निविदा उघडण्यासाठी सदरचा मा. खरेदी समिती सभेपुढे प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यानुसार दि. ०५/०६/२०१९ रोजीचे मा. खरेदी समिती सभेपुढे ०३ तांत्रिक निविदा उघडण्यात येऊन, निविदांचा तांत्रिकबाबींचा तक्ता बायोमेडिकल विभागाकडून तपासला असता, त्यामध्ये त्यांनी २ ई – निविदा तांत्रिकदृष्ट्या पात्र ठरवून १ ई – निविदा अपात्र ठरविलेली आहे. |
| ड) | सर्व निविदाधारकांनी संकेत स्थळावर कागदपत्र जमा केले आहेत काय ? | सर्व निविदाधारकांनी संकेत स्थळावर कागदपत्र जमा केले आहेत |
| इ) | सर्व निविदाधारकांनी सुरक्षा अनामत रक्कम (EMD) जमा केली आहे काय ? | होय, जमा केली आहे. |
| ई) | वाणिज्यिक लिफाफा उघडणेची दिनांक | दि.०३/०७/२०१९ रोजीचे मा.खरेदी समितीचे सभेपुढे समक्ष उघडण्यात आलेल्या आहेत. |

६) तांत्रिक दृष्टया पात्र ठेकेदारांच्या वाणिज्यिक देकराचा तपशिल –

| Sr.No | Description of Work / Item(s) | No.of Qty. | Units | Shree Enterprises | | R S Enterprises | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | Rate | Amount | Rate | Amount |
| 1.00 | Bi-PAP Ventilator (Non Invasive Ventilator) with Accessories with five years warranty & Consumables as per Technical Specification for Shri Saibaba Hospital, Shirdi. | 2.00 | Nos. | **500000.00** | **1000000.00** | **208000.00** | **416000.00** |
| 2.00 | List of Accessories:- | | | | | | |
| 2.01 | 1) Reusable Full face mask- Small - 20Nos,Medium 20Nos,Larger 20Nos. | 60.00 | Nos. | **7500.00** | **450000.00** | **3950.00** | **237000.00** |
| 2.02 | 2) Oxygen connector, | 2.00 | Set | **1500.00** | **3000.00** | **1000.00** | **2000.00** |
| 2.03 | 3) Fio2 Monitoring acceseries | 2.00 | Set | **15000.00** | **30000.00** | **21500.00** | **43000.00** |
| 2.04 | 2) Nasal cannula for neonates | 10.00 | Nos. | **1000.00** | **10000.00** | **0.00** | **0.00** |
| 2.05 | 3) Reusable breathing circuit of silicone material (10Nos) Disposable breathing | 110.00 | Nos. | **3500.00** | **385000.00** | **560.00** | **61600.00** |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | circuit (100Nos.) | | | | | | |
| 2.06 | 4) Air & oxygen hose - Each 2 Nos. | 4.00 | Nos. | **1500.00** | **6000.00** | **960.00** | **3840.00** |
| 2.07 | 5) Disposable Heat Moisture Exchanger if any. | 1.00 | Nos. | **18000.00** | **18000.00** | **0.00** | **0.00** |
| 3.00 | CMC Cost- CMC Cost should be including Taxes. It should be fixed for next 5 years. | | | | | | |
| 3.01 | CMC Cost For 6th Year | 2.00 | Nos. | **25000.00** | **50000.00** | **18290.00** | **36580.00** |
| 3.02 | CMC Cost For 7th Year | 2.00 | Nos. | **28000.00** | **56000.00** | **19205.00** | **38410.00** |
| 3.03 | CMC Cost For 8th Year | 2.00 | Nos. | **30000.00** | **60000.00** | **20165.00** | **40330.00** |
| 3.04 | CMC Cost For 9th Year | 2.00 | Nos. | **32000.00** | **64000.00** | **21173.00** | **42346.00** |
| 3.05 | CMC Cost For 10th Year | 2.00 | Nos. | **34000.00** | **68000.00** | **22231.00** | **44462.00** |

७) निम्नत्तम निविदाधारकांचा तपशिल –

| **Sr.No** | **Name of Supplier** | **Description of Work / Item(s)** | **No.of Qty.** | **Units** | **Rate per in Rs.** | **Total Amount in Rs.** |
|---|---|---|---|---|---|---|
| 1.00 | R S Enterprises | Bi-PAP Ventilator (Non Invasive Ventilator) with Accessories with five years warranty & Consumables as per Technical Specification for Shri Saibaba Hospital, Shirdi. | 2.00 | Nos. | **208000.00** | **416000.00** |
| 2.00 | | List of Accessories:- | | | | |
| 2.01 | | 1) Reusable Full face mask- Small - 20Nos,Medium 20Nos,Larger 20Nos. | 60.00 | Nos. | **3950.00** | **237000.00** |
| 2.02 | | 2) Oxygen connector, | 2.00 | Set | **1000.00** | **2000.00** |
| 2.03 | | 3) Fio2 Monitoring acceseries | 2.00 | Set | **21500.00** | **43000.00** |
| 2.04 | | 2) Nasal cannula for neonates | 10.00 | Nos. | **0.00** | **0.00** |
| 2.05 | | 3) Reusable breathing circuit of silicone material (10Nos) Disposable breathing circuit (100Nos.) | 110.00 | Nos. | **560.00** | **61600.00** |
| 2.06 | | 4) Air & oxygen hose - Each 2 Nos. | 4.00 | Nos. | **960.00** | **3840.00** |
| 2.07 | | 5) Disposable Heat Moisture Exchanger if any. | 1.00 | Nos. | **0.00** | **0.00** |
| | | Cost of Consumables | | | | **347440.00** |
| 3.00 | | CMC Cost- CMC Cost should be including Taxes. It should be fixed for next 5 years. | | | | |
| 3.01 | | CMC Cost For 6th Year | 2.00 | Nos. | **18290.00** | **36580.00** |
| 3.02 | | CMC Cost For 7th Year | 2.00 | Nos. | **19205.00** | **38410.00** |
| 3.03 | | CMC Cost For 8th Year | 2.00 | Nos. | **20165.00** | **40330.00** |
| 3.04 | | CMC Cost For 9th Year | 2.00 | Nos. | **21173.00** | **42346.00** |
| 3.05 | | CMC Cost For 10th Year | 2.00 | Nos. | **22231.00** | **44462.00** |
| | | Total CMC Cost | | | | **202128.00** |
| | | Basic Cost + Consumables + CMC | | | | **965568.00** |

निविदा टक्केवारी कमी / अधिक =-१६.८ % कमी

| | | |
|---|---|---|
| ८) | श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुदीनुसार निविदा स्विकारणेचे अधिकार- | मा.व्यवस्थापन समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी |

उपरोक्त तुलनात्मक दरांच्या तक्त्याचा विचार करता M/s. R S Enterprises, Pune यांचे निम्नतम दरानुसार सदर Bi-Pap Ventilator With Accessories चे दर रक्कम रु.४,१६,०००.०० व त्याच्या Accessories खरेदीकामी रक्कम रु.३,४७,४४०/- असे एकूण रक्कम रु.७६३४४०/- इतके तर वॉरंटी कालावधी नंतर करावयाची CMC चे देखील प्रत्येक वर्षानुसार पुढील पाच वर्षाकरीता रक्कम रु. २,०२,१२८/- इतके असे एकूण रक्कम रु.९,६५,५६८/- इतके निम्नतम येत असून सदर Bi-Pap Ventilator With Accessories खरेदीकामी बायोमेडीकल विभागामार्फत फक्त मिशन व ०५ वर्षाची Warranty ची अंदाजे किंमत घेण्यात आली होती. त्यामध्ये Accessories व CMC ची किंमत गृहीत धरण्यात आली नव्हती. सदर Bi-Pap Ventilator With Accessories खरेदीकामी M/s. R S Enterprises,Pune यांना त्यांनी देऊ केलेल्या दरात अजुन सुट मिळणेकामी पुढील समितीचे सभेपुढे चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात यावे असे मत आहे.

त्यानुसार उपरोक्त Bi-Pap Ventilator With Accessories खरेदीकामी M/s. R S Enterprises, Pune यांना त्यांनी देऊ केलेल्या रक्कम रु.७,६३,४४०/- व CMC चे प्रत्येक वर्षानुसार पुढील पाच वर्षाकरीता रक्कम रु. २,०२,१२८/- असे एकूण रक्कम रु.९,६५,५६८/- चे दरात अजुन सुट मिळणेकामी M/s. R S

Enterprises, Pune यांचेबरोबर चर्चा / विनिमय करुन त्यांना पुरवठा आदेश देण्यास तसेच सदरचे खरेदीकामी येणा-या खर्चास मान्यता घेण्यासाठीची शिफारस मा. व्यवस्थापन समितीकडे करणेसाठी सदर प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**प्रस्तुत प्रकरणी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम निविदाधारक M/s. R S Enterprises, Pune यांचे प्रतिनिधी श्री.राकेश मुथा हे आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. उपसमितीने त्यांचेशी दर कमी करणेबाबत चर्चा केली असता त्यांनी दर कमी करणेस असमर्थता दर्शविली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता खरेदी करावयाचे विविध प्रकारचे मशिनरी/उपकरणांमधील Bi-Pap Ventilator With Accessories खरेदी करणेकामी निम्नतम निविदाधारक M/s. R S Enterprises, Pune यांचे सर्व करांसहीत पाच वर्ष वॉरंटीसह रक्कम रु.७,६३,४४०/- व वॉरंटी कालावधी संपल्यानंतर CMC चे प्रत्येक वर्षानुसार पुढील पाच वर्षाकरीता रक्कम रु.२,०२,१२८/- अशी एकूण रक्कम रु.९,६५,५६८/-मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०२** **श्री साईनाथ रुग्णालयाचे प्रशासकीय कार्यालयाचे पुर्व व उत्तर बाजुकडील भागात व अग्निशमन वाहने पार्किंग करणेच्या ठिकाणी पेव्हींग ब्लॉक बसविणे कामाचे अंतिम देयक रक्कम रु.२९,४६,५३७/-मात्र मंजुर होऊन त्यापैकी निव्वळ देय रक्कम रु.७,८०,४९६/-मात्र ठेकेदार यांना आदा करणेस मंजुरी देणे.**

**प्रस्ताव** श्री साईनाथ रुग्णालयाचे प्रशासकीय कार्यालयाचे पुर्व व उत्तर बाजूकडील भागात व अग्निशमन वाहने पार्किंग करणेच्या ठिकाणी पेव्हींग ब्लॉक बसविणेचे काम ठेकेदार स्वप्निल भाऊसाहेब शिंदे, सायळेयांनी पूर्ण केले असून ठेकेदार यांनी सादर केलेल्या पहिले व अंतिम बिलाची सविस्तर तपासणी केलेली आहे. सदर प्रकल्पाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

कामाचे नांव- श्री साईनाथ रुग्णालयाचे प्रशासकीय कार्यालयाचे पुर्व व उत्तर बाजूकडील भागात व अग्निशमन वाहने पार्किंग करणेच्या ठिकाणी पेव्हींग ब्लॉक बसविणे

| | |
|---|---|
| ठेकेदाराचे नांव | स्वप्निल भाऊसाहेब शिंदे, सायळे, ता. सिन्नर |
| कार्यादेश क्रमांक व दिनांक | जा.क्र.एसएसएसटी/बांधकाम/३७८७/२०१८ दि.२५/१०/२०१८ |
| मंजूर निविदा रक्कम | **रु.३०,२७,६६९/-** |
| मा. व्यवस्थापन मंडळ निर्णय क्रमांक व दिनांक | नि.क्र ६१३(१०) दि.०५/१०/२०१८ |
| पहिले व अंतिम बिलाची रक्कम (अ) | **रु.२९,४६,५३७/-** |
| आजपर्यंत अदा केलेली रक्कम (ब) | रु.२१,१४,४४१/- |
| **निव्वळ देय्य रक्कम (अ-ब)** | **रु.७,८०,४९६/-** |
| मंजूर निविदा रकमेपेक्षा कमी अथवा जास्त झालेला खर्च | रु.८१,१३२/- कमी (२.६७९% कमी) |
| करारनाम्यानुसार काम पूर्ण करण्याची मूदत | दि.०३/०२/२०१९ |
| प्रत्यक्ष काम पूर्ण झाल्याचा दिनांक | दि.२५/०७/२०१९ |

श्री साईनाथ रुग्णालयाचे प्रशासकीय कार्यालयाचे पुर्व व उत्तर बाजूकडील भागात व अग्निशमन वाहने पार्किंग करणेच्या ठिकाणी पेव्हींग ब्लॉक बसविणेचे काम ठेकेदार स्वप्निल भाऊसाहेब शिंदे, सायळे, ता. सिन्नर यांना देणेत आलेले होते. सदरहू काम पुर्ण करणेसाठी दि.०३/०२/२०१९ अखेर (०३ महिने) मुदत देणेत आलेली होती. प्रत्यक्षात ठेकेदार यांनी दि.२५/०७/२०१९ रोजी सदरचे काम पुर्ण केले आहे. ठेकेदार यांना सदरचे काम पुर्ण करणेस एकून १७२ दिवस विलंब झालेला आहे. या कामाचे निवीदा शर्तीनूसार ठेकेदार यांचे बिलातून रु.३०० प्रती दिवस याप्रमाणे दंडाची रक्कम रु.५१,६००/- मात्र कपात करणेत आलेली आहे. ठेकेदार यांनी दि.०४/०८/२०१९ रोजीचे पत्रान्वये सदर कामाचे पहिले व अंतिम बिल सादर केले आहे. प्रत्यक्षात काम करतेवेळी काही बाबींचे परीमाणात बचत झाली आहे. त्यामुळे निविदा रकमेपेक्षा रु.८१,१३२/- कमी (२.६७९% कमी) मात्रने प्रत्यक्ष खर्च कमी झालेला आहे. त्यानुसार सदरहू कामाची Gross Value of Work Done **रु.२९,४६,५३७/-** मात्र होत असून यापुर्वी अदा केलेली रक्कम वजा जाता अंतिम बिलापोटी निव्वळ रु.७,८०,४९६/- मात्र इतकी रक्कम देय होत आहे.

प्रस्ताव:- श्री साईनाथ रुग्णालयाचे प्रशासकीय कार्यालयाचे पुर्व व उत्तर बाजूकडील भागात व अग्निशमन वाहने पार्किंग करणेच्या ठिकाणी पेव्हींग ब्लॉक बसविणेचे कामाचे अंतिम देयक रक्कम रु.२९,४६,५३७/- मात्र मंजूर होऊन त्यापैकी निव्वळ देय रक्कम रु.७,८०,४९६/- मात्र ठेकेदार यांना आदा करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.४४९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयाचे प्रशासकीय कार्यालयाचे पुर्व व उत्तर बाजुकडील भागात व अग्निशमन वाहने पार्किग करणेच्या ठिकाणी पेव्हींग ब्लॉक बसविणे कामाचे एकुण बिलाची रक्कम रु.२९,४६,५३७/-मात्र मंजुर करण्यात येऊन त्यापैकी निव्वळ देय रक्कम रु.७,८०,४९६/-मात्र सदर कामाचे ठेकेदार स्वप्निल भाऊसाहेब शिंदे, सायळे, ता.सिन्नर यांना आदा करण्यास मान्यता देण्यात आली. तसेच प्रत्येक कामाचे अंतिम बिल आदा करणेपुर्वी पुर्ण झालेल्या कामाची प्रशासकिय अधिकारी यांचेमार्फत पाहणी करण्यात यावी, असे ठरले.**

**(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०३** **श्री साईनाथ रुग्णालयाच्या मागणीनुसार करावयाचे वाढीव तिसऱ्या मजल्यावरील जादा विद्युत विषयक कामाचे वाढीव खर्चाबाबत.**

**प्रस्ताव-** सर्व्हे नं.१४८ पै.मधील धर्मशाळा क्र.०१ व ०२ या इमारतीवर श्री साईनाथ हॉस्पीटलकरीता तिस-या मजल्याचे बांधकाम करणेचे कामाकरीता बांधकाम विभागामार्फत ठेकेदार मे.आर.के.सावंत यांना कार्यादेश देण्यात आलेला असून सदरचे काम प्रगतीपथावर आहे. बांधकाम विभागामार्फत मे.आर.के.सावंत यांना देण्यात आलेल्या कार्यादेशामध्ये विद्युतीकरणाच्या कामाचा समावेश केलेला नव्हता. त्यामुळे विद्युतीकरणाचे कामाकरीता बांधकाम विभागाकडून नेमणूक करण्यात आलेले आर्किटेक्ट / कन्सल्टंट मे.निकम पाटील असोसिएटस्, श्रीरामपूर यांचेकडून ई-निविदा तयार करुन घेण्यात आलेली होती. त्यानंतर विद्युत विभागामार्फत ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आल्यानंतर मा.व्यवस्थापन समितीचे दि.०७-०३-२०१८ रोजीचे सभेतील विषय क्र.०२ निर्णय क्र.१४० (०८) अन्वये ठेकेदार मे.जय मुंजोबा लाईट हाऊस, अहमदनगर यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना जा.नं.एसएसएसटी/ विद्युत / २३४ / २०१८ दि.१२-०४-२०१८ अन्वये रक्कम रु. ७७,१३,६८६.८० इतक्या रक्कमेचा कार्यादेश देण्यात आलेला असून बांधकामासोबतच विद्युतीकरणाचे कामही प्रगतीपथावर आहे.

आता श्री साईनाथ रुग्णालय (धर्मदाय) यांचे पत्र क्र.SSS/ SSH / प्र.कार्या. / ०५ / २०१९ दि.०६-०४-२०१९ रोजीचे पत्रानुसार श्री साईनाथ रुग्णालयाच्या तिस-या मजल्याच्या बांधकामानंतर रुग्णालयातील विविध विभाग स्थापन करणे व सदर विभागातील फेरबदल करणेचे प्रस्तावास मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६-०२-२०१९ रोजीचे सभेतील विषय क्र.४४ निर्णय क्र.१३९ अन्वये मान्यता मिळालेली असून सदरचे वाढीव मजल्यावरील बांधकामाचे ओ.टी., आर.एम.ओ.रुम्स व स्टोअर इत्यादि अंतर्गत बदल सदर कामाचे ठेकेदार मे.आर.के.सावंत यांचेकडून करुन घेणेस मान्यता मिळालेली असल्याचे कळविलेले आहे.

तसेच श्री साईनाथ (धर्मदाय) रुग्णालय विभाग यांनी पाठविलेल्या पत्रामध्ये तिस-या मजल्यावर श्री साईनाथ रुग्णालयाचे (०१). मेडीकल आय.सी.यु. (०२). आर्थो ओ.टी. (०३). मेल मेडिकल वॉर्ड, (०४). स्पेशल रुम, (०५). फिमेल मेडिकल वॉर्ड, (०६). सी.एस.एस.विभाग, (०७). ऑर्थो वॉर्ड, (०८). कॉन्फरन्स हॉल तसेच (०९). आर.एम.ओ.रुम्स इत्यादी विभाग कार्यरत होणार असून त्यामधील कार्यान्वित करण्यात येणा-या मशिनरीकरीता विद्युत विभागामार्फत सर्वेक्षण करुन मशिनरींना विद्युत पुरवठा पुरविणेबाबतची पुढील कार्यवाही आपले स्तरावर करणेबाबत विद्युत विभागास कळविलेले आहे.

श्री साईनाथ (धर्मदाय) रुग्णालय विभाग यांनी श्री साईनाथ रुग्णालयातील तिस-या मजल्याच्या बांधकामानंतर विविध विभाग स्थापन करणे व सदर विभागातील फेरबदल करणेचे कळविलेप्रमाणे सदर कामाचे आर्किटेक्ट / कन्सल्टंट मे.निकम पाटील असोसिएटस्, श्रीरामपूर यांचे समवेत प्रत्यक्ष पाहणी केली. त्यानुसार श्री साईनाथ रुग्णालयाचे दक्षिणेकडील इमारतीच्या बांधकामामध्ये खालीलप्रमाणे बदल करण्यात आलेले आहे.

०१). जनरल वॉर्ड रद्द करुन ऑपरेशन थिएटरची नं.०१ व ०२ ची निर्मिती करणे.

०२). १८ के.डब्ल्यु.क्षमतेच्या ०३ नग ॲटोक्लेव्ह मशिनरींची उभारणी करणे.

०३). आर.एम.ओ.डॉक्टरकरीता रुम्सची व्यवस्था करणे.

०४). रिकव्हरी रुम बांधणे.

०५). टॉयलेट व बाथरुम बांधकामामध्ये दुरुस्ती करुन तेथे स्टोअर रुमची व्यवस्था करणे.
०६). ऑपरेशन थिएटरची नं.०१ व ०२ तसेच आय.सी.सी.यु.करीता वातानुकुलीत यंत्रणेची उभारणी करणे.

उपरोक्तप्रमाणे बांधकामामध्ये बदल केले जाणार असल्याने विद्युतीकरण कामामध्येही बदल करावे लागणार आहेत. तसेच ऑपरेशन थिएटरकरीता लागणारी मशिनरी, अॅटोक्लेव्ह मशिनरी, ऑपरेशन थिएटर, आय.सी.सी.यु.तसेच रिकव्हरी रुमकरीता बसविण्यात येणारी वातानुकुलीत यंत्रणा तसेच (०१). मेडीकल आय.सी.यु. (०२). आर्थो ओ.टी. (०३). मेल मेडिकल वॉर्ड, (०४). स्पेशल रुम, (०५). फिमेल मेडिकल वॉर्ड, (०६). सी.एस.एस.विभाग, (०७). ऑर्थो वॉर्ड, (०८). कॉन्फरन्स हॉल तसेच (०९). आर.एम.ओ.रुम्स इत्यादी ठिकाणच्या उपकरणांमध्ये वाढ होणार असल्याने सदर उपकरणांना विद्युत पुरवठा करणेकरीता जनरेटर रुम पासून केबल टाकणे, नविन पॅनेल बसविणे,उपरोक्त ठिकाणच्या मशिनरींकरीता वायरींग करणे इत्यादि जादा नविन कामे करावी लागणार असल्यामुळे सदरील वाढीव कामाचे इस्टीमेट तयार करणेकरीता आर्किटेक्ट / कन्सल्टंट मे.निकम पाटील असोसिएटस्, श्रीरामपूर यांना सांगण्यात आलेले होते. त्यानुसार आर्किटेक्ट / कन्सल्टंट मे.निकम पाटील असोसिएटस्, श्रीरामपूर यांनी दिनांक २४-०६-२०१९ रोजी सदरच्या वाढीव कामाचे इस्टीमेट सादर केलेले आहे. आर्किटेक्ट / कन्सल्टंट मे.निकम पाटील असोसिएटस्, श्रीरामपूर यांनी सादर केलेल्या इस्टिमेट मध्ये जे आयटेम ठेकेदार मे.जय मुंजोबा लाईट हाऊस,अहमदनगर यांचे कार्यादेशामध्ये आहेत ते मंजुर दर घेण्यात आलेले आहे. तसेच जे आयटेम्स ठेकेदार मे.जय मुंजोबा लाईट हाऊस,अहमदनगर यांचे कार्यादेशामध्ये नाहीत त्यांचे दर टेंडरमधील अटी व शर्तीनुसार महाराष्ट्र शासनाच्या सन २०१८-१९ चे CSR प्रमाणे घेण्यात आलेले आहेत.

आर्किटेक्ट/कन्सल्टंट मे.निकम पाटील असोसिएटस्, श्रीरामपूर यांनी सादर केलेले श्री साईनाथ रुग्णालयाच्या वाढीव तिस-या मजल्यावरील वाढीव विद्युत विषयक कामाचे अंदाजपत्रकाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशील | रक्कम रुपये |
|---|---|---|
| ०१) | वायरींग व डिस्ट्रीब्युशन बोर्ड | रु. ०७,०५,८५६.८९ |
| ०२) | अंडर ग्राऊंड केबल | रु. ०६,९५,५४८.०० |
| ०३) | अर्थिंग | रु. ०१,६०,३१२.२० |
| ०४) | एम.व्ही.पॅनेल | रु. ०१,८२,५७१.३१ |
| | एकुण रक्कम रुपये :- | रु. १७,४४,२८८.४० |
| | **पुर्णांकित रक्कम रुपये :-** | **रु. १७,४४,२८८.००** |

उपरोक्तप्रमाणे श्री साईनाथ रुग्णालयाचे वाढीव तिस-या मजल्यावरील वाढीव विद्युतीकरण कामाबाबत विद्युत विभागामार्फत दि.१६-०७-२०१९ रोजी टिपणी सादर करण्यात आली होती.

**०१).** विद्युत विभागामार्फत दि.१६-०७-२०१९ रोजी सादर करण्यात आलेल्या टिपणीवर मा.उपमुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांनी शेरा लिहिलेला आहे की, निविदेमधील आयटेमनुसार वाढीव रक्कम किती व CSR नुसार वाढीव रक्कम नमूद करावी असा अभिप्राय दिल्यानुसार सदरील रक्कमेचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशील | रक्कम रुपये |
|---|---|---|
| ०१) | निविदेतील आयटेम नुसार वाढीव रक्कम | रु. ११,३१,०२३.६९ |
| ०२) | CSR नुसार वाढीव रक्कम | रु. ६,१३,२६५.१७ |
| | एकुण रक्कम रुपये :- | रु. १७,४४,२८८.८६ |

उपरोक्तप्रमाणे आर्कीटेक्ट / कन्सल्टंट मे.निकम पाटील असोसिएटस, श्रीरामपूर यांनी सादर केलेल्या श्री साईनाथ रुग्णालयाचे वाढीव तिस-या मजल्यावरील वाढीव विद्युतीकरणाचे इस्टीमेटबाबत मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेणेकरीता विद्युत विभागामार्फत दिनांक २३-०७-२०१९ रोजी टिपणी सादर करण्यात आलेली होती.

**०२).** विद्युत विभागामार्फत दि.२३-०७-२०१९ रोजी सादर करण्यात आलेल्या टिपणीवर मा.उपमुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांनी विचारलेल्या प्रश्नांवर खुलासा खालीलप्रमाणे सादर करण्यात आलेला होता.

i). मागील टिपणी प्रत सोबत सादर करा.

खुलासा :- मागील दिनांक १६-०७-२०१९ रोजीची टिपणी, दिनांक २३-०७-२०१९ रोजीची टिपणी, दिनांक ३०-०७-२०१९ रोजीची टिपणी तसेच दि.०२-०८-२०१९ रोजीची टिपणी सोबत जोडलेली आहे.

ii). निविदेतील आयटेममध्ये कोणत्या आयटेममध्ये किती वाढ होत आहे याची विगतवारीची माहिती विस्ताराने सादर करणे योग्य राहिल असे मत आहे.

खुलासा :- निविदेतील आयटेममध्ये कोणत्या आयटेममध्ये किती वाढ होत आहे, याची सविस्तर विगतवारीची माहिती खालीलप्रमाणे.

| अ. क्र. | तपशील | कार्यादेशातील रक्कम रुपये | कार्यादेशानुसार वाढीव कामाची रक्कम रुपये | कार्यादेशाव्यतिरिक्त वाढीव कामाची सी.एस.आर.नुसार होणारी रक्कम रुपये | एकुण रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| १ | वायरींग व डिस्ट्रीब्युशन बोर्ड | २२,५६,१९५.६६ | ०४,५६,९१२.७३ | ०२,४८,९४४.२६ | २९,६२,०५२.६५ |
| २ | फॅन आणि फिटींग | ०९,४२,२९८.८४ | ०.०० | ०.०० | ०९,४२,२९८.८४ |
| ३ | अंडर ग्राऊंड केबल | ३३,१५,००४.०० | ०५,१३,७९८.५० | ०१,८१,७४९.६० | ४०,१०,५५२.१० |
| ४ | अर्थिंग | ०५,७१,९९८.३० | ०१,६०,३१२.४६ | ०.०० | ०७,३२,३१०.७६ |
| ५ | एम.व्ही.पॅनेल | ०६,२८,२००.०० | ०.०० | ०१,८२,५७१.३१ | ०८,१०,७७१.३१ |
| | एकुण रक्कम रु. :- | ७७,१३,६९६.८० | ११,३१,०२३.६९ | ०६,१३,२६५.१७ | ९४,५७,९८५.६६ |

उपरोक्तप्रमाणे मे.जय मुंजोबा लाईट हाऊस, अहमदनगर यांना कार्यादेशाची रक्कम रु.७७,१३,६९६.८०+कार्यादेशानुसार वाढीव कामाची रक्कम रु. ११,३१,०२३.६९+कार्यादेशाव्यतिरिक्त वाढीव कामाची सी.एस.आर.नुसार होणारी रक्कम रुपये ६,१३,२६५.१७ अशी एकत्र मिळून एकुण रक्कम रु.९४,५७,९८५.६६ होत आहे. आर्कीटेक्ट/कन्सल्टंट मे.निकम पाटील असोसिएटस, श्रीरामपूर यांनी सादर केलेल्या श्री साईनाथ रुग्णालयाचे वाढीव तिस-या मजल्यावरील वाढीव विद्युतीकरणाचे इस्टीमेटबाबत सोबत जोडलेले आहे.

iii). श्री मुंजोबा लाईट हाऊस यांना दिलेल्या पुरवठा आदेशात या नवीन कामामुळे वाढ होत आहे तरी त्यांनाच ठेका देय होईल काय याबाबत विभागाने स्पष्ट अभिप्राय सादर करणे योग्य होईल असे मत आहे.

खुलासा:- मे.जय मुंजोबा लाईट हाऊस, अहमदनगर यांना मा.व्यवस्थापन समितीचे दि.०७-०३-२०१९ रोजीचे सभेतील विषय क्र.०२ निर्णय क्र.१४० (०८) अन्वये श्री साईनाथ रुग्णालयाचे वाढीव तिस-या मजल्यावरील विद्युतीकरणाचा कार्यादेश देण्यात आलेला असून मे.जय मुंजोबा लाईट हाऊस, अहमदनगर यांनी श्री साईनाथ रुग्णालयाचे वाढीव तिस-या मजल्यावरील स्लॅबमध्ये तसेच भिंतीमध्ये कन्सिल्ड वायरींगकरीता पाईप टाकलेले असून उर्वरीत कामही प्रगतीपथावर आहे. जर श्री साईनाथ रुग्णालयाचे वाढीव तिस-या मजल्यावरील वाढीव विद्युतीकरणाचे कामाकरीता स्वतंत्र ठेकेदार नेमायचा असेल तर याकरीता ई-निविदा मागविणे व त्यावर पुढील कार्यवाही करणेस मा.व्यवस्थापन समितीच्या मान्यतेनंतर साधारणतः२ ते ३ महिन्याचा कालावधी लागेल व त्यामुळे श्री साईनाथ रुग्णालयाचे वाढीव तिस-या मजल्यावरील कामास विलंब लागू शकेल. तसेच श्री साईनाथ रुग्णालयाचे वाढीव तिस-या मजल्यावरील विद्युतीकरणाचे काम व वाढीव काम हे एकमेकांशी निगडीत असल्याने याकरीता जर दुसरा ठेकेदाराची ई-निविदा प्रक्रियेव्दारे नेमणूक केली तर दोन्ही ठेकेदारांमध्ये वाद निर्माण होऊन तसेच कामामध्ये अडचणी येऊन कामास विलंब होऊ शकेल. त्यामुळे श्री साईनाथ रुग्णालयाचे वाढीव तिस-या मजल्यावरील वाढीव विद्युतीकरणाचे कामाकरीता स्वतंत्र ठेकेदार न नेमता सध्या काम करत असलेल्या मे.जय मुंजोबा लाईट हाऊस, अहमदनगर यांचेकडून वाढीव काम करुन घेणे योग्य होईल.

उपरोक्तप्रमाणे श्री साईनाथ रुग्णालयाचे वाढीव तिस-या मजल्यावरील वाढीव विद्युतीकरणाचे कामाकरीता स्वतंत्र ठेकेदार न नेमता काम करुन घेणेकरीता विद्युत विभागामार्फत दिनांक ३०-०७-२०१९ रोजी टिपणी सादर करण्यात आलेली होती.

**०३)** विद्युत विभागामार्फत सादर करण्यात आलेल्या या दि.३०-०७-२०१९ चे टिपणीवर मा.उपमुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांनी वाढीव तिस-या मजल्याच्या विद्युतीकरणाच्या कामाकरीता नवीन निविदा काढून येणा-या एल-१ पुरवठा आदेश देणे योग्य होईल असे मत आहे असा शेरा नमूद केला आहे.

याबाबत विद्युत विभागामार्फत दि.०२-०८-२०१९ चे टिपणी अन्वये खालीलप्रमाणे खुलासा सादर करण्यात आलेला आहे.

(०१) (अ) विद्युत विभागामार्फत सादर करण्यात आलेल्या दि.३०-०७-२०१९ रोजीचे टिपणीवरील शे-याप्रमाणे वाढीव तिस-या मजल्याच्या विद्युतीकरणाच्या कामाकरीता नवीन निविदा काढून स्वतंत्र ठेकेदार नेमणेबाबत,

(ब) श्री साईनाथ रुग्णालयाचे वाढीव तिस-या मजल्यावरील वाढीव विद्युतीकरणाचे कामाकरीता स्वतंत्र ठेकेदार नेमावयाचा असेल तर आता होणा-या मा.व्यवस्थापन समितीचे सभेत मान्यता मिळालेनंतर महाराष्ट्र शासनाच्या महाटेंडरच्या वेबसाईटवर जाहिरात देऊन २१ दिवसाचा ई-निवदा मागविणेसाठीचा कालावधी धरुन टेक्निकल बीड उघडणे त्यानंतर खरेदी समितीसमोर कमर्शियल बीड उघडून मा.उपसमितीचे सभेपुढे निगोशिएशनसाठी सादर करणे व त्यानंतर होणा-या मा.व्यवस्थापन समितीचे सभेत हा विषय मान्य होणेसाठी व त्यानंतर कार्यादेश देण्यासाठी कमीत कमी २ ते ३ महिन्याचा कालावधी लागणार आहे. कार्यादेश दिल्यानंतर ठेकेदाराला काम करण्यासाठी तीन महिन्याचा कालावधी दयावा लागणार आहे. यामुळे नविन ठेकेदार नेमण्यात आल्यास प्रत्यक्ष काम पुर्ण होण्यास ०६ महिन्याचा कालावधी लागू शकतो. त्यामुळे श्री साईनाथ रुग्णालयाचे वाढीव तिस-या मजल्यावरील कामास विलंब लागू शकेल. तसेच श्री साईनाथ रुग्णालयाचे वाढीव तिस-या मजल्यावरील विद्युतीकरणाचे काम व वाढीव काम हे एकमेकांशी निगडीत असल्याने याकरीता जर दुसरा ठेकेदाराची ई-निविदा प्रक्रियेव्दारे नेमणूक केली तर दोन्ही ठेकेदारांमध्ये वाद निर्माण होऊन तसेच कामामध्ये अडचणी येऊन कामास विलंब होऊ शकेल.

अथवा

(०२). आता होणा-या मा.व्यवस्थापन समितीचे सभेत जर सध्या काम करीत असलेला ठेकेदार मे.जय मुंजोबा लाईट हाऊस, अहमदनगर यांना पुढील वाढीव कामाचा कार्यादेश देण्याची मान्यता मिळाल्यास कार्यादेश दिल्यानंतर ०३ महिन्यात काम पूर्ण होऊ शकेल.

त्यामुळे वाढीव कामाकरीता स्वतंत्र ठेकेदार न नेमता सध्या काम करत असलेल्या मे.जय मुंजोबा लाईट हाऊस, अहमदनगर यांचेकडून वाढीव काम करुन घ्यावे किंवा कसे ? याकरीता रक्कम रु. १७,४४,२८८/- इतका खर्च अपेक्षित आहे.

उपरोक्तप्रमाणे अ.क्र.०१ व ०२ यापैकी योग्य पर्यायावर मा.व्यवस्थापन समितीसमोर विषय सादर करुन त्यामध्ये चर्चा होऊन निर्णय होणेकरीता विद्युत विभागामार्फत दि.०२-०८-२०१९ रोजी टिपणी सादर करण्यात आलेली होती.

०४) विद्युत विभागामार्फत दि.०२-०८-२०१९ रोजी सादर करण्यात आलेल्या टिपणीवर मा.प्र.कार्यकारी अभियंता, साहेब यांनी " विद्युत विभागाकडील दि.३०-०७-२०१९ अन्वये वाढीव कामासाठी (वरील टिपणीत प्रस्तावित) नव्याने निविदा मागवून कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली आहे. परंतू त्यानुसार मा.व्यवस्थापन समितीसमोर सादर करावयाच्या टिपणीत दोन पर्याय देण्यात आलेले आहे. (०१) निविदा मागविणे अथवा (०२) मे.जय मुंजोबा लाईट हाऊस, अहमदनगर यांचेकडून काम करुन घेणेस. मे.जय मुंजोबा लाईट हाऊस, अहमदनगर यांच्या मंजुर निविदामध्ये वाढीव काम ठेकेदार यांचेकडून करुन घेणेबाबत क्लॉज तथा तरतूद असल्यास त्यानुसार फेर टिपणी सादर करावी.'' असा शेरा नमूद केलेला आहे. याबाबतचा खुलासा खालीलप्रमाणे.

खुलासा–विद्युत विभागामार्फत श्री साईनाथ रुग्णालयाच्या वाढीव तिस-या मजल्याचे विद्युतीकरणासाठी अपलोड करण्यात आलेल्या ई-निविदेमधील पा.नं.४३ मुद्दा क.४.९ मध्ये वाढीव कामाबाबतचा उल्लेख करण्यात आलेला आहे. तसेच पा.नं.३६ वरील मुद्दा क्र.४.३ (i) (d) मध्ये वाढीव कामाबाबत करंट सी.एस.आर.चा आधार तसेच मे.जय मुंजोबा लाईट हाऊस, अहमदनगर यांचेशी केलेल्या करारनाम्यातील पान क्र.७ वरील मुद्दा क्र.८ मध्ये वाढीव कामाबाबत खालीलप्रमाणे उल्लेख करण्यात आलेला आहे.

मुद्दा क्र.८ The Client reserves to itself the right of altering the drawing and nature of the work, and adding to or omitting any condition of the work or part there of, or having the portion of the same carried out by Client themselves or by others and such alterations and variations shall be carried out by the Contractor without prejudice to this contract. The Client will also have the right to modify or terminate the whole or part of this Electrical Wiring Work for Additional 3rd Floor of Shri Sainath Hospital without assigning any

reason. In all such events, the Contractor shall be paid for the actual work completed by the Contractor.

मागणी:- तरी उपरोक्तप्रमाणे

(०१) (अ) विद्युत विभागामार्फत सादर करण्यात आलेल्या दि.३०-०७-२०१९ रोजीचे टिपणीवरील शे-याप्रमाणे वाढीव तिस-या मजल्याच्या विद्युतीकरणाच्या कामाकरीता नवीन निविदा काढून स्वतंत्र ठेकेदार नेमणेबाबत,

तसेच

(ब) श्री साईनाथ रुग्णालयाचे वाढीव तिस-या मजल्यावरील वाढीव विद्युतीकरणाचे कामाकरीता स्वतंत्र ठेकेदार नेमावयाचा असेल तर आता होणा-या मा.व्यवस्थापन समितीचे सभेत मान्यता मिळालेनंतर महाराष्ट्र शासनाच्या महाटेंडरच्या वेबसाईटवर जाहिरात देऊन २१ दिवसाचा ई-निवदा मागविणेसाठीचा कालावधी धरुन टेक्निकल बीड उघडणे त्यानंतर खरेदी समितीसमोर सदरचे कमर्शियल बीड उघडून मा. उपसमितीचे सभेपुढे निगोशिएशनसाठी सादर करणे व त्यानंतर होणा-या मा.व्यवस्थापन समितीचे सभेत हा विषय मान्य होणेसाठी व त्यानंतर कार्यादेश देण्यासाठी कमीत कमी २ ते ३ महिन्याचा कालावधी लागणार आहे. कार्यादेश दिल्यानंतर ठेकेदाराला काम करण्यासाठी तीन महिन्याचा कालावधी दयावा लागणार आहे. यामुळे नविन ठेकेदार नेमण्यात आल्यास प्रत्यक्ष काम पुर्ण होण्यास ०६ महिन्याचा कालावधी लागू शकतो. त्यामुळे श्री साईनाथ रुग्णालयाचे वाढीव तिस-या मजल्यावरील कामास विलंब लागू शकेल. तसेच श्री साईनाथ रुग्णालयाचे वाढीव तिस-या मजल्यावरील विद्युतीकरणाचे काम व वाढीव काम हे एकमेकांशी निगडीत असल्याने याकरीता जर दुसरा ठेकेदाराची ई-निविदा प्रक्रियेव्दारे नेमणूक केली तर दोन्ही ठेकेदारांमध्ये वाद निर्माण होऊन तसेच कामामध्ये अडचणी येऊन कामास विलंब होऊ शकेल.

अथवा

(०२) श्री साईनाथ रुग्णालयाच्या वाढीव तिस-या मजल्याचे विद्युतीकरणासाठी अपलोड करण्यात आलेल्या ई-निविदेमधील पा.नं.४३ मुद्दा क.४.९, पा.नं.३६ वरील मुद्दा क्र.४.३ (i) (d) तसेच करारनाम्यातील पान क्र.७ वरील मुद्दा क्र.८ अन्वये मे.जय मुंजोबा लाईट हाऊस, अहमदनगर यांना पुढील वाढीव कामाचा कार्यादेश देण्याची मान्यता मिळाल्यास कार्यादेश दिल्यानंतर ०३ महिन्यात काम पूर्ण होऊ शकेल.

त्यामुळे वाढीव कामाकरीता स्वतंत्र ठेकेदार नेमावा किंवा सध्या काम करत असलेल्या मे.जय मुंजोबा लाईट हाऊस, अहमदनगर यांचेकडून वाढीव काम करुन घ्यावे किंवा कसे ? यासाठी मा.व्यवस्थापन समिती समोर विषय सादर करुन निर्णय होणे आवश्यक आहे. या वाढीव कामासाठी रक्कम रु.१७,४४,२८८/- इतका खर्च अपेक्षित आहे.

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:- तरी उपरोक्त अ.क्र.०१ तसेच अ.क्र.०२ या विषयावर सविस्तर चर्चा होऊन निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४५०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयाच्या वाढीव तिसऱ्या मजल्यावरील जादा विद्युत विषयक कामे सदर कामाचे सध्याचे ठेकेदार मे.जय मुंजोबा लाईट हाऊस, अहमदनगर यांचेकडून सध्याचे C.S.R. दराप्रमाणे करुन घेण्यास व त्याकामी येणाऱ्या वाढीव रक्कम रु.१७,४४,२८८/-मात्रचे अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- विद्युत विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०४** **श्री पुण्यतिथी उत्सव-२०१९ किर्तनकार ठरविणे व मानधन निश्चीत करणेबाबत.**

प्रस्ताव- संस्थानमार्फत साज-या होणा-या श्री पुण्यतिथी उत्सव २०१९ मध्ये (दि.७,८,९,१० ऑक्टोबर २०१९ ) इ-मेलव्दारे/अर्जाद्वारे खालील कीर्तनकार यांनी चार दिवस कीर्तन सेवेची संधी मिळणेबाबत विनंती केली आहे.

| अ.नं. | किर्तनकारांचे नाव | मानधन |
|---|---|---|
| ०१ | ह.भ.प. सौ. अंजली श्रीकृष्ण जोशी डोंबिवली | संस्थान नियमाप्रमाणे |
| ०२ | ह.भ.प.प्रभंजन चारुदत्त भगत, लोणी | ४०,०००/- |
| ०३ | ह.भ.प.गंगाधर व्यास, डोंबिवली | संस्थान नियमाप्रमाणे |
| ०४ | ह.भ.प. सौ. स्मिता आजेगावकर, डोंबिवली | संस्थान नियमाप्रमाणे |
| ०५ | ह.भ.प. श्री मंदारबुवा गोखले, पुणे | ४८,०००/- |

संस्थानतर्फे साजरे केल्या जाणा-या उत्सवातील कीर्तन मंदिराच्या उत्तर बाजूच्या स्टेजवर होते.

ह.भ.प. दासगणू महाराज प्रतिष्ठाण, गोरटे यांनी पाठविलेल्या कीर्तनकाराचे कीर्तन श्री रामनवमी उत्सवात ठेवण्यात येते. ही परंपरा ह.भ.प. दासगणू महाराज यांनी स्वतः रामनवमी उत्सवात कीर्तन सेवा देण्यास सुरुवात केल्यापासून आजतागायत अखंडीत सेवा चालू आहे. त्यानुसार ह.भ.प. दासगणू महाराज प्रतिष्ठाण, गोरटे यांनी पाठविलेल्या कीर्तनकाराचे कीर्तन रामनवमी उत्सवात परंपरेनुसार ठेवले जाते.

संस्थानमार्फत गुरुपौर्णिमा व पुण्यतिथी उत्सवात कीर्तनकारांचे प्राप्त झालेल्या सर्व अर्ज एकत्रित करुन कीर्तनकारांचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेत ठेवण्यात येतो, सदर प्रस्तावावर चर्चा होऊन योग्य कीर्तनकाराची निवड व मानधनाबाबत निर्णय घेण्यात येतो.

श्री गुरुपौर्णिमा व श्री पुण्यतिथी उत्सवात श्री रामनवमी उत्सवाप्रमाणे कोणत्याही कीर्तनकाराची कीर्तन सेवा करण्याची परंपरा नाही. मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयाप्रमाणे कीर्तनकाराची निवड केली जाते.

श्री. पुण्यतिथी उत्सवात सेवा दिलेल्या कीर्तनकारांची नांवे खालीलप्रमाणे..

| अ.नं. | कीर्तनकाराचे नाव | पुण्यतिथी उत्सवात कीर्तन सेवा दिलेले साल |
|---|---|---|
| ०१ | ह.भ.प.शरद महाराज नेरळकर, नांदेड | दि. ०१/१०/२००६ ते दि. ०४/१०/२००६ |
| ०२ | ह.भ.प.शरद महाराज नेरलकर नांदेड | दि. २०/१०/२००७ ते दि. २३/१०/२००७ |
| ०३ | ह.भ.प.मंदार गंगाधर व्यास, डोंबीवली | दि. ०८/१०/२००८ ते दि. १०/१०/२००८ |
| ०४ | ह.भ.प. मनोहर दिक्षीत, औरंगाबाद | दि. २७/०९/२००९ ते दि. २९/०९/२००९ |
| ०५ | ह.भ.प.श्री. शरद महाराज नेरलकर, नांदेड | दि. १६/१०/२०१० ते दि. १९/१०/२०१० |
| ०६ | ह.भ.प.श्री.मनोहर महाराज, कोकलेगांवकर | दि. ०५/१०/२०११ ते दि. ०८/१०/२०११ |
| ०७ | ह.भ.प.मनोहर वा.कोकलेगांवकर, नांदेड | दि. २३/१०/२०१२ ते दि. २६/१०/२०१२ |
| ०८ | कीर्तन केसरी ह.भ.प. मनोहरबुवा बाळकृष्ण दिक्षित, औरंगाबाद | दि. १२/१०/२०१३ ते दि. १४/१०/२०१३ |
| ०९ | कीर्तन केसरी ह.भ.प. मनोहरबुवा बाळकृष्ण दिक्षित , औरंगाबाद | दि. ०२/१०/२०१४ ते दि. ०४/१०/२०१४ |
| १० | ह.भ.प. समिहन चन्द्रशेखर आठवले, पंढरपुर | दि. २१/१०/२०१५ ते दि. २४/१०/२०१५ |
| ११ | ह.भ.प. मंदार गंगाधर बुआ व्यास, डोंबिवली | दि. १०/१०/२०१६ ते दि. १३/१०/२०१६ |
| १२ | ह.भ.प. समिहन चन्द्रशेखर आठवले, पंढरपुर | दि. २९/०९/२०१७ ते दि. ०२/१०/२०१७ |
| १३ | ह.भ.प. विवेक गोखले, नृरसिंहवाडी | दि. १७/१०/२०१८ ते दि. १९/१०/२०१८ |

श्री गुरुपौर्णिमा उत्सव-२०१९ मध्ये केलेल्या कीर्तनकारास तीन दिवसाची एकत्रीत बिदागी/मानधन १५,००१/- देण्यात आले होते.

विभागाचा अभिप्राय:- श्री पुण्यतिथी उत्सवात संस्थानकडे सादर केलेल्या कीर्तनकारांतुन एका कीर्तनकारांची निवड करता येईल, अथवा मा. व्यवस्थापन समितीने सुचविलेले कीर्तनकारांचा कार्यक्रम आयोजित करता येईल. त्यासाठी श्री गुरुपौर्णिमा उत्सवाप्रमाणेच चार दिवसासाठी रक्कम रु.१५,००१/- किंवा मा.व्यवस्थापन समिती निर्णय घेईल त्याप्रमाणे मानधन आदा करता येईल.

प्रस्ताव:- तरी श्री पुण्यतिथी उत्सव २०१९ च्या चार दिवसांसाठी कीर्तनकार व त्यांचे मानधन निश्चित करणेसाठी सदरचा प्रस्ताव निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.४५१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानमार्फत साज-या होणा-या श्री पुण्यतिथी उत्सव-२०१९ मध्ये दि.७,८,९,१० ऑक्टोबर,२०१९ या चार दिवसांसाठी ह.भ.प.गंगाधर व्यास, डोंबीवली यांचे किर्तनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात येऊन त्यांना संस्थान नियमाप्रमाणे मानधनाची रक्कम आदा करण्यात यावी, असे ठरले.**

**(कार्यवाही-शताब्दी कक्ष)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०५** **श्री पुण्यतिथी उत्सव-२०१९ मध्ये आयोजित करावयाच्या सांस्कृतिक कार्यक्रमांचे कलाकार व त्यांचे मानधन निश्चीत करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद :-

१. अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे. भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

२. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

प्रस्तावना:- मागिल वर्षी श्री पुण्यतिथी २०१८, श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव असल्याने खालील नामवंत कलाकाराचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

| अ.नं. | कलाकाराचे नांव | कार्यक्रम प्रकार | ठिकाण | दिनांक व वेळ | आदा करण्यात आलेले मानधन |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री प्रसाद कांबळी, सिंधुदूर्ग. | नाटक देव बाभळी | साई आश्रम समाधी शताब्दी मंडप | बुधवार १७/१०/२०१८ सायं. ७.३० ते रात्रौ. १०.०० | २,००,०००/- |
| ०२ | श्री महेश काळे , मुंबई | भजन व भक्तीगित | श्री साईबाबा समाधी मंदिर शताब्दी मंडप | गुरुवार १८/१०/२०१८ सायं. ७.३० ते रात्रौ. १०.०० | ४,७२,०००/- |
| | श्री राहुल देशपांडे, पुणे. | | | | ४,७२,०००/- |
| ०३ | श्री अनुराधा पौडवाल, मुंबई. | भजन संध्या | | शुक्रवार १९/१०/२०१८ सायं. ७.३० ते रात्रौ. १०.०० | ३,५०,०००/- |

श्री पुण्यतिथी उत्सव -२०१९ सोमवार, दि.०७ /१०/२०१९ ते गुरुवार, दि.१० /१०/२०१९ असा चार दिवस साजरा करण्यात येणार आहे. श्री पुण्यतिथी उत्सवात कार्यक्रम करणेसाठी खालील कलाकारांचे अर्ज प्राप्त झाले आहेत.

| अ.नं. | कलाकाराचे नांव | मो.नंबर | कार्यक्रमाचा प्रकार | कलाकार संख्या | मानधन |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | पद्मावती पारेकर, पुणे | ९६०४६१९५८४ | भावगीत / भक्तीगीत | १५ | २५,०००/- |
| ०२ | राजाराम शेंबेकर, चिपळूण | ९९२२७२९०२६<br>८४४६६९७६७६ | भक्ती संगीत | ०६ | ४०,०००/- |
| ०३ | सक्सेना बंधू, नवी दिल्ली | ९८१००२८१९२ | भजन संध्या | ०७ | ७६,०००/- |
| ०४ | आश्विनी जोशी, नाशिक | ८९९९३६५३०७ | भजन संध्या | १० | २१,०००/- |
| ०५ | पद्मश्री कुचीपुडी डान्स ॲकडमी, हैद्राबाद | ९०१४६४४२३४ | कुचीपुडी नृत्य | २५ | विनामुल्य |
| ०७ | श्री नरसिंग देसाई, पुणे | ९५२७५१७३२९ | संगीत रजनी | ०७ | ३०,०००/- |
| ०८ | मीनाक्षी पराग चौधरी, औरंगाबाद | ९४२२७१२०५२ | संगीत कार्यक्रम | १२ | ५०,०००/- |
| ०९ | सुनिल कुमार वडकरा, कोईकोड, केरला | ९८२२५५९३२३ | भक्ती संगीत | २५ | ५०,०००/- |
| १० | समिरण दिलीप बर्डे, पुणे | ९५६१११७७१६ | साईभक्ती संध्या | १० | ४५,०००/- |
| ११ | पंडीत सुगाटो भादुरी, कलकत्ता | ०९८८३१३५२५०<br>०८९०२६३७१८३ | क्लासिकल मंडोलीन आणि भजन | १५ | २,५०,०००/- |

विभागाचा अभिप्राय:- मागील श्री पुण्यतिथी उत्सवातील (२०१८) कलाकार कार्यक्रम श्री साईबाबा समाधी मंदिर शताब्दी मंडप या ठिकाणी आयोजित करण्यात आले होते. चालू वर्षीचे कलाकार कार्यक्रम ही श्री साईबाबा समाधी मंदिर शताब्दी मंडप या ठिकाणी आयोजित करता येतील. कलाकार निश्चितीसाठी उपरोक्त नमूद केलेल्या तक्त्यातील अथवा मा. व्यवस्थापन समितीने सुचविलेले कलाकार कार्यक्रम आयोजित करता येतील.

प्रस्ताव:- तरी विभागाचे अभिप्रायामध्ये नमूद केलेप्रमाणे श्री पुण्यतिथी उत्सव २०१९ कालावधीत आयोजित करावयाच्या कलाकार कार्यक्रमासाठी कलाकार व त्यांचे मानधन निश्चित करणेसाठी सदरचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४५२ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री पुण्यतिथी उत्सव-२०१९ मध्ये खालील प्रमाणे कलाकारांचे सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यास व मानधन आदा करण्यास मान्यता देण्यात आली.**

| अ.नं. | कलाकाराचे नांव | दिनांक | कार्यक्रमाचा प्रकार | मानधन |
|---|---|---|---|---|
| **०१** | **पं.उदय मल्लीक व यशश्री कडलसकर** | **०७.१०.२०१९** | **भजन संध्या** | **२,५०,०००/-** |
| **०२** | **पंडीत सुगाटो भादुरी, कलकत्ता** | **०८.१०.२०१९** | **क्लासिकल मंडोलीन आणि भजन** | **२,००,०००/-** |
| **०३** | **पद्मश्री कुचीपुडी डान्स ॲकडमी, हैद्राबाद** | **०९.१०.२०१९** | **कुचीपुडी नृत्य** | **विनामुल्य** |
| **०४** | **आश्विनी जोशी, नाशिक** | **१०.१०.२०१९** | **भजन संध्या** | **२१,०००/-** |

**(कार्यवाही-शताब्दी कक्ष)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०६ संस्थानला कंत्राटी पध्दतीने अकुशल, कुशल व सुरक्षा कर्मचारी पुरविणेकामी सध्या असलेले ठेकेदार यांना ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत मुदतवाढ देणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना दि.१०.०६.२०१८ ते दि.०९.०६.२०१९ अखेर १ वर्ष कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने अकुशल, कुशल कर्मचारी व सुरक्षा कर्मचारी पुरविणेकामी ०२ एजन्सींची नेमणूक करण्यात आलेली असून, त्यात मे.बी.व्ही.जी.इंडिया लि. पुणे यांना संस्थानचे विविध विभागांना अकुशल, कुशल कंत्राटी कर्मचारी व मे.सेंट्रल इनव्हेस्टीगेशन सिस्टिम ॲण्ड सर्व्हिसेस, मुंबई यांना सुरक्षा व माजी सैनिक सुरक्षा कंत्राटी कर्मचारी पुरविण्याचे कार्यादेश देण्यात आलेले असून, संबंधित लेबर व सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर यांचेमार्फत संस्थानला प्रतिदिनी व मंजूर संख्येनुसार कंत्राटी पध्दतीने खालीलप्रमाणे अकुशल, कुशल कामगार, सुरक्षा कर्मचारी व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी पुरविणेत येत आहेत.

| अ.नं | एजन्सीचे नांव | विभागांना दिलेल्या मंजूरी प्रमाणे कंत्राटी कर्मचारी संख्या | | | हजेरी पटावरील कंत्राटी कर्मचारी संख्या | | | कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कुशल | कुशल | एकूण | अकुशल | कुशल | एकूण | |
| १ | मे.बी.व्ही.जी.इंडिया लि.पुणे. जा.नं.एसएसएस/वशी-७ए/६४९/ २०१८, दि.०८.०६.२०१८ | १०८१ | ६८४ | १७६५ | १०९० | ५९८ | १६८८ | दि.१०.०६.२०१८ ते दि.०९.०६.२०१९ |
| २ | मे.सेंट्रल इन्व्हेस्टिगेशन सिस्टीम ॲण्ड सर्व्हिसेस, मुंबई. जा.नं.एसएसएस/वशी-७ए/६५०/ २०१८, दि.०८.०६.२०१८ | ७४८ | ६७ | ८१५ | ७७५ | ६१ | ८३६ | दि.१०.०६.२०१८ ते दि.०९.०६.२०१९ |
| | एकूण (१ + २ ) = | १८२९ | ७५१ | २५८० | १८६५ | ६५९ | २५२४ | |

संस्थानला पुरविणेत येणा-या कंत्राटी अकुशल, कुशल कामगारांना व सुरक्षा रक्षक कर्मचा-यांना किमान वेतन कायद्यानुसार महाराष्ट्र शासनाचे शॉप ॲण्ड कमर्शियल इस्टॅब्लीशमेंट झोन नं.- ०३ (मुंबई, सिकंदराबाद कार्यालयासाठी झोन नं. ०१) प्रमाणे अनुज्ञेय असणारे किमान वेतनदर, तसेच माजी सैनिक सुरक्षा कर्मचा-यांना मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील चर्चा / वाटाघाटीत ठरलेप्रमाणे वेतनदर, अधिक प्रॉव्हीडंड फंड प्रशासकीय चार्जेससह (मालकाचा हिस्सा - १३.१५ %) अधिक कंत्राटी कर्मचा-यांचे वेतनदराचे रक्कमेवर ०.०००००००१ % व ०.०००००००१० % सर्व्हिस चार्ज अधिक संपूर्ण बिलाचे रक्कमेवर CGST ९ % , SGST ९ % , एकूण GST १८% , अधिक सानुग्रह अनुदान ८.३३ % , अधिक कामगार नुकसान भरपाई अधिनियम अंतर्गत ग्रूप

इन्शुरन्स प्रिमियम (अंशदान) , तसेच मा.व्यवस्थापन समिती सभा निर्णय क्र.१४२ नुसार सदर कंत्राटी कर्मचा-यांचे किमान वेतनावर ४० % वेतनवाढ यापमाणे रक्कम संस्थानकडून देण्यात येते. तसेच दि.०१.१२.२०१८ पासून साप्ताहिक सुट्टी (Paid Weekly Off) देण्यात येत आहेत.

मे.सेंट्रल इन्व्हेस्टीगेशन सिक्युरिटी सर्व्हिसेस, मुंबई यांचे पत्र प्राप्त झाले असून त्यात त्यांनी, आमचे कॉन्ट्रॅक्ट दि.०९.०६.२०१९ रोजी संपत असून, पुढील १ वर्ष कालावधीसाठी आहे त्या अटी शर्तीस अधीन राहून संस्थानला सुरक्षा कंत्राटी कर्मचारी पुरविणेस तयार आहेत. तसेच आमच्या कंपनीला ३१.०८.२०१९ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. आमच्या कंत्राटाची मुदत १०.०६.२०१९ रोजी संपुष्टात आली होती. अपघात विमा पॉलिसीची मुदत १५.०७.२०१९ पर्यंत होती पुढील अल्प मुदतीसाठी अपघात विमा पॉलिसी काढू शकत नाही. मुदतवाढीच्या कालावधीमध्ये अपघात विमा पॉलिसीची जबाबदारी आमची राहणार नाही याची नोंद घ्यावीबाबत नमूद केलेले आहे.

तसेच मे.बी.व्ही.जी.इंडिया लि.पुणे यांचे पत्र प्राप्त झाले असून त्यात त्यांनी, सदर कार्यादेशातील अट क्र. ३१ नुसार संस्थानला आवश्यकता असल्यास आमच्या एजन्सीला मुदतवाढ दिल्यास सदर मुदतवाढीच्या कालावधीत आम्ही काम करण्यास तयार आहोत. तथापि, सदर कालावधीत शासनाच्या नियमानुसार किमान दरामध्ये होणारी वाढ व पी.एफ. अंशदानाच्या रक्कमेत भविष्यनिर्वाह निधी कार्यालयाकडून काही बदल झाल्यास त्यानुसार सुधारीत दराने पी.एफ. रक्कम संस्थानकडून आमचे एजन्सीला देय राहील. तसेच इतर शासकीय कर उदा.GST मध्ये शासकीय नियमानुसार काही बदल झाल्यास त्यानुसार सुधारित दराने सदर कराची रक्कम संस्थानकडून आमचे एजन्सीला देय राहील. तसेच, अट क्र. २० नुसार कंत्राटी कर्मचा-यांचा प्रत्येकी रु.१० लाख रक्कमेचा अपघाती विमा उतरविणेत आलेला असून, मुदतवाढीच्या अल्प कालावधीकरीता सदर पॉलीसीची मुदतवाढ करता येणार नसल्याने रु.१० लाख रक्कमेपर्यंतचा अपघात विमा व वर्कमॅन कॉम्पेनसेशन विमा पॉलिसी याबाबतची जबाबदारी मुदतवाढीच्या कालावधीत आमचे एजन्सीची असणार नाही. सदर जबाबदारी संस्थानची राहील त्यामुळे आमचे एजन्सीवर दोन्ही पॉलीसीची जबाबदारी निश्चित करु नयेबाबत नमूद केलेले आहे.

प्रस्तावनाः- मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२६.०२.२०१९ निर्णय क्र.११० अन्वये संस्थानला कंत्राटी पध्दतीने अकुशल, कुशल व सुरक्षा कर्मचारी पुरविणेकामी लेबर व सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्सची नेमणूक करणेसाठी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्यासाठी येणा-या अपेक्षित खर्चास मान्यता मिळालेली आहे. तथापि माहे फेब्रुवारी -२०१९ अखेरनंतर महाराष्ट्र राज्य लोकसभा निवडणूक आचारसंहिता दि.२३.०५.२०१९ अखेर लागू होणार असल्यामुळे संदर्भ क्र.४ अन्वये दि.१०.०६.२०१८ ते दि.३१.०८.२०१९ कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात आलेली होती. परंतू सदर कालावधीत निविदा प्रक्रिया पूर्ण झालेली नसल्याने, सदर निविदा प्रक्रियेला अजून बराच कालावधी लागण्याची शक्यता आहे. याकरीता संस्थानला अकुशल, कुशल व सुरक्षा कंत्राटी कर्मचारी पुरविणारे ठेकेदार मे.बी.व्ही.जी.इंडिया लि.पुणे व मे.सेंट्रल इन्व्हेस्टीगेशन सिक्युरिटी सर्व्हिसेस, मुंबई यांना निविदेतील व करारनामा तसेच कार्यादेशातील अटी – शर्तींनुसार सन २०१९-२० करीता सुरु असलेली ई-निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन नविन ठेकेदारास कार्यादेश देई पावेतो आहे त्याच सर्व्हिस चार्जेस दराने मुदतवाढ द्यावी लागेल असे मत आहे.

विभागाचा अभिप्रायः- सबब, सदर निविदा प्रक्रिया राबविणेची कार्यवाही विस्तृत स्वरुपाची असल्याने दि.३१.०८.२०१९ अखेर निविदा प्रक्रिया पूर्ण होऊ शकत नाही. उपरोक्त विषयाचा विचार करता संस्थानला अकुशल, कुशल व सुरक्षा कंत्राटी कर्मचारी पुरविणेकामी ठेकेदार मे.बी.व्ही.जी.इंडिया लि.पुणे व मे.सेंट्रल इन्व्हेस्टीगेशन सिक्युरिटी सर्व्हिसेस, मुंबई यांना कामाची गैरसोय होऊ नये म्हणून पुढील ई-निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन पात्र ठेकेदारास कार्यादेश देई पावेतो दि.३०.११.२०१९ अखेर पर्यंत निविदेतील, करारनाम्यातील व कार्यादेशातील आहे त्याच अटी-शर्तीस व दरपत्रकास अधिन राहून मुदतवाढ देणेस मान्यता असावी. तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४५३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानला कंत्राटी पध्दतीने अकुशल, कुशल व सुरक्षा कर्मचारी पुरविणेकामी ठेकेदार मे.बी.व्ही.जी.इंडिया लि.पुणे व मे.सेंट्रल इन्व्हेस्टीगेशन सिक्युरिटी सर्व्हिसेस, मुंबई यांना पुढील ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन पात्र ठेकेदारास कार्यादेश देई पावेतो दि.३०.११.२०१९ अखेर पर्यंत निविदेतील, करारनाम्यातील व कार्यादेशातील आहे त्याच अटी-शर्तीस व दरपत्रकास अधिन राहून मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-कामगार विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०७** **माजी सैनिक, सुरक्षा अधिकारी, सुरक्षा सुपरवायझर, सशस्त्र सुरक्षा रक्षक व माजी सैनिक सुरक्षा गार्ड यांचे दि.२४.०७.२०१९ पासूनचे सुधारीत मुळ वेतन व विशेष भत्ता दरवाढीबाबत.**

**प्रस्ताव-** मे.बी.व्ही.जी.इंडिया लि.पुणे, लेबर कॉन्ट्रॅक्टर व मे.सेंन्ट्रल इन्व्हेस्टीगेशन सिक्युरिटी सर्व्हिसेस,मुंबई, सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर यांचेमार्फत संस्थानला कंत्राटी पध्दतीनेअनुक्रमे अकुशल, कुशल कामगार व सुरक्षा कर्मचारी पुरविण्यात येत आहेत. सदर कंत्राटी कामगारांना किमान वेतन अधिनियम १९४८अंतर्गत शॉप ॲन्ड कमर्शियल इस्टॅब्लीशमेंट झोन नं.३ नुसार दि.२८.०९.२०१० पासून ते दि.२४.०७.२०१९ अखेरपर्यंत या कालावधीमध्ये उदयोग, उर्जा, कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील दि.२८.०९.२०१० रोजीचे अधिसुचनेनुसार मुळ वेतन दर,तसेच कामगार आयुक्त कार्यालय, मुंबई यांचेकडील दि.०४.०२.२०१९ व दि.०५.०८.२०१९रोजीचे नोटीफिकेशन नुसार स्पेशल अलौउंन्स याप्रमाणे सध्या किमान वेतनदर अधिक ४०% वेतनवाढ याप्रमाणे वेतनदर कंत्राटी अकुशल, कुशल कामगार व सुरक्षा कर्मचारी यांना देण्यात येत आहे.

माजी सैनिक सुरक्षा अधिकारी, सुरक्षा सुपरवायझर, सशस्त्र सुरक्षा रक्षक व माजी सैनिक सुरक्षागार्ड यांना मा.व्यवस्थापन समिती सभा दिनांक-०८.०१.२०१४,निर्णय क्र.५५ नुसार चर्चा वाटाघाटीत ठरलेप्रमाणे मुळवेतन व कामगार आयुक्त कार्यालय, मुंबई यांचेकडील दिनांक-०५.०८.२०१९ रोजीचे नोटीफिकेशननुसार विशेष भत्ता याप्रमाणे वेतनदर अधिक ४०%वेतनवाढ धरुन वेतन देण्यात येत आहे.

आता उदयोग, उर्जा, कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील अधिसुचना क्रमांक किवेअ-१०१५-४१८/प्र.क्र.१४०/कामगार-०७, दि.२४.०७.२०१९अन्वये कंत्राटी कामगारांना देय्य असलेले मुळ किमान वेतनदर पुनर्निधारित केलेले आहेत.म्हणजेच सदर मूळ किमान वेतन दरात दि.२४.०७.२०१९ पासून वाढ करण्यात आलेली आहे. उदयोग, उर्जा, कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील दि.२४/०७/२०१९ रोजीचे अधिसुचनेस अनुसरुन किमान वेतन अधिनियम १९४८ अंतर्गत शॉप ॲन्ड कमर्शियल इस्टॅब्लीशमेंट झोन नं.३ मध्ये वाढ झालेली आहे. त्याचप्रमाणे कामगार आयुक्त, मुंबई यांचेकडील दिनांक ०५.०८.२०१९ रोजीचे नोटीफिकेशन अन्वये विशेष भत्ता (स्पेशल अलौन्स) मध्ये (घट) सुधारणा करणेत आलेली आहे.त्याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ नं | वर्गवारी | मुळवेतन (रुपये / पैसे) (वाढ) | स्पेशल अलौंन्स (रुपये/पैसे) (घट) | एकूण किमान वेतन वाढ (रुपये/पैसे) | किमान वेतनावर ४०% पगारवाढ (रुपये/पैसे) | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | अकुशल कामगार व सुरक्षा रक्षक | ४४२८=०० | ३७१४=०० | ७१४=०० | ९९९=६० | प्रति महिना |
| | | १७०=३१ | १४२=८४ | २७=४७ | ३८=४६ | प्रति दिन |
| २ | अकुशल कामगार व सुरक्षा रक्षक(मुंबई कार्या.झोन नं.-०१) | ५०२१=०० | ३७१४=०० | १३०७=०० | १८२९=८० | प्रति महिना |
| | | १९३=११ | १४२=८४ | ५०=२७ | ७०=३८ | प्रति दिन |
| ३ | अर्धकुशल कामगार | ४८६४=०० | ३७१४=०० | ११५०=०० | १६१०=०० | प्रति महिना |
| | | १८७=०७ | १४२=८४ | ४४=२३ | ६१=९२ | प्रति दिन |
| ४ | कुशल कामगार | ५२४०=०० | ३७१४=०० | १५२६=०० | २१३६=४० | प्रति महिना |
| | | २०१=५४ | १४२=८४ | ५८=७० | ८२=१८ | प्रति दिन |
| ५ | कुशल कामगार (मुंबई कार्या.झोन नं.-०१) | ५८३२=०० | ३७१४=०० | २११८=०० | २९६५=२० | प्रति महिना |
| | | २२४=३० | १४२=८४ | ८१=४६ | ११४=०४ | प्रति दिन |

तरी किमान वेतन अधिनियम १९४८ अंतर्गत शॉप ॲण्ड कमर्शियल इस्टॅब्लीशमेंट झोन नं.३ नुसार अकुशल, कुशल कामगार, सुरक्षा कर्मचारी, माजी सैनिक कंत्राटी सुरक्षा कर्मचा-यांना सुधारीत मुळवेतन व स्पेशल अलौन्सनुसार किमान वेतनदर अधिक ४०% पगारवाढ या प्रमाणे वेतनदर दि.०१.०७.२०१९ व दि.२४/०७/२०१९ पासून देणे संस्थानवर नियमानुसार बंधनकारक आहे. त्यामुळे कुशल, अर्धकुशल, अकुशल कामगार व सुरक्षा कर्मचारी तसेच माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी यांचे किमान वेतनदरामध्ये नियमानुसार वेळोवेळी वाढ करण्यात येऊन त्याप्रमाणे किमान वेतनदर, वेतनदर अधिक ४०% वेतनवाढ धरुन वेतन देणेत येत आहे.

प्रस्तावनाः- संस्थानला कंत्राटी पध्दतीने माजी सैनिक सुरक्षा अधिकारी, सुरक्षा सुपरवायझर, सशस्त्र सुरक्षा रक्षक व सुरक्षा गार्ड कर्मचारी पुरविणेबाबत मे.सेंट्रल इन्व्हेस्टीगेशन सिक्युरिटी सर्व्हिसेस, मुंबई यांना कार्यादेश देण्यात आलेले असून त्यानुसार ते सुरक्षा कर्मचारी पुरवित आहेत.

मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०८.०१.२०१४, निर्णय क्र.क्र.५५ अन्वये मा.व्यवस्थापन समितीचे सभेत चर्चा/वाटाघाटीमध्ये पुढीलप्रमाणे प्रस्तावास मान्यता देण्यात आलेली आहे.- दि.०१.०७.२०१३ पासून अकुशल कामगारास रु.२३९.४३ प्रतिदिनी, कुशल कामगारास रु.२७०.२० प्रतिदिनी व सिव्हीलीयन सुरक्षा गार्ड रु.२३९.४३ प्रतिदिनीयाप्रमाणे किमान वेतनदर देण्यात येत आहे. त्याचप्रमाणे सुरक्षा एजन्सी / ठेकेदार यांचेमार्फत पुरविण्यात येणा-या माजी सैनिक सुरक्षा अधिकारी रु.३८५.००/- , माजी सैनिक सुरक्षा पर्यवेक्षक रु.२८९.३३/- प्रतिदिनी, माजी सैनिक सशस्त्र सुरक्षा रक्षक रु.२७१.००/- प्रतिदिनी व माजी सैनिक सुरक्षा गार्ड रु.२५०.००/- प्रतिदिनी याप्रमाणे वेतनदर देण्यात येत आहे. तसेच लेबर व सिक्युरिटी कंत्राटदार (एजन्सी) यांचेमार्फत पुरविणेत येणा-या कंत्राटी अकुशल, कुशल कामगार व सिव्हीलियन सुरक्षा गार्ड यांना महाराष्ट्र शासनाचे किमान वेतन दराप्रमाणे प्रत्येकवर्षी ०१ जानेवारी व ०१ जुलै रोजी होणारी स्पेशल अलौन्समधील वाढ देणेत येते. त्याचप्रमाणे संबंधित सुरक्षा एजन्सीमार्फत पुरविणेत येणा-या सर्व माजी सैनिक सुरक्षा अधिकारी, माजी सैनिक सुरक्षा सुपरवायझर, माजी सैनिक सशस्त्र सुरक्षा रक्षक व माजी सैनिक सुरक्षा गार्ड यांना देखील सदर स्पेशल अलौन्स वाढ देण्यात यावी. असा निर्णय झालेला आहे.

उदयोग, उर्जा, कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील दि.२८.०९.२०१० रोजीची अधिसुचना व मा. कामगार आयुक्त, मुंबई यांचे कार्यालयाकडून प्रसिध्द झालेले दि.०४.०२.२०१९ रोजीचे नोटीफिकेशन यांस अनुसरुन किमान वेतन अधिनियम १९४८ अंतर्गत शॉप ॲन्ड कमर्शिअल इस्टॅब्लीशमेंट झोन नं.३ ला अनुज्ञेय असणारेकिमान वेतन दर/वेतन दर अधिक ४०% वेतनवाढ धरुन येणारे वेतन दराबाबत दि.०८.०१.२०१४ ते दि.३०.०६.२०१९ अखेर खालीलप्रमाणे आदेश देण्यात आलेले आहेत.त्याप्रमाणे माजी सैनिक सुरक्षा कर्मचा-यांना वेतनदर देणेत येत आहे.

| अ. नं. | वर्गवारी | दि.०८/०१/२०१४ ते दि.३०/०६/२०१९ या कालावधीतील किमान वेतनदर/वेतनदर प्रतिदिनी / रुपये | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | २०१४ साली ठरविण्यात आलेले मुळवेतन रुपये / पैसे | दि.०४.०२.२०१९ नुसार स्पेशन अलौउन्स रुपये/पैसे | एकूण रक्कम (रुपये / पैसे) | किमान वेतनावर ४०% वाढीसहवेतनदर (रुपये / पैसे) |
| १ | सुरक्षा अधिकारी (माजी सैनिक) | ३८५.०० | ९७.२० | ४८२.२० | ६७५.०८ |
| २ | सुरक्षा सुपरवायझर (माजी सैनिक) | २८९.३३ | ९७.२० | ३८६.५३ | ५४१.१४ |
| ३ | सशस्त्र सुरक्षा रक्षक (माजी सैनिक) | २७१.०० | ९७.२० | ३६८.२० | ५१५.४८ |
| ४ | सुरक्षा गार्ड (माजी सैनिक) | २५०.०० | ९७.२० | ३४७.२० | ४८६.०८ |

आता उदयोग, उर्जा, कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील अधिसुचना क्रमांक किवेअ-१०१५-४१८/प्र.क्र.१४०/कामगार-०७, दि.२४.०७.२०१९अन्वये कंत्राटी कामगारांना देय्य असलेले मुळ किमान वेतनदर पुनर्निधारित केलेले आहेत. म्हणजेच सदर मूळ किमान वेतन दरात दि.२४.०७.२०१९ पासून वाढ करण्यात आलेली आहे. परंतू सदर अधिसुचनेत माजी सैनिक सुरक्षा अधिकारी, सुरक्षा सुपरवायझर, सशस्त्र सुरक्षा रक्षक व माजी सैनिक सुरक्षा गार्ड कर्मचा-यांना मुळवेतनाबाबत कुठल्याही प्रकारे दर कळविण्यात आलेले नसल्याने सदर सुरक्षा कर्मचा-यांना दि.०८.०१.२०१४ रोजी मा.व्यवस्थापन समितीने निश्चित केलेल्या दरांमध्ये दि.२४.०७.२०१९ रोजीचे अधिसुचनेस अनुसरुनव कामगार आयुक्त, कार्यालय, मुंबई यांचेकडील दि.०५.०८.२०१९ रोजीचे नोटीफिकेशन यास अनुसरुन किमान वेतन अधिनियम १९४८ अंतर्गत शॉप ॲन्ड कमर्शिअल इस्टॅब्लीशमेंट झोन नं.३ ला अनुज्ञेय असणारे कंत्राटी अकुशल/ कुशल सुरक्षा कामगारांचे विशेष भत्ता सह किमान वेतनदर / वेतनदर अधिक ४०% वेतनवाढ या प्रमाणे सुधारित वेतन दराबाबत खालीलप्रमाणे आदेश देता येईल.

| अ नं | वर्गवारी | दि.०१.०७.२०१९ ते दि.२३/०७/२०१९ या कालावधीतील वेतनदर (प्रतिदिनी / रुपये) | | | | दि.२४/०७/२०१९ पासूनचे लागू करावयाचे सुधारित किमान वेतनदर (प्रतिदिनी / रुपये) | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | | | | ४ | | | |
| | | मुळवेतन रुपये / पैसे | स्पेशन अलौउन्स रुपये / पैसे | एकूण रक्कम रुपये / पैसे | किमान वेतनावर ४०% वाढीसह वेतनदर रुपये / पैसे | नव्याने निश्चित करावयाचे मुळवेतन रुपये / पैसे | स्पेशन अलौउन्स रुपये / पैसे | एकूण रक्कम रुपये / पैसे | किमान वेतनावर ४०% वाढीसह वेतनदर रुपये / पैसे |
| १ | सुरक्षा अधिकारी (माजी सैनिक) | ३८५.०० | १११.७४ | ४९६.७४ | ६९५.४४ | ५२५.९० | १५.०० | ५४०.९० | ७५७.२६ |
| २ | सुरक्षा सुपरवायझर (माजी सैनिक) | २८९.३३ | १११.७४ | ४०१.०७ | ५६१.५० | ४३०.२३ | १५.०० | ४४५.२३ | ६२३.३२ |
| ३ | सशस्त्र सुरक्षा रक्षक (माजी सैनिक) | २७१.०० | १११.७४ | ३८२.७४ | ५३५.८४ | ४११.९० | १५.०० | ४२६.९० | ५९७.६६ |
| ४ | सुरक्षा गार्ड (माजी सैनिक) | २५०.०० | १११.७४ | ३६१.७४ | ५०६.४४ | ३५९.६७ | १५.०० | ३७४.६७ | ५२४.५४ |

उपरोक्त तक्त्यातील अ.नं.०४ मध्ये नमूद केलेप्रमाणे माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी यांना दि.२४.०७.२०१९ पासून सुधारित वेतनदर देता येईल असे मत आहे.

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मतः- सबब, सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर यांचेमार्फत संस्थानला कंत्राटी पध्दतीने पुरविणेत येणारे माजी सैनिक, सुरक्षा अधिकारी, सुरक्षा सुपरवायझर, सशस्त्र सुरक्षा रक्षक व सुरक्षा गार्ड यांना दि.०८.०१.२०१४ चे मा.व्यवस्थापन समिती सभेतील चर्चेत ठरल्याप्रमाणे आजतागयत मुळ वेतन दर देण्यात येत होते. परंतू उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील सुधारित मुळवेतनाबाबत दि.२४.०७.२०१९ रोजीचे अधिसुचनेत मागील मुळवेतन दर पुनर्निर्धारित केलेले आहेत. परंतू सदर दरांमध्ये माजी सैनिक सुरक्षा अधिकारी, सुरक्षा सुपरवायझर, सशस्त्र सुरक्षा रक्षक व सुरक्षा गार्ड यांचे मुळवेतन दर नमूद नसल्याने त्यांना उपरोक्त तक्त्यातील कॉलम ०४ प्रमाणे सुधारित मुळवेतन दर व विशेष भत्ता धरुन येणारे वेतनदर अधिक ४०% या पूर्वी देण्यात आलेली वाढ या प्रमाणे सुधारित वेतनदर दि.२४.०७.२०१९ पासून देणेस मान्यता असावी.

तसेच यापुढे महाराष्ट्र शासनाकडून नियमानुसार कंत्राटी कामगारांचे मुळवेतन व विशेष भत्ता याप्रमाणे किमान वेतनामध्ये वेळोवेळी होणारी वाढ लागू करणेचे अधिकार पुर्वीप्रमाणेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रदान करणेस मान्यता असावी.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४५४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उदयोग, उर्जा, कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील अधिसुचना क्रमांक किवेअ-२०१५-४१८/प्र.क्र.१४०/कामगार-०७, दि.२४.०७.२०१९ अन्वये प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे कंत्राटी कामगारांना देय असलेले मुळ किमान वेतनदरानुसार सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर यांचेमार्फत संस्थानला कंत्राटी पध्दतीने पुरविणेत येणारे माजी सैनिक, सुरक्षा अधिकारी, सुरक्षा सुपरवायझर, सशस्त्र सुरक्षा रक्षक व माजी सैनिक सुरक्षा गार्ड यांना सुधारित मुळवेतन दर व विशेष भत्ता धरुन येणारे वेतनदर अधिक यापूर्वी देण्यात आलेली ४०% वाढ या प्रमाणे सुधारित वेतनदर दि.२४.०७.२०१९ पासून देणेस मान्यता देण्यात आली. तसेच यापुढे महाराष्ट्र शासनाकडून नियमानुसार कंत्राटी कामगारांचे मुळवेतन व विशेष भत्ता याप्रमाणे किमान वेतनामध्ये वेळोवेळी होणारी वाढ लागू करणेचे अधिकार पुर्वीप्रमाणेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रदान करण्यात यावे, असे ठरले.**

**(कार्यवाही-कामगार विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०८** **संस्थानला कंत्राटी पध्दतीने अकुशल, कुशल कर्मचारी पुरविणेकामी नवीन कॉन्ट्रकटर्सची नेमणूक करणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानचे विविध विभागांना लागणारे अकुशल, कुशल कंत्राटी कर्मचारी पुरविणेकामी नवीन कॉन्ट्रॅक्टर्सची नेमणूक करणेबाबत ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती.

| | | |
|---|---|---|
| १ | खरेदी करावयाचे साहित्य / वस्तुचा तपशिल. | **अकुशल, कुशल कंत्राटी कर्मचारी पुरविणेकामी नवीन कॉन्ट्रॅक्टर्स नेमणूकीबाबत- २०१९-२०** |
| २ | मागणी | अकुशल- ११०० व कुशल- ६८४, एकूण- १७८४ |
| ३ | ई-निविदा प्रसिध्दी | दि.११.०६.२०१९ ते दि.३१.०७.२०१९ |
| ४ | वृत्तपत्राच्या अधिसुचनेच्या व्यतिरिक्त चौकशी कशी पाठवली जाते ? | www.mahatenders.gov.in, संस्थान वेबसाईट |
| ५ | तर तसे, कोणाला पाठविले ? | -- |
| ६ | निविदा सुरु झालेची दिनांक व वेळ | दि.११.०६.२०१९ रोजी सकाळी- ११.०० वा. |
| ७ | प्राप्त निविदाकारांची संख्या. | **०३ ( तीन )** |
| ८ | पात्र निविदाकारांची संख्या. | **०३ ( तीन )** |
| ९ | सर्व निविदाकारांनी नमुने दिली आहेत का. | निविदेत नमुने मागविलेले नाहीत. |
| १० | सर्व निविदाकारांनी बयाणा रक्कम आदा केली आहे का. | होय. |
| ११ | जर नमूने दिले नाही, तर का. | निविदेत नमुने मागविलेले नाहीत. |

१२ निविदाकारांनी सादर केलेले दर-

| अ.क्र | निविदाकाराचे नाव | सादर केलेले दर प्रती नग रु | स्थिती |
|---|---|---|---|
| १. | मे.बी.व्ही.जी.इंडिया.लि.पुणे | ०.०००००००००१ | **L - 1** |
| २. | मे.मॉडर्न फॅसेलिटी मॅनेजमेंट लि.पुणे | ०.०००००००००१ | **L - 1** |
| ३. | मे.वर्ल्ड क्लास सर्व्हिसेस, लि. इन्दौर | ३.६८०००००००० | **L - 2** |

१३ यापुर्वी केलेल्या खरेदीचा तपशील आणि खरेदी दर -

| अ.क्र. | वर्ष | परिमाण | (सेवा कर दर) |
|---|---|---|---|
| १ | सन २०१८ – १९ करीता | -- | सर्व्हिस चार्जेस दर ०.०००००००१ % |

१४ मागील वर्षात वापरण्यात आलेल्या परिमाणाचा तपशिल -

| अ.क्र | तपशील | वर्ष | खर्च परिमाण |
|---|---|---|---|
| १ | अकुशल, कुशल कंत्राटी कर्मचारी | २०१८ - १९ | -- |

| | | |
|---|---|---|
| १५ | सध्याची शिल्लक स्थिती | -- |
| १६ | मागील खरेदी दर | सर्व्हिस चार्जेस दर ०.०००००००१ % |
| १७ | मागील पुरवठादार | १) मे.बी.व्ही.जी.इंडिया,लि.पुणे |
| १८ | सध्याचे न्युनतम निविदाकाराने सादर केलेले दर | ०.०००००००००१ |
| १९ | सध्याचे न्युनतम निविदाकाराचे नाव | **१)मे.बी.व्ही.जी.इंडिया, लि.पुणे**<br>**२)मे.मॉर्डर्न फॅसेलिटी मॅनेजमेंट, लि. पुणे** |
| २० | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला आहे का ? | होय |
| २१ | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला असल्यास उपस्थितांची नावे. | मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, प्र. उप मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, प्र.मुख्य लेखाधिकारी |
| २२ | घाऊक आणि किरकोळ दर यांचे तपशील अंदाजे रु. प्रति सेट मार्केट रेट रु. | |

| २३ | मागील खरेदी | सध्याचे प्राप्त दर | फरक | % ने कमी / जास्त |
|---|---|---|---|---|
| | रु.०.०००००००१% | रु.०.०००००००००१ | रु.०.०००००००० | -- |

मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२६.०२.२०१९, निर्णय क्र.११० अन्वये सन २०१९-२० कालावधीसाठी संस्थानला कंत्राटी अकुशल, कुशल कर्मचारी पुरविणेकामी नवीन कॉन्ट्रॅक्टर्सची नेमणूक

करणेकामी व निविदा मागविणेस व तसेच जाहिरात प्रसिध्द करणेस व येणा-या खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार www.mahatenders.gov.in, व संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात प्रसिध्द करणेत आलेली होती.

सदर ई-निविदेमध्ये ०३ निविदा धारकांनी भाग घेतला होता. प्राप्त निविदा (तांत्रिक निविदा) दि.०३.०८.२०१९ रोजी खरेदी समिती सभेसमोर उघडण्यात आले असून याकामी तांत्रिक निविदेमध्ये पात्र ठरलेल्या ०३ निविदाधारकांच्या कमर्शिअल (वाणिज्यीक) निविदा दि.१४.०८.२०१९ रोजी खरेदी समिती सभेसमोर उघडणेत आलेल्या आहेत.

उघडण्यात आलेल्या वाणिज्यिक निविदेचा तपशिल पुढील प्रमाणे

| अ.नं. | कामाचा तपशिल | मे.बी.व्ही.जी.इंडिया लि. पुणे यांचे दर % | वर्ल्ड क्लास सर्व्हीसेस ,लि. इंदौर यांचे दर % | मे.मॉडर्न फॅसेलिटी मॅनेजमेंट,लि. पुणे यांचे दर % |
|---|---|---|---|---|
| १) | Service Charges ( in Percentage) for Skilled. Unskilled and other Contract employees as mentioned on page no.9-10 of tender document (Excluding PF,GST, Group Insurance, Ex-gratia etc.) | 0.0000000001 | 3.6800000000 | 0.0000000001 |

उपरोक्त प्राप्त वाणिज्यीक निविदेतील मे.बी.व्ही.जी.इंडिया लि. पुणे व मे.मॉडर्न फॅसेलिटी मॅनेजमेंट, लि. पुणे यांचे दर 0.0000000001 याप्रमाणे दर (न्युनत्तम) L1 आहेत.

श्री. संजय कौशिक, वर्ल्ड क्लास सर्व्हीसेस लि. यांनी दि.१४.०८.२०१९ रोजी संस्थानकडे पाठविलेल्या ई-मेल मध्ये सादर केलेल्या तक्रारीत खर्च विभाग, अर्थ मंत्रालय, भारत सरकार यांनी दि.२८ जानेवारी २०१४ रोजीचे तरतुदीनुसार, मे.बी.व्ही.जी.इंडिया लि. पुणे व मे.मॉडर्न फॅसेलिटी मॅनेजमेंट, लि. पुणे यांच्या निविदा रद्द करणेबाबत विनंती केली आहे.

अर्थ मंत्रालय, भारत सरकार यांनी दि.२८ जानेवारी २०१४ रोजी " निविदेच्या संदर्भात सर्व साधारण आर्थिक नियम २००५ मध्ये 'शुन्य', 'निल' दराबाबत ( No.29(1)/2014-PPD) प्रसिध्द केलेल्या कार्यालयीन निवेदनात " खालील प्रमाणे नमूद केलेले आहे.

"It is therefore, decided that the Ministries / Departments may consider inclusion of the clause in the bid documents itself that "If a firm quotes 'Nil' charges /consideration, the bid shall be treated as unresponsive and will not be considerd " सदर कार्यालयीन निवेदनात नमूद केलेप्रमाणे जर एखादी संस्था/इच्छुक निविदाधारक निविदेत 'Nil' शुल्क नमूद करते त्यावेळी ती निविदा निषेधार्थ मानली जाईल, आणि त्याचा विचार केला जाणार नाही.

तसेच, वाणिज्य व उद्योग मंत्रालय, भारत सरकार यांचेकडील पत्र क्र.No.31/14/1000/2014-GA दि.१७ सप्टेंबर, २०१४ मध्ये खालील प्रमाणे नमूद केलले आहे. QUOTATION OF SERVICE CHARGES IN CONTRACTS / TENDERS ''Department of Commerce upholding ministry of Finance, Department of Experditure, ruling on the subject issues directives that quotations offered over and above the minimum wages of the Central / State Government (as applicable) pertaining to Service Charges / Administrative Charges quoted by the bidder necessarily has to be over and above Zero percent. Further zero percent includes all derivatives of zero upto 0.9999 and thereof. Any Service Charge not adhering to the above guidelines should be considered unresponsive and such bid should not be considered.''

यापुर्वी कोणत्याही ठेकेदाराने किंवा एजन्सीने झिरो सर्व्हिस चार्जेसबाबत आक्षेप घेतलेला नाही. संस्थानमार्फत प्रसिध्द करणेत आलेल्या निविदेत, उपरोक्त मा.शासनाचे तरतुदीबाबत कोणताही उल्लेख केलेला नव्हता. त्यामुळे कंत्राटी पध्दतीने अकुशल/कुशल व इतर कामगार पुरविणेबाबत राबविणेत आलेली निविदा प्रक्रिया रद्द करुन, उपरोक्त प्रमाणे वित्त मंत्रालय, भारत सरकार यांचेकडील कार्यालयीन निवेदनात नमूद केलेली विहीत अट निविदेमध्ये नमूद करुन, पुन:श्च नव्याने फेर ई-निविदा प्रक्रिया सुरु करणेत यावी किंवा कसे अथवा उपरोक्त निविदाधारकांमधील L1 या निविदाधारकांना कार्यादेश द्यावा किंवा कसे? अथवा सदर शासनाचे

तरतुदीबाबत मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग/प्रधान सचिव, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे लेखी मार्गदर्शन घ्यावे किंवा कसे? याबाबत निर्णयास्तव सादर.

तरी याबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४५५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे विविध विभागांना लागणारे अकुशल, कुशल कंत्राटी कर्मचारी पुरविणेसाठी नवीन कॉन्ट्रॅक्टर्सची नेमणूक करणेकामी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम निविदाधारक मे.बी.व्ही.जी.इंडिया लि. पुणे व मे.मॉडर्न फॅसेलिटी मॅनेजमेंट,लि.पुणे यांना विभागुन कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही- कामगार विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०९** **सन २०१९-२० मसालेच्या प्रथम ई-निविदेतील पुरवठाधारक मे.बद्रीनारायण रतनलाल चांडक, जळगाव यांनी हिरवी विलायचीचा पुरवठा न केल्यामुळे त्यांचेवर कार्यवाही करणेबाबत.**

**प्रस्ताव-** सन २०१९-२० करीता किराणामाल व अनुषंगिक साहित्य खेरदीकामी ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यापैकी मसाले ई-निविदेच्या निवडलेल्या निविदाधारकांच्या नमुन्यामध्ये मे.बद्रीनारायण रतनलाल चांडक, जळगांव यांचे खालील आयटेम्ससाठी न्युनतम दर आले होते. त्यामुळे त्यांना इकडील जा.नं.एसएसएस / वशी-खरेदी/८३९/२०१९ दि.११.०६.२०१९ अन्वये खालीलप्रमाणे पुरवठा आदेश देण्यात आला होता.

| Sr.No | Description of the Item | Approximate Quantity | Units | Rate Per Quintal | Amount |
|---|---|---|---|---|---|
| Supply Period- April to March-2020 | | | | | |
| 1 | Cinnamom (Dalchini) Best Quality | 1 | Quintal | 22,000.00 | 22,000.00 |
| 2 | Dry Ginger (Sunth) Dry, Best Quality | 3 | Quintal | 30,000.00 | 90,000.00 |
| 3 | Green Cardamom (Hirvi Vilayachi) - Bold Dry | 40.9 | Quintal | 175,000.00 | 7,157,500.00 |
| | Total Amount Rs. | | | | 7,269,500.00 |
| | 3% Security Deposit | | | | 218,085.00 |

त्यांना दि.२०.०६.२०१९ रोजी जून महिन्यासाठीचे हिरवी विलायचीचे ६०० किलोचे पुरवठा चलनही पाठविले होते तसेच वारंवार दुरध्वनीवरून पाठपुरावा केला होता. परंतु त्यांनी अदयाप हिरवी विलायचीचा पुरवठा केलेला नाही. तसेच ते करारनाम्यासाठी आलेले नाही.

हिरवी विलायचीचा पुरवठा न केलेमुळे मे.बद्रीनारायण रतनलाल चांडक, जळगांव यांना इकडील जा.नं.एसएसएस/वशी-खरेदी/१४०४/२०१९ दि.१५.०७.२०१९ अन्वये ७ दिवसांत हिरवी विलायचीचा पुरवठा न केल्यास निविदेतील अटी-शर्ती प्रमाणे उचित कार्यवाही करण्यात येईल असे रजिस्टर्ड ए.डी पोस्टाव्दारे नोटीस पाठवून कळविण्यात आले होते. तसेच सदर नोटीस त्यांना दि.१५.०७.२०१९ रोजी ई-मेलव्दारेही पाठविण्यात आली होती.

सदर नोटीस मे.बद्रीनारायण रतनलाल चांडक, जळगांव यांना दि.१७.०७.२०१९ रोजी मिळाली आहे. तसा अहवाल पोस्टाकडून प्राप्त झाला आहे. तथापि मे.बद्रीनारायण रतनलाल चांडक, जळगांव यांचेकडून हिरवी विलायचीचा पुरवठा झालेला नाही.

दरम्यान मे.बद्रीनारायण रतनलाल चांडक, जळगांव यांनी संस्थानचे नोटीसचा संदर्भ न देता दि.१९.०७.२०१९ चे पत्राने खालीलप्रमाणे विनंती केली आहे.

“मला २०१९-२० करीता विलायची पुरवठाचे कंत्राट मिळाले होते. हया वर्षी ज्या ठिकाणी विलायची उत्पन्न होते त्या जागेवर मार्च, एप्रिलमध्ये (केरळ) पाऊसच झाला नाही. त्या कारणास्तव येणारे वेलचीचे उत्पन्न जवळपास १ महिना उशीरा होईल. तसेच जुना मालाचा साठा नगण्य राहिल्याने विलायचीचे केरळ मधील लिलाव

सुध्दा बंद होते. मी आपणास विनंती करतो की १ महिन्यानंतर विलायची येण्यास सुरवात होईल त्या नंतर मी पुरवठा देऊ शकतो. कृपया सहानुभुतीपुर्वक विचार करावा, ही नम्र विनंती."

मे.बद्रीनारायण रतनलाल चांडक, जळगांव यांनी दि.०७.०८.२०१९ चे ई-मेल अन्वये "Due to unavailability of cardamom in all Indian market. I cant't supply cardamom." असे कळविले आहे.

मे.बद्रीनारायण रतनलाल चांडक, जळगांव यांची संस्थानकडे खालीलप्रमाणे रक्कम जमा आहे.

| अ.नं | तपशिल | रक्कम रूपये |
|---|---|---|
| १ | बयाणा रक्कम रू. | १,५०,०००/- |
| २ | दालचिनी बील रक्कम रू | ४,४००/- |
| | एकुण रक्कम रूपये | १,५४,४००/- |

मे.बद्रीनारायण रतनलाल चांडक, जळगांव यांनी दालचिनी १० किलोचा पुरवठा केला आहे. सुंठीची संस्थानने त्यांचेकडे आतापर्यंत मागणी केलेली नाही. मात्र मे.बद्रीनारायण रतनलाल चांडक, जळगांव यांनी हिरवी विलायचीचा पुरवठा केला नाही म्हणून त्यांचेवर कारवाई करावी लागेल. त्यांना हिरवी विलायचीसोबत वर नमूद केलेप्रमाणे दालचिनी व सुंठीचा वार्षिक पुरवठा आदेश दिलेला आहे. मे.बद्रीनारायण रतनलाल चांडक, जळगांव या फर्मवर कारवाई करावी लागणार असल्यामुळे त्यांचा संपूर्ण पुरवठा आदेश रद्द करून त्यांना दिलेले पुरवठा आदेशातील दालचिनी (मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक यांचे व मे.बद्रीनारायण रतनलाल चांडक, जळगांव यांचे दर समान असल्यामुळे सन २०१९-२० साठी विभागून वार्षिक पुरवठा आदेश दिलेला असल्यामुळे) मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक यांना वार्षिक मागणीप्रमाणे पुन्हा अतिरिक्त पुरवठा आदेश देऊन मान्य दराने दालचिनी खरेदी करता येईल. मात्र सुंठ दरपत्रके मागणी करून खरेदी करावी लागेल. तर हिरवी विलायची खरेदीसाठी संस्थानकडून नव्याने ई-निविदा प्रक्रिया चालू आहे.

मे.बद्रीनारायण रतनलाल चांडक, जळगांव यांनी हिरवी विलायचीचा पुरवठा करणेस असमर्थता दर्शविल्यामुळे त्यांची वरीलप्रमाणे संस्थानकडे जमा असलेली रक्कम रू.१,५४,४००/- जप्त करून मे.बद्रीनारायण रतनलाल चांडक, जळगांव यांचे नांव पुढील ३ वर्षासाठी काळया यादीत समावेश करण्याचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीसमोर सादर करावा लागेल असे मत आहे.

तरी,

मे.बद्रीनारायण रतनलाल चांडक, जळगांव यांचा वरील नमूद पुरवठा आदेश रद्द करून त्यांची संस्थानकडे जमा असलेली बयाणा व बील रक्कम अशी मिळून एकूण रक्कम रू.१,५४,४००/- जप्त करणेस व त्यांचे नांवाचा पुढील ३ वर्षाकरीता काळया यादीत समावेश करणेस तसेच दालचिनी मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक यांचेकडून सन २०१९-२० या वर्षाचे मान्य दराने खरेदी करणेस व सुंठ दरपत्रके मागवून खरेदी करणेस मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेत सादर.

**निर्णय क्र.४५६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.बद्रीनारायण रतनलाल चांडक,जळगांव यांचा उपरोक्त प्रस्तावात नमूद पुरवठा आदेश रद्द करून त्यांची संस्थानकडे जमा असलेली बयाणा रक्कम रु.१,५०,०००/- व दालचिनी बीलाची रक्कम रु.४,४००/-अशी एकूण रक्कम रू.१,५४,४००/- मात्र जप्त करण्यात येऊन त्यांचे नावाचा पुढील तीन वर्षाकरीता काळया यादीत समावेश करण्यात यावा,असे ठरले. सन २०१९-२० च्या वार्षिक ई-निविदा प्रक्रियेमध्ये दालचीनचे दर मे.बद्रीनारायण रतनलाल चांडक, जळगांव व मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक यांचे दर समान असल्यामुळे सन २०१९-२० साठी विभागून वार्षिक पुरवठा आदेश देण्यात आलेला होता. परंतु मे.बद्रीनारायण रतनलाल चांडक,जळगांव यांचा काळया यादीत समावेश केल्याने मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक यांचेकडून दालचिनी खरेदी करण्यास तसेच सुंठ ची वार्षीक खरेदी रक्कम रु.३ लाखाचे आत असल्याने सुंठ खरेदीसाठी दरपत्रके मागविणेस व हिरवी विलायची खरेदीसाठी नव्याने विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-खरेदी विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१०** **श्रींचे दर्शनार्थ येणाऱ्या सन्माननिय अतिथी साईभक्तांचे सत्कारासाठी वापरणेत येत असलेल्या श्रींचे मुर्त्यांना लाकडी गट्टु/ठोकळयावर संस्थानचे नाव असलेली प्लेट खरेदी किंवा देणगी घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्रींचे दर्शनार्थ समाधी मंदिरात महत्वाचे, अति महत्वाचे तसेच देणगीदार, सन्मानिय साईभक्त येत असतात. त्यावेळी सदरहू साईभक्तांचा संस्थानमार्फत येथोचित सत्कार करण्यात येतो. सत्काराचे वेळी शॉल व श्रींची मूर्ती देण्यात येते.

श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव काळात श्रींचे दर्शनार्थ येणा-या महत्वाचे, अति महत्वाचे तसेच देणगीदार, सन्मानिय साईभक्तांचा सत्कार करणेत आले होते. त्यावेळी सदरहू श्रींचे मूर्तीला खालील बाजूने लाकडी गट्टू/ठोकळा लावून त्यावर श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी चे नाव असलेली PVC FollEnqraving Sheet मध्ये प्लेट लावणेत आलेली होती. तदनंतर आता सध्या श्रींचे दर्शनार्थ आलेल्या महत्वाचे सन्मानिय साईभक्तांचे सत्कारासाठी खालील बाजूस लाकडी गट्टू / ठोकळा नसलेली मूर्ती देणेत येते. सदरहू मूर्ती हया निम्नतम दराचे वार्षिक पुरवठादार यांचेकडून मंदिर विभागास पुरविणेत येतात.

परंतू मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांनी येथून पूढे श्रींचे दर्शनार्थ येणा-या सन्मानिय साईभक्तांचे सत्कारासाठी वापरण्यात येणा-या श्रींचे मूर्तींना लाकडी गट्टू तसेच त्यावर संस्थानचे नाव असलेल प्लेटही लावणेत यावी, असे निर्देश केलेले आहे. तसेच दि. १९/०६/२०१९ रोजीचे टिपणीवर सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेणे बाबतही निर्देश केलेले आहे.

सदरहू श्रींचे मूर्तींकरीता बांधकाम विभागामार्फत खालील बाजूस लागणारे लाकडी गट्टू/ ठोकळे तयार करुन त्यावर लावणेकरीता SHRI SAIBABA SANSTHAN TRUST, SHIRDI नाव असलेल्या PVC FollEnqraving Sheet मध्ये गोल्डन/ सिलव्हर प्लेटस् देणगी स्वरुपात स्विकारता येईल अथवा खरेदी करता येतील. याकामी माहे- एप्रिल-२०१९ ते माहे- जुलै-२०१९ आज अखेर खर्च तपशिल खालीलप्रमाणे-

| अ.नं. | पावडर मार्बल मुर्ती नग खर्च तपशिल | एकूण नग |
|---|---|---|
| ०१ | पावडर मार्बल मुर्ती नं.०४ माहे- एप्रिल-२०१९ | २० नग |
| ०२ | पावडर मार्बल मुर्ती नं. ०४ माहे- मे-२०१९ | ८० नग |
| ०३ | पावडर मार्बल मुर्ती नं. ०४ माहे- जुन-२१९ | ८३ नग |
| ०४ | पावडर मार्बल मुर्ती नं. ०४ माहे-जुलै-२०१९ | ११३ नग |
| - | एकूण मुर्ती नग | २९६ नग |

उपरोक्त प्रमाणे मंदिर विभागामार्फत माहे- एप्रिल-२०१९ ते माहे- जुलै-२०१९ आज अखेर एकूण पावडर मार्बल मुर्ती २९६ नग खर्च झालेले आहे. PVC FollEnqraving Sheet मध्ये गोल्डन/ सिलव्हर प्लेटस् खरेदी करणेस झाल्यास माहे- मार्च-२०२० अखेर एकूण १००० नगप्रमाणे अंदाजे दर रुपये १६०/- प्रमाणे एकूण १,६०,०००/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

तरी श्रींचे दर्शनार्थ समाधी मंदिरात येणा-या महत्वाचे व देणगीदार साईभक्तांचे सत्कारासाठी येथून पूढे वापरणेत येणा-या श्रींचे मूर्तींना बांधकाम विभागामार्फत लाकडी गट्टू/ ठोकळा तयार करुन बसवून मिळणेस विनंती.

तसेच PVC FollEnqraving Sheet मध्ये गोल्डन/ सिलव्हर प्लेटस् नांवसह देणगी स्वरुपात स्विकारणेस अथवा कोटेशन मागवून खरेदी करणेस अंदाजे रुपये १,६०,०००/- मात्रचे खर्चाचे प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४५७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रींचे दर्शनार्थ येणाऱ्या सन्माननिय अतिथी साईभक्तांचे सत्कारासाठी वापरणेत येत असलेल्या श्रींचे मुर्त्यांना खालील बाजूने लाकडी गट्टू/ठोकळा बांधकाम विभागामार्फत तयार करुन बसविणेत यावा असे ठरले. त्यावर श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी चे नाव असलेली PVC Foll Enqraving Sheet मध्ये प्लेट लावणेकामी सदर प्लेट देणगी स्वरुपात स्विकारणेस तसेच देणगी स्वरुपात न मिळाल्यास विहीत पध्दतीने खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.१,६०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** **(कार्यवाही-मंदिर विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.११** **शासनाच्या Amnesty Scheme योजनेअंतर्गत पहिल्या टप्प्यात आदा करण्यात आलेल्या रु.२६,७०,०९,३४३/- कराव्यतिरिक्त व्हॅट करनिर्धारण आदेशाअंती देय होणारा रु.१,४८,२२,७५७/- व्हॅटकर आदा करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानला अनोंदणीकृत विक्रेता गृहीत धरुन विक्रीकर विभाग, अहमदनगर कार्यालयाने आर्थिक वर्ष २००९-१० व २०१०-११ चे व्हॅट करनिर्धारण करुन रु.४२,८३,६७,६२९/- व्हॅटकर अदा करणेबाबत व आर्थिक वर्ष २०११-१२ ते २०१७-१८ अखेर रु.६६,९४,१७,७८४/- व्हॅटकर, त्यावरील व्याज व दंड अशी एकुण रु.१०९,७७,८५,४१३/- देय व्हॅटकर रक्कम भरणा करणेबाबत दि.२५.०७.२०१९ रोजी कळविले आहे. शासनाने Amnesty Scheme जाहीर केली असुन त्यामध्ये पहिल्या टप्प्यात व्हॅटकरात ७०%, त्यावरील व्याजात ८०% व दंडरक्कमेत ९०% सुट मिळण्याची तरतुद आहे. त्यानुसार विक्रीकर विभागाने दि.२५.०७.२०१९ रोजीचे Courtesy Letter द्वारे Amnesty Scheme योजनेतील सवलत गृहीत धरुन एकुण रु.३४,४७,०२,६३२/- तडजोड रक्कम भरणेबाबत कळविले होते.

सदर बाबत दि.२६.०७.२०१९ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यामध्ये आर्थिक वर्ष २००९-१० व २०१०-११ चे व्हॅटकर आदेशाविरुद्ध विक्रीकर विभागाकडे अपिल करणे, त्याकरिता देय होणारी १०% रक्कम रु.१,४६,१२,२५५/- भरणेबाबत व अपिलाअंती कमी होणारा व्हॅटकर गृहीत धरुन रु.२६,७०,०९,३४३/- तडजोड रक्कम अदा करणेबाबत प्रस्ताव सादर करण्यात आला होता. निर्णय क्र.४२९/दि.२६.०७.२०१९ अन्वये विक्रीकर विभागाकडे अपिल दाखल करण्यास व विक्रीकर विभागाने कळविलेली रक्कम रु.२६,७०,०९,३४३/- विहीत पद्धतीने विक्रीकर विभागास अदा करण्यास व त्याअनुषंगाने येणा-या खर्चास मान्यता मिळाली होती. त्यास अनुसरुन दि.३१.०७.२०१९ रोजी विहीत पद्धतीने वर्षनिहाय चलनांद्वारे ऑनलाईन रक्कम वर्ग करण्यात आली होती.

विक्रीकर विभागाने दि.३१.०७.२०१९ रोजी अदा करण्यात आलेल्या व्हॅटकराची रक्कम गृहीत धरुन व आर्थिक वर्ष २००९-१० व २०१०-११ चे अपिल पुर्ण करुन व उर्वरीत आर्थिक वर्ष २०११-१२ ते २०१७-१८ ची वर्षनिहाय व्हॅट करनिर्धारणे करुन दि.१३.०८.२०१९ रोजी व्हॅट करनिर्धारण आदेश दिले आहेत. त्यामध्ये अदा करण्यात आलेल्या रु.२६,७०,०९,३४३/- रक्कमेव्यतिरिक्त Amnesty Scheme च्यादुस-या टप्प्यास अनुसरुन व्हॅटकर, त्यावर व्याज व दंड अशी अंतिम तडजोड रक्कम रु.१,४८,२२,७५७/- देय असलेबाबत कळविले आहे. संस्थान व्हॅटकर सल्लागार मे.सुरेश डी. डौले ॲण्ड कं., चार्टर्ड अकौंटंट, राहुरी यांनी सदर करनिर्धारण आदेशांची तपासणी करुन देय होणारी रक्कम अदा करणेबाबत दि.१६.०८.२०१९ रोजीचे पत्राद्वारे कळविले आहे. दि.२५.०७.२०१९ रोजीचे Courtesy Letter द्वारे रु.२६,७०,०९,३४३/- कर अदा करणेबाबत कळविले होते. त्यानंतर प्रत्यक्ष वर्षनिहाय करनिर्धारणे करुन दि.१३.०८.२०१९ रोजी करनिर्धारण आदेश दिले आहेत. यामध्ये सन २०१४-१५ ते २०१७-१८ या कालावधीत व्हॅटकर दरामध्ये वाढ, अनोंदणीकृत विक्रेता म्हणुन वर्षाच्या सुरुवातीपासुन व्याज आकारणी व त्यावरील दंड यामुळे रु.१,४८,२२,७५७/-व्हॅटकर देय असलेबाबत कळविले आहे.

अशाप्रकारे एकुण रु.२८,१८,३२,१००/- देय व्हॅटकरापैकी दि.३१.०७.२०१९ रोजी रु.२६,७०,०९,३४३/- आदा करण्यात आले असुन Amnesty Scheme दुस-या टप्प्यात लागु असलेल्या मध्ये व्हॅटकरात २०% सुट, व्याजात ७०% व दंड रक्कमेत ८०% सुट गृहीत धरुन दुस-या टप्प्यात रु.१,४८,२२,७५७/- देय होत आहेत. Amnesty Scheme पहिला टप्पा मुदत दि.२३.०८.२०१९ अखेर वाढली असुन पहिल्या टप्प्यांतर्गत व्हॅटकर भरणा झाल्यास रु.१,०५,९१,०७०/- अदा करावी लागेल. साधारणतः रु.४२,३१,६८६/- चा लाभ पहिल्या टप्प्यात होऊ शकेल. तथापि, सदर बाब विक्रीकर विभाग मान्य करणेबाबत शाश्वती देता येत नाही. करिता अंतिमतः भरणा करेपर्यंत पहिल्या टप्प्याचा लाभ मिळणार असल्यास रु.१,०५,९१,०७०/- व्हॅटकर भरणा करण्यास व दुसरा टप्प्यात लाभ दिल्यास तो कमी झाल्याने देय होणारी अंतिम तडजोड रक्कम रु.१,४८,२२,७५७/- विहीत पद्धतीने Commissioner of Sales Tax, Ahmednagar यांचे नांवे ऑनलाईन चलनांद्वारे अदा करण्यास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीच्या सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४५८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शासनाच्या Amnesty Scheme योजनेअंतर्गत पहिल्या टप्प्यात आदा करण्यात आलेल्या रु.२६,७०,०९,३४३/- व्हॅट कराव्यतिरिक्त प्रत्यक्ष कर निर्धारण आदेशानुसार सन २०१४-१५ ते २०१७-१८ या कालावधीत व्हॅटकर दरामधील वाढ, अनोंदणीकृत विक्रेता त्यामुळे व्याज व दंडासह देय होत असलेली व्हॅटकर रक्कम रु.१,४८,२२,७५७/-मात्र शासनाकडे ऑनलाईन चलनाद्वारे आदा करण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-लेखाशाखा)**

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१२** **माहे मार्च-२०१९ जमा-खर्च तक्त्याची नोंद घेणेबाबत.**
**प्रस्ताव-** लेखाशाखा विभागामार्फत दरमहा संस्थानला सर्व मार्गाने जमा होणा-या व संस्थानकडून खर्च होणा-या रकमांचा जमा-खर्च तक्ता तयार करण्यात येतो. सदर जमा व खर्चाच्या आकडेवारीचा तक्ता मा.व्यवस्थापन समितीच्या सभेसमोर नोंद घेण्यासाठी सादर करण्यात येत असतो.

त्या अनुषंगाने माहे मार्च-२०१९ या कालावधीतील मासिक जमा-खर्चाचे तक्ते तयार करण्यात आले असून ते मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर नोंद घेणेसाठी सादर करणे आवश्यक आहे. जमा-खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे -

| अ.नं. | महिना | जमा | खर्च |
|---|---|---|---|
| ०१ | मार्च-२०१९ | ६१,४०,३०,८८६/- | ५७,९४,१०,०२६/- |

तरी लेखापुस्तकाप्रमाणे माहे मार्च-२०१९ या कालावधीतील जमा खर्चाची नोंद घेण्यासाठी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर.

**निर्णय क्र.४५९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, माहे मार्च-२०१९ या कालावधीतील मासिक जमा-खर्च रकमेचे अवलोकन करुन त्याची नोंद घेण्यात आली.**

**(कार्यवाही- लेखाशाखा)**

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१३** **नविन कार्डीयाक रुग्णवाहीका खरेदी करणेस तसेच यातील उपकरणे बसविण्यास येणारे खर्चास व दरपत्रके / निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.**
**प्रस्ताव-** महाराष्ट्र शासन अधिनियम २००४ मधीलः-

१. कलम १७ (१) मध्ये,“राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून, संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्यती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यकत त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

२. कलम १७ (२-ण) मध्ये,मानवजातीचे कल्याण करणा-या किंवा मानवाला अपत्ती मध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल.

प्रास्ताविक- श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात उपचार घेणा-या रुग्णांकरीता पुढील उपचाराकरीता बाहेरील रुग्णालयात घेवुन जाणे कामी सध्या फोर्स मोटर्स कंपनीच्या ट्रॅव्हलर प्रकारच्या दोन कार्डीयाक रुग्णवाहीका वापरात आहेत त्यांची तपशिलवार माहिती खालील प्रमाणे आहे.

| अ.नं | वाहन क्रमांक | रजिस्ट्रेशन तारीख | आज अखेर कालावधी | आजतागायत प्रवास | आज तागायत दुरुस्ती देखभाली करीता झालेला खर्च |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | एमएच-१७-एजी -१०१६ | १०/०८/२०१० | ९ वर्षे | २,२६,७८५ किमी | ४,३८,४६०.०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ०२ | एमएच-१७-बीडी -९९३३ | २७/०६/२०१७ | २ वर्षे १ महिने | ४२,९५० किमी | ७९,१६२.०० |

उपरोक्त तपशिलातील अ.नं. १ मध्ये दर्शविलेली रुग्णवाहिका क्रमांक एमएच-१७-एजी -१०१६ ही कार्डीयाक रुगणवाहिका दिनांक १०/०८/२०१० रोजी रजीष्ट्रेशन करण्यात आलेली असून तीचा आज तागायत एकूण २,२६,७८५ किमी प्रवास झालेला आहे. तसेच तीचा आज तागायत दुरुस्ती देखभाली साठी एकूण रु ४,३८,४६०/- खर्च झालेला आहे. सदरची रुग्णवाहिका आता जूनी झाल्यामुळे तीच्य दुरुस्ती देखभाल खर्चात वाढ होत आहे . सबब एक नविन कार्डीयाक रुग्णवाहीका खरेदी करणेची आवश्यकता आहे.

सध्या बाजारात स्वराज्य माझदा कंपनीची Cardiac cum Trauma Care Unit,Bs4,Ps,A/C याप्रकारातील रुग्णवाहीका उपलब्ध अूसन तिच्यात कार्डीयाक रुग्णवाहिकेकरीता आवश्यक लागणारी उपकरणे बसविण्याची सुविधा या रुग्णवाहिकेत उपलब्ध आहे.

तसेच फोर्स कंपनीची Advance life support Ambulance (Type D) Bs 4, P s, A/ C या प्रकारची रुग्णवाहीका सध्या बाजारात उपलब्ध असुन तिच्यात देखील कार्डीयाक रुग्णवाहिकेकरीता आवश्यक लागणारी उपकरणे बसविण्याची सुविधा या रुग्णवाहिकेत उपलब्ध आहे.

महाराष्ट्र शासनाचे सुधारीत खरेदी नियम पुस्तीकेतील ३.२.३ (दरपत्रकाच्या आधारे खरेदी) मध्ये, "कोणत्याही वाहनाचे दरकरार DGS&D कडे उपलब्ध असतीलच असे नाही. त्यामुळे मोटार वाहने (कार) खरेदी ही वाहन उत्पादक/वितरक यांच्या दरपत्रकामार्फत देखील करता येईल. तथापि, मोटार वाहन (कार) खरेदी रु.१ कोटीपेक्षा जास्त असल्यास, ती ई-निवीदा प्रक्रियेमार्फतच करण्यात यावी." असे तरतूद आहे.

या खरेदी नियमावलीतील तरतुदीस अनुसरुन कार्डीयाक रुग्णवाहिका खरेदी करीता स्वराज्य माझदा (एसएमएल) तसेच फोर्स मोटर्स कंपनी/या कंपनीचे अधिकृत पुरवठादारांकडून दरपत्रके मागवावे लागतील.

तसेच सदरची रुग्णवाहिका खरेदी केल्यानंतर तीच्यात कार्डीयाक रुग्णवाहिकेकरीता आवश्यक लागणारी रुग्णालयीन उपकरणे साईबाबा हॉस्पिटल मार्फत बसवावे लागतील. याबाबत सदरचे विभागामार्फत विहीत पध्दतीने कार्यवाही करण्यात येईल.

विभागाचा स्पष्ट अभिप्रायः- श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात उपचार घेणा-या रुग्णांकरीता पुढील उपचाराकरीता बाहेरील रुग्णालयात घेवुन जाणे कामी वापरात असलेल्या दोन कार्डीयाक रुग्णवाहिके पैकी १ रुग्णवाहिका जुनी झाल्याने व तीच्या दुरुस्ती देखभाली वरील खर्चात वाढ होत आहे. त्यामुळे नविन कार्डीयाक रुग्णवाहिकेसाठी स्वराज्य माझदा कंपनीची Cardiac cum Trauma Care Unit, Bs4, Ps, A/C तसेच फोर्स कंपनीची Advance life support Ambulance (Type D) Bs4, Ps, A/C या प्रकारातील रुग्णवाहीकां उपलब्ध असलेने त्यांचे कंपनी / डिलर कडून दरपत्रके मागवून ज्यांचे दर कमी आहेत त्यांचे कडून रुग्णवाहिका खरेदी करावी लागेल. याकरीता अंदाजे रु.२५,००,०००/- (अक्षरी रुपये पंचविस लाख मात्र) खर्च अपेक्षीत आहे. सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरीता रुग्णवाहिका खरेदी कामी रु २५,००,०००/- अंदाजपत्रकीय तरतूद करण्यात आलेली असून सदरचा खर्च यातरतूदीतून करता येईल..

सदरची रुग्णवाहिका खरेदी केल्यानंतर तीच्यात कार्डीयाक रुग्णवाहिकेकरीता आवश्यक लागणारी रुग्णालयीन उपकरणे साईबाबा हॉस्पिटल मार्फत बसविण्यात येतील. याकरीता अंदाजे रु. १०,००,०००/- (रु.दहा लाख मात्र) खर्च अपेक्षीत आहे. याबाबत सदरचे विभागामार्फत विहीत पध्दतीने कार्यवाही करण्यात येईल. तसेच सदरचा खर्च हॉस्पिटल कडील मशिनरी खरेदी या अंदाजपत्रकातून करण्यात येईल.

मागणीः- तरी नवीन कार्डीयाक रुग्णवाहीका करीता फोर्स मोटर्स कंपनीची Advance life support Ambulance (Type D) Bs4, Ps, A/C या प्रकारातील तसेच स्वराज्य माझदा कंपनीची Cardiac cum Trauma Care Unit , Bs4, Ps, A/C रुग्णवाहिका खरेदी कामी या दोन्ही कंपनीकडून / कंपनीचे अधिकृत पुरवठादारांकडून दरपत्रके मागविणेस व कार्डीयाक रुग्णवाहिके करीता आवश्यक उपकरणे बसविणेकरीता ई निवीदा मागविणेस तसेच रुग्णवाहिका खरेदी कामी येणारे अंदाजे रु. २५,००,०००/- (अक्षरी रुपये चोवीस लाख मात्र) व त्यातील कार्डीयाक रुग्णवाहिके करीता आवश्यक उपकरणे बसविणेस अंदाजे रु. १०,००,०००/- (अक्षरी रु. दहा लाख मात्र) असा एकूण रु ३५,००,०००/- (अक्षरी पस्तीस लाख मात्र) पर्यंतचे खर्चास मान्यता मिळणे करीता सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४६० यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयाकडे सद्यस्थितीत दोन कार्डीयाक रुग्णवाहीका कार्यरत आहे. त्यापैकी एम.एच.१७ ए.जी.१०१६ ही कार्डीयाक रुग्णवाहीका दि.१०.०८.२०१० पासून कार्यरत असून तिचा आज अखेर २,२६,७८५ कि.मी.वापर झालेला असल्याने दुरुस्ती देखभालीचा खर्च वाढत आहे. सदरची कार्डीयाक रुग्णवाहीका शासन मान्यतेने जाहीर लिलावाव्दारे विक्री करण्याची कार्यवाही करण्यात यावी, असे ठरले.**

**तसेच संस्थानचे रुग्णालयाकरीता दोन नविन कार्डीयाक रुग्णवाहीका खरेदी करणेकामी फोर्स मोटर्स कंपनीची Advance life support Ambulance (Type D) Bs4, Ps, A/C व स्वराज्य माझदा कंपनीची Cardiac cum Trauma Care Unit , Bs4, Ps, A/C या दोन्ही कंपनीकडून/कंपनीचे अधिकृत पुरवठादारांकडून दरपत्रके मागविणेस व याकामी येणाऱ्या अपेक्षीत खर्चास तसेच रुग्णवाहिकां करीता आवश्यक उपकरणे बसविणेकामी येणाऱ्या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-वाहन विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१४ श्री.चंद्रकांत माणकचंद सुराणा,कंत्राटी पध्दतीने ऑफीस असिस्टंट,माहिती केंद्र, सिकंदराबाद यांचा मुदतवाढ मिळणेबाबतचा दि.१५.०७.२०१९ रोजीचा अर्ज.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीमार्फत सिकंदराबाद येथे साईभक्तांना सोई – सुविधा उपलब्ध करुन देणेसाठी माहिती केंद्र सुरु करण्यात आलेले आहे. सदर कार्यालयात संदर्भ क्र.०१ दि.१७/१०/२०१० रोजीचे आदेशाने प्रथम ०१ वर्षासाठी श्री. चंद्रकांत माणकचंद सुराणा, यांची ऑफीस असिस्टंट म्हणून कंत्राटी पध्दतीने एकूण मानधनावर नेमणूक करण्यात आलेली आहे. त्यानंतर श्री. चंद्रकांत सुराणा यांना वेळोवेळी मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेने मुदतवाढ व मानधन वाढ देण्यात आलेली आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे दि.२२/०८/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ५१२ अन्वये श्री. सुराणा यांना जा.नं.एसएसएस/साप्रशा-आस्था/१७४१/२०१८ दि.१३/०९/२०१८ रोजीचे आदेशाने दि.२४/०८/२०१८ ते २३/०८/२०१९ अखेर ( एक वर्षाकरीता) अखेर एक वर्षाकरीता कंत्राटी पध्दतीने प्रतिमहा रु.१८,०००/- ( अक्षरी रुपये अठरा हजार मात्र) एकूण मानधनावर मुदतवाढ देणेत आलेली आहे. त्यांची एक वर्ष कालावधीची मुदत दि.२३/०८/२०१९ रोजी संपत आहे.

श्री. सुराणा यांनी दि.१५/०७/२०१९ रोजीचे अर्जाने, कंत्राटी पध्दतीने नेमणूकीचे कालावधीस मुदतवाढ व मानधन वाढ मिळणेबाबत विनंती केली आहे. श्री. सुराणा यांचे सदर अर्जावर प्र. अधिक्षक, प्रकाशने विभाग यांनी श्री. चंद्रकात सुराणा, हे संस्थानचे सिकंदराबाद येथील माहिती केंद्र येथे कंत्राटी पध्दतीने एकत्रित मानधनावर ऑफीस असिस्टंट म्हणून काम करत असून, त्यांचे काम समाधानकारक आहे. त्यांच्याबाबत कोणतीही तक्रार नाही. श्री. सुराणा यांचे विनंती अर्जाचा विचार करता, त्यांची मुदत दि.२४/०८/२०१९ अखेर संपत असलेल्या तारखेपासून पुढे एक वर्षाकरीता संस्थान नियमाप्रमाणे मुदत वाढ देणेस हरकत नाही, असा अभिप्राय दिलेला आहे.

सिकंदराबाद येथील माहिती केंद्रात साईभक्तांसाठी खालीलप्रमाणे सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

१. ऑनलाईन आरती / दर्शन बुकींग.
२. ऑनलाईन रुम बुकींग.
३. पुस्तक विक्री
४. देणगी

श्री. सुराणा यांची जा.नं.एसएसएस/साप्रशा-आस्था/१७४१/२०१८ दि.१३/०९/२०१८ रोजीचे पत्राने सिकंदराबाद येथील संस्थानचे माहिती केंद्रात कार्यालय सहाय्यक म्हणून कंत्राटी पध्दतीने लेबर ठेकेदार यांचेमार्फत नेमणूक करण्यात आलेली असून, त्यांना सध्या दरमहा रु.१८,०००/- इतके एकत्रित मानधन देण्यात येत आहे. त्यांची मुदत दि.२४/०८/२०१९ अखेर संपुष्टात येत असून, त्यांना मुदतवाढ व योग्य मानधन वाढ देणेस हरकत नाही, असे मत आहे.

तरी, संस्थानचे सिकंदराबाद येथील माहीत केंद्रात कार्यरत असलेले श्री. चंद्रकांत माणकचंद सुराणा, कार्यालय सहाय्यक, सिकंदराबाद यांचे दि.१५/०७/२०१९ रोजीचे अर्जातील विनंती व त्यावरील प्र. अधिक्षक,

प्रकाशने विभाग यांचा अभिप्राय विचारात घेता, श्री. सुराणा यांची मुदत संपत आलेल्या तारखेपासून पुढे एक वर्ष कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने मुदतवाढ व योग्य मानधनवाढ देणेबाबतचा प्रस्तावावर उचित निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४६१** **यावर सविस्तर चर्चा होऊन,संस्थानचे सिकंदराबाद येथील माहिती केंद्रात कार्यरत असलेले श्री. चंद्रकांत माणकचंद सुराणा, कार्यालय सहाय्यक, सिकंदराबाद यांना दरमहा रु.१८,०००/-मात्र एकत्रित मानधनावर कंत्राटी पध्दतीने दि.२५.०८.२०१९ पासून पुढे एक वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१५** **श्री साई दैनंदिनी-२०२० छपाईकामी सर्व निर्णय अधिकार मा.अध्यक्ष महोदय व मा.मुख्य कार्यकारी अधिकारी अथवा मा.स्थानिक उपसमिती यांना प्रदान करणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम तरतुद – श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ कलम १७ ठ मध्येखालील प्रमाणे तरतुद आहे.

"श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार –प्रसार करील आणि साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील."

मा.व्यवस्थापन समिती सभा निर्णयः-

१) मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६.०६.२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२१६.- सन-२०२० ची श्री साई दैनंदिनी व विविध प्रकारच्या दिनदर्शिका संस्थानमार्फत प्रकाशित करणेकामी विहित पध्दतीने ई-निविदा प्रक्रीया राबविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रू.४,६८,२५,०००/- मात्रचे खर्चास तसेच प्रस्तावित केलेल्या श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका नगांचा शिल्लक साठा संपत आल्यास २५ टक्के जादा छपाई मंजूर दरात करून घेण्यास व त्याकामी येणा-या अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली.

२) मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६.०७.२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२१६.

श्री साई दैनंदिनी २०२० तिरूपती देवस्थानच्या धर्तीवर (एका पानावर एकच तारीख) छपाई करणेस व त्याकामी येणा-या रक्कम रू.६७,५०,०००/- मात्रचे वाढीव खर्चास मान्यता देण्यात आली.

प्रास्तविक- साधारणतः दरवर्षीची दैनंदिनी ही श्रींचे पुण्यतिथी उत्सवाचे वेळेस प्रसिध्द करण्यात येते. चालूवर्षी लोकसभा निवडणूकीची आचारसंहिता दि.१०.०३.२०१९ ते दि.२३.०५.२०१९ या कालावधीत होती. त्यामुळे मा.व्यवस्थापन समितीच्या सभा या कालावधीत झालेल्या नाहीत. तथापि साई दैनंदिनीच्या अपेक्षित खर्चास मान्यता मिळणेकामी तयार करणेत आलेला प्रस्ताव सभा कामकाज विभागाकडे दि.०१/०५/२०१९ रोजी देण्यात आला होता. आचारसंहितेनंतरच्या मा.व्यवस्थापन समितीच्या पहिल्याच सभेत म्हणजे दि.०६.०६.२०१९ रोजी निर्णय क्र.२१६ अन्वये अंदाजे रू.४,६८,२५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्याची प्रत इकडील कार्यालयास दि.२५.०६.२०१९ रोजी प्राप्त झाली आहे.

उपरोक्त निर्णयाची प्रत मिळालेनंतर मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांनी या वर्षीची साई दैंनदिनी तिरूपती देवस्थानचे धर्तीवर(एका पानावर एकच तारीख व भक्तांना देण्यात येणा-या सेवा सुविधा मराठी व इंग्रजी अशा दोन भाषांमध्ये नमूद करून ) छपाई करणेबाबत कार्यवाही करावी असे निर्देश दिलेहोते. तथापि सन-२०१९ ची दैनंदिनी ही २५६ पानांची आहे व तिरूपती देवस्थानची डायरी ही ४३२ पानांची असल्याने वाढीव अंदाजे रक्कम रू.६७,५०,०००/- एवढा खर्च अपेक्षित असल्याने वाढीव खर्चाचा प्रस्ताव दि.२६.०७.२०१९ च्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेत ठेवण्यात आलेला होता व त्यास निर्णय क्र.४२४ अन्वये मान्यता मिळालेली आहे. त्याची प्रत इकडील कार्यालयास दि.१०.०८.२०१९ रोजी प्राप्त झाली आहे.

आता साई दैनंदिनी व दिनदर्शिका छपाईकामाचे टेंडर/ई-निविदा downloading/uploading साठी वर्तमानपत्रात शासकीय दराने दि.२३/०८/२०१९ ते दि.०९.०९.२०१९ या कालावधीत जाहीरात देण्यात आलेली आहे.

विभागाचा अभिप्रायः- श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका छपाई करून घेण्याचे अंदाजपत्रक रक्कम रू.५,३५,७५,०००/- मात्रचे असल्याने शासनाचे खरेदी नियमावलीनुसार जाहीरात प्रसिध्द झालेपासून प्रेसधारकांना ई-निविदा downloading/uploading करणेसाठी ३ आठवडे किंवा कामाचे किमान १५ दिवस जे जादा असेल ते अशी मुदत देण्यात आलेली आहे. त्यानंतर ई-निविदेचे तांत्रिक बीड उघडून पात्र/अपात्र निविदाधारक ठरविणे, वाणिज्यीक बीडमध्ये पात्र निविदाधारकांचे न्युनतम दर प्रसिध्द करणे व न्युनतम

दरधारकांस कार्यादेश देणेकामी मा.उपसमिती सभेत विषय सादर करणे तसेच उपसमितीची शिफारस मा.व्यवस्थापन समिती सभेत सादर करणे तसेच सदर दैनंदिनीत संस्थानमार्फत भाविकांना देण्यात येणा-या सुविधा व राबविण्यात येणारे उपक्रम आदींची माहिती दयावयाची असलेने सदर माहिती मराठी भाषेत तयार करून तिचे इंग्रजीत भाषांतर करणे वगैरे कार्यवाहीसाठी बराचसा वेळ लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सदर साई दैनंदिनी पुण्यतिथी उत्सव-२०१९ मध्ये प्रकाशित न होण्याचीही शक्यता आहे.

सप्टेंबर-२०१९ मध्ये विधानसभा निवडणूक आचारसंहिता लागण्याची शक्यता असल्याने मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दि.१९.०८.२०१९ रोजीचे विभाग प्रमुखांचे मिटींगमध्ये विभागामार्फत खरेदी करावयाचे साहित्यासाठी ई-निविदा प्रक्रीयेची कामे तसेच पुरवठाधारकांना दयावयाचे कार्यादेश यासंदर्भात सर्व ती पूर्तता/कार्यवाही दि.१५.०९.२०१९ अखेर पुर्ण करणेबाबत निर्देश दिलेले आहेत. त्यानंतरचे कालावधीत निविदा प्रक्रीया राबविणे तसेच पुरवठाधारकांस कार्यादेश देणे शक्य होणार नाही. त्यामुळे साई दैनंदिनी पुण्यतिथी उत्सव २०१९ मध्ये साईभक्तांना विक्रीसाठी उपलब्ध करून देणेचे दृष्टीने श्री साई दैनंदिनी-२०२० छपाईकामीचे सर्व निर्णय घेणेचे अधिकार मा.अध्यक्ष महोदय व मा.मुख्य कार्यकारी अधिकारी अथवा मा.स्थानिक उपसमिती यांना प्रदान करावेत असे नम्र मत आहे.

प्रस्तावः- उपरोक्त सर्व बाबी विचारात घेता संस्थान प्रकाशित श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका तसेच डिलक्स दिनदर्शिका-२०२० छपाई करून साईभक्तांना वेळेत उपलब्ध करून देणेसाठी छपाई कामाचे सर्व अधिकार मा.अध्यक्ष महोदय व मा.कार्यकारी अधिकारी अथवा मा.स्थानिक उपसमिती यांना प्रदान करणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.४६२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान प्रकाशित श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका तसेच डिलक्स दिनदर्शिका-२०२० छपाई करून साईभक्तांना वेळेत उपलब्ध करून देणेसाठी छपाई कामाचे सर्व अधिकार मा.अध्यक्ष महोदय व मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रदान करण्यास मान्यता देण्यात आली.** **(कार्यवाही-प्रकाशने विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१६** **श्री.कैलास नारायण घायदार यांचे वैद्यकीय बिलाच्या परताव्याबाबत.**

**प्रस्ताव-** श्री कैलास नारायण घायदार प्र.-अधिक्षक, विभाग-धर्मशाळा विभागामध्ये कार्यरत असून त्यांनी त्यांचे डोळयाचे ऑपरेशनसाठी आलेल्या खर्चाची बीले परतावा मिळणेकामी अर्ज केलेला असून त्यामध्ये त्यांनी असे नमूद केलेले आहे कि,मी संस्थानचे धर्मशाळा या विभागात प्रभारी अधिक्षकया पदावर कार्यरत आहे. मला मधूमेह आहे. मधूमेहाच्या आजारात माझे उजव्या डोळयामध्ये रक्तप्रवाह उतरल्यामुळे काहीच दिसत नव्हते संस्थानच्या

साईनाथ रुग्णालयात तपासणी केली असता मधूमेहावरील डोळयाचे रेटीना उपचार करावे लागतील व रेटीनाचे उपचार संस्थान रुग्णालयात करत नाहीत असे सांगितले. त्यामुळे मी साईसूर्या नेत्रसेवा, अहमदनगर यांचेकडे तपासणी केली असता डॉक्टरांनी मोतीबिंदू व काचबिंदू तसेच डोळयातील रक्त वाहिण्यांवर उपचार करावे लागतील शस्त्रक्रियेनंतर परत दिसू लागेल असे सांगितले.

मला समोरचे काहीच दिसत नसल्यामुळे व डोळा हा नाजूक भाग असल्याने तातडीने डोळयावर शस्त्रक्रिया केली आहे. शस्त्रक्रियेमुळे मला आता दिसू लागलेले आहे.

या अगोदर सन २०१८ मध्ये डोळयावरील उपचारासाठी व तपासणी केली असता संस्थानचे साईनाथ रुग्णालयातील डॉक्टरांनी रेटीनाचे उपचार होत नसल्याने रेफर लेटर देवून बाहेर उपचार घ्यावेत असे सांगितले होते. त्यानुसार संस्थानचे पॅनलवरील अहमदनगर तसेच जालना येथील हॉस्पिटलमध्ये उपचार घेतले होते. त्यावेळेस तेथील डॉक्टरांनी शस्त्रक्रिया न करता फक्त लेझर उपचार केले होते. तसेच किरकोळ स्वरुपाचे उपचार करुन सोडून दिले होते. डोळयावरील शस्त्रक्रिया करणे अत्यंत गरजेचे असल्यानेअहमदनगर येथील डॉ. प्रकाश कांकरीया यांचे खाजगी रुग्णालयात दि.३०/०४/२०१९ रोजी अद्ययावत शस्त्रक्रिया केली आहे व त्यासाठी मला रु.७१,०२३.०० मात्र इतका खर्चआला आहे. संस्थान रुग्णालयात रेटीनाचे उपचार करत नाहीत त्यामुळे खाजगी रुग्णालयात उपचार घ्यावे लागले तसेच जालना येथेही उपचार झाले नाहीत.

तरी मे. साहेबांस विनंती की, एक विशेष बाब म्हणून डोळयावरीलशस्त्रक्रियेसाठी आलेल्या खर्चाचे माझे वैद्यकिय बील मंजूर व्हावेअशी विनंती केलेली आहे.

श्री कैलास नारायण घायदार यांना साईनाथ हॉस्पिटलमधील डॉक्टरांनी दि.१४/०४/२०१९ रोजीचे रेफर लेटर द्वारे Retina Specialist कडे रेफर केले होते. परंतू श्री घायदर हे संस्थानचे मान्य यादीतील रुग्णालयात न

जाता त्यांनी खाजगी रुग्णालयात उपचार घेतलेले असून त्यासाठी आलेल्या खर्चाची बीले परताव्यापोटी सादर केलेली आहे.

सदर बीलाचे संस्थान वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये अवलोकन केले असता संबंधीत कर्मचा-याने संस्थानचे मान्य यादीतील रुग्णालयात उपचार न घेतलेमुळे सदर कर्मचा-याला त्यांनी सादर केलेल्या बीलाची रक्कम देता येणार नाही परंतू रक्कम एक विशेष बाब म्हणून द्यावयाचे झाल्यास त्यांनी सादर केलेल्या बीलाच्या ८०% रक्कम म्हणजेच रक्कम रु.७१०२३ पैकी ८०% रक्कम रु.५६८१८/- इतके देता येईल.

तरी याबाबत पुढील निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४६३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री कैलास नारायण घायदार, प्र.अधिक्षक,धर्मशाळा विभाग यांना विशेष बाब म्हणून वैद्यकीय बिलाचा परतावा रक्कम रु.५६,८१८/-मात्र आदा करणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१७** **श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये जुलै-२०१९ महिन्यात वैद्यकीय बिलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.९६,०७,९११/-ची नोंद घेऊन खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये गरीब व गरजु रुग्णांना वैद्यकिय बिलात सवलत देण्या संबंधित मा.व्य.स.निर्णय क्र.५१९/दि.२४.०७.२०११ संमत झाला आहे. वैद्यकिय बिलात सवलत देण्याचे अधिकार उप.वै.संचालक/वै.संचालक यांना देण्यात आलेले आहेत त्यांचे गैर हजेरीत वै.प्रशासक/जनसंपर्क अधिकारी यांना अधिकार सुपुर्त करण्यात येऊन रुग्णांना मासिक वैद्यकिय बिलात सवलत देण्यात येते.

सोशल वर्कर हे रुग्णांची आर्थिक परिस्थीती जाणून घेतात व आवश्यक कागदपत्रांसह सवलत मंजुरी करीता प्रस्तावीत करतात. अशा प्रकारे हॉस्पिटलमध्ये वैद्यकिय बिलात सवलत देण्याकरीता स्वतंत्र विभाग कार्यरत आहे. निर्णय क्र.५६४/२६.०६.२०१४ अन्वये प्रत्येक महिन्यात देण्यात आलेल्या वैद्यकिय सवलतीस मा.कार्यकारी अधिकारी यांची मान्यता घेण्यात येऊन आर्थिक वर्षाच्या शेवटी एकत्रित अहवाल मा.व्य.स.चे सभे समोर नोंद घेण्यासाठी सादर करण्यात यावा असे ठरले आहे. माहे सप्टेंबर २०१७ मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकिय सवलतीस मान्यतेचे प्रस्तावावर मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दर महा मा.व्य.समिती सभेसमोर सादर करण्यास शेरा दिला आहे. त्याप्रमाणे माहे जुलै २०१९ मध्ये श्री साईबाबा हॉस्पिटलला ओपीडी रुग्ण १६,९९५ व १,११९ आयपीडी रुग्णांपैकी ३,९५३ ओपीडी व ५९४ आयपीडी रुग्णांना वैद्यकिय बिलात एकुण रु.९०,७७,१११/- इतकी सवलत देण्यात आली व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये गरीब व गरजु रुग्णांना वैद्यकीय बिलात सवलत देण्या संबंधीत मा.व्य.स.निर्णय क्रं.३४६/दि.१८-१९.०८.२००१ संमत झाला आहे, जा.नं.एसएसएस/एसएसएच/३३१/२०१७ दि.३०.०३.२०१७ आदेश. दि.०६.०३.२०१० ची सिकल सेल आजाराच्या रुग्णांना मोफत रक्त देणेबाबत टिपणी प्रमाणे एकुण ३४५ रुग्णाना रक्कम रु.५,३०,८००/- इतकी मोफत/सवलत देण्यात आली आहे. सवलत/मोफतचे विवरण खालील प्रमाणे-

(अ) श्री साईबाबा हॉस्पिटल

| अ.नं. | रुग्णांची गटवारी | लाभार्थी संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | गरीब/दारिद्रय रेषेखालील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | १७१ | १४,९०,०३३/- | - | १४,९०,०३३/- |
| २ | आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ४७६ | ३४,१७,७७८/- | १४,९६,००६/- | १९,२१,७७२/- |
| ३ | सकृत दर्शनी गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | १३ | ९९,९८९/- | १०००/- | ९८,९८९/- |
| ४ | कुत्रा, साप, माकड चावलेले रुग्ण, साई भक्त, साध्वी कन्या कुमारी, आश्रम, डायलेसिस, हिमोफिलीया, शालेय पोशन आरोग्ययोजना इ. | ६८४ | ४१,२०,४९८/- | २४,५५,९४९/- | १६,६४,५४९/- |
| ५ | महात्मा फुले आरोग्या योजना आरोग्य योजना आयपीडी रुग्णांना दिलेली सवलत | २४६ | १,१६,३१,५७५/- | ९८,७६,०३७/- | १७,५५,५३८/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ६ | महात्मा फुले आरोग्या योजना ओपीडी रुग्णांना दिलेली सवलत | २,९५७ | २१,४६,२३०/- | - | २१,४६,२३०/- |
| | **एकुण** | **४,५४७** | **२,२९,०६,१०३/-** | **१,३८,२८,९९२/-** | **९०,७७,१११/-** |

**(ब) श्री साईनाथ रक्तपेढी**

| **अ.नं.** | **रुग्णांची गटवारी** | **लाभार्थी संख्या** | **एकुण बिल रक्कम** | **बिलापोटी मिळालेली रक्कम** | **बिलात दिलेली सवलत** |
|---|---|---|---|---|---|
| १ | थॅलॅसिमिया | ४२ | ५६,८००/- | - | ५६,८००/- |
| २ | हिमोफिलीया | ० | - | - | - |
| ३ | सिकल सेल ॲनेमीया फ्रि | ० | - | - | - |
| ४ | फ्रि डन बाय एमएडी/एमएस | १५ | १६,२००/- | - | १६,२००/- |
| ५ | व्हॉलंटरीब्लड डोनेशन फ्रि | ५० | ६,१००/- | - | ६,१००/- |
| ६ | महात्मा फुले आरोग्या योजना | १२४ | २,९२,०५०/- | - | २,९२,०५०/- |
| ७ | संस्थान एम्प्लॉयी फ्रि | ४ | ७,०००/- | - | ७,०००/- |
| ८ | कॉन्ट्रक्ट एम्प्लॉयी फ्रि | ० | - | - | - |
| ९ | श्री साईनाथ हॉस्पिटल फ्रि | ११० | १,५२,६५०/- | - | १,५२,६५०/- |
| | एकुण | ३४५ | ५,३०,८००/- | - | ५,३०,८००/- |
| | एकुण अ+ब | ४,८९२ | २,३४,३६,९०३/- | १,३८,२८,९९२/- | ९६,०७,९११/- |

प्रस्ताव - उपरोक्त प्रमाणे श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये जुलै २०१९ मध्ये वैद्यकिय बिलात सोशल वर्कर विभागामार्फत विहित पध्दतीने देण्यात आलेली सवलत रक्कम **रु.९६,०७,९११/-** ची नोंद घेऊन दिलेल्या सवलतीस मान्यतेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.४६४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये माहे जुलै-२०१९ मध्ये वैद्यकिय बिलात सोशल वर्कर विभागामार्फत विहित पध्दतीने देण्यात आलेली सवलत रक्कम रु.९६,०७,९११/-मात्रची नोंद घेण्यात येऊन त्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१८** **राष्ट्रीय रक्त धोरण राबविणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद - कलम १७ (१) व १७ (२)(ण) मानव जातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपतीमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल.

व्यवस्थापन समिती ठराव क्र.- नवीन प्रस्ताव.

प्रास्ताविक–श्री साईबाबा संस्थानमार्फत सन २००० साली श्री साईनाथ रक्तपेढीची स्थापना झाली.सदर रक्तपेढीमार्फत रक्तसंकलन, रक्तविघटन व रक्तवितरण प्रक्रिया अविरत चालु आहे.रक्तपेढीमध्ये संपुर्ण रक्ताबरोबरच रक्तघटकही तयार केले जातात.एका रक्ताच्या बाटलीपासुन दोन ते तीन रक्तघटक तयार केले जातात. यामध्ये Packed Cell Volume (PCV) Fresh Frozen Plasma (FFP) व Platelet Concentreate (Plat.Conc.)/Cryoprecipiate असे विविध घटक तयार करुन ते वेगवेगळया आजार असणा-या रुग्णांना वापरले जातात. त्यामुळे एका रक्ताच्या बाटलीपासुन कमीतकमी तीन रुग्णांना याचा फायदा होतो.

श्री साईनाथ रक्तपेढीचा रक्तसंकलन,रक्तविघटन व रक्तवितरण याचा सन २०१५ ते सन २०१८ पर्यंतचा अहवाल खालीलप्रमाणे.

| Year | Blood Collection | | Blood Issued | | | Collection (Rs) | Free/Concession (Rs) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | WHB & PCV | SDP | WHB | COMP | TOTAL | | |
| २०१५ | ९७५१ | १ | ६६३७ | ७६०७ | १४२४४ | ३८,६८,६७० | ३३,२१,९५० |
| २०१६ | ९७५६ | ४ | ६६०३ | ७५१६ | १४११९ | ४३,५२,९२० | ३३,२७,३५० |
| २०१७ | १०९७३ | २ | ७१०७ | ८९६९ | १६०७६ | २६,७७,९३० | ५३,२०,४३० |
| २०१८ | ११७८५ | २ | ७४९१ | ९६९५ | १७१८६ | २६,०१,००० | ६३,६९,०५० |

संदर्भीय राज्य रक्त संक्रमण परिषद महाराष्ट्र राज्य यांचे रा.र.सं.प./थॅल-योजना/२००१ दि.१८/०७/२००१,व संदर्भीय २ अनुसार रारसप/सिकलसेल मोफत रक्त /२००१ दि.१०/१२/२००१, रोजीच्या परिपत्रकान्वये, राज्यातील सर्व शासकीय,निमशासकीय,धर्मादाय संस्था संचलित व रेडक्रॉस सोसायटी संचलित रक्तपेढयांना थॅलेसेमिया, हिमोफेलिया व सिकलसेल रुग्णांना मोफत रक्तपुरवठा करणेविषयी बंधन घालण्यात आले आहे.

विभागाचा स्पष्ट अभिप्राय- श्री साईनाथ रुग्णालयातील श्री साईनाथ रक्तपेढीत थॅलेसेमिया, हिमोफिलीया, व सिकल सेल रुग्णांना मोफत रक्तपुरवठा करत आहोत. त्याचप्रमाणे राज्य रक्त संक्रमण परिषद,महाराष्ट्र राज्य पत्र दिनांक-१८/०६/२०१४ व त्यातील संदर्भ– सन निर्णय क्र.सार्वजनिक आरोग्य,विभाग/ २०१३/प्र.क्र.२२४/आरोग्य-५/सार्वजनिक आरोग्य विभाग मंत्रालय, मुंबई दि.१८/०६/२०१४ मुद्दा क्रं.४ अनुसार इतर रक्ताशी निगडीत आजार (ज्या आजारात रुग्णास जीवित राहण्यास वारंवार रक्त संक्रमण करावे लागते, अशा आजाराने बाधित रुग्ण) अशा आजारास सुदधा मोफत रक्तपुरवठा करणेत यावा, असे निर्देशित केले आहे. उदा. Blood Cancer (All leukemias) Aplastic Anaemia, Pancytopenia, Multiple myeloma, Agrunulocytosis.

वर उल्लेखित केलेले आजार हे सुदधा थॅलेसेमिया, व हिमोफिलीया यासारखाच रक्तदोष आजार असून अशा रुग्णांना रक्तसंक्रमणाची वारंवार आवश्यकता लागते.अशा रुग्णांना वेळोवेळी आवश्यकतेनुसार रक्तपिशवी दयावी लागते. श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये संस्थान रुग्णालयातील रुग्णासाठी एका रक्त पिशवीचा खर्च ६००/- रुपये इतका आकारला जातो. तसेच बाहेरील रुग्णालयातील रुग्णांसाठी सदर रक्तपिशवीचा खर्च हा ८००/- रुपये इतका आकारला जातो.

आजपर्यत अशा प्रकारच्या एकाही रुग्णाची कोणतीही नोंद श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये झालेली नव्हती. परंतु सदयस्थितीला Pure red cell aplasia अशा प्रकारच्या रुग्णाची नोंद रक्तपेढीमध्ये झालेली आहे. भविष्यात अशा प्रकारचे रुग्ण रक्तपेढीमध्ये येऊ शकतात. तरी अशा सर्व रुग्णांना शासन परिपत्रकाप्रमाणे गरजेप्रमाणे मोफत रक्तपुरवठा करणेस मान्यता असावी.

तरी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४६५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, राज्य रक्त संक्रमण परिषद,महाराष्ट्र राज्य पत्र दिनांक-१८/०६/२०१४ तसेच निर्णय क्र.सार्वजनिक आरोग्य,विभाग/२०१३/प्र.क्र.२२४/आरोग्य-५/सार्वजनिक आरोग्य विभाग मंत्रालय, मुंबई दि.१८/०६/२०१४ मुद्दा क्रं.४ नुसार निर्देशीत केल्याप्रमाणे रक्ताशी निगडीत आजार असलेल्या रुग्णांना संस्थानचे श्री साईनाथ रक्तपेढीमधुन गरजेप्रमाणे मोफत रक्तपुरवठा करणेस मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- श्री साईनाथ रुग्णालय)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१९** **मौजे निमगांव-को-हाळे, ता.राहाता येथिल गट नं. ८०, ८५ मधील श्री साई प्रसादालय, गट नं.१६९ मधील वर्ग ०४ कर्मचारी निवासस्थाने व गट नं. १७२ मधील साई धर्मशाळा या इमारतीचे बांधकाम नियमानुकूल करण्यासाठी जमा केलेले तडजोड शुल्क रु.४,३२,९९,६७३/- मात्र परत मिळणेकामी मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचेमार्फत शासनाकडे प्रस्ताव सादर करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधील तरतूदः-

अधिनियमातील कलम २१ पोट कलम (१) खालिलप्रमाणे आहे. "विश्वस्तव्यवस्थेचा निधी, आयकर अधिनियम, १९६१ च्या तरतुदींना अधिन राहून, समितीकडून पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनांसाठी वापरण्यात अथवा खर्च करण्यात येईल....."

छ) कोणत्याही न्यायालयाचा किंवा न्यायाधिकरणाचा किंवा कोणत्याही प्राधिकरणाचा कोणताही न्यायनिर्णय, हुकूमनामा किंवा निवाडा याची पूर्ती करण्यासाठी आवश्यक असतील अशा कोणत्याही रकमांचे प्रदान.

ज) त्या त्या वेळी अमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये विश्वस्तव्यवस्थेकडून देय असलेले कोणतेही कर, भाडे, भरपाई, आकार व इतर रकमा यांचे प्रदान....."

शासन निर्णय– मा. मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली दि.३१/०३/२०१७ रोजी झालेल्या श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव वर्षानिमित्त गठीत कृती आराखडा समितीच्या व्दीतीय बैठकीचे इतिवृत्तातील अ.नं. ०६ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

| अ.नं. | मा. मुख्यमंत्री महोदय यांचे निर्देश | निर्णयाची अंमल बजावणी करणारी यंत्रणा अधिकारी | अंमलबजावणी पूर्ण होण्यास अपेक्षित कालावधी |
|---|---|---|---|
| ०६ | मौजे निमगांव को-हाळे, ता. राहाता येथील संस्थान मालकीच्या गट नं. ८०,८५,१७२ आणि १६९ मधील श्री साई प्रसादालय, साईआश्रम ०२, स्टाफ क्वॅार्टर या इमारतींचे बांधकाम नियमानुकूल करण्यासाठी संस्थानने प्रथमतः तडजोड शुल्क भरावे. तदनंतर तडजोड शुल्क परत मिळविण्याकरीता संस्थानने विभागीय आयुक्त, नाशिक यांच्यामार्फत शासनाकडे प्रस्ताव सादर करावा व त्या प्रस्तावावर यथोचित कार्यवाही करण्यात यावी. | प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय व विभागीय आयुक्त, नाशिक व कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी | तात्काळ |

मा. व्यवस्थापन समिती निर्णय–मा. व्यवस्थापन समितीचे दि.२५/०७/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. ५४८

"यावर सविस्तर चर्चा होऊन, मौजे निमगांव-को-हाळे, ता.राहाता येथिल गट नं. ८०,८५, १६९ व १७२ मधील श्री साईप्रसादालय, वर्ग ०४ कर्मचारी निवासस्थाने व साईआश्रम धर्मशाळा या इमारतीचे बांधकाम नियमानुकूल करण्यासाठी प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे रु. ४,३२,९९,६७३/- मात्र तडजोड शुल्क तहसिलदार, राहाता यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली."

पूर्वपिठीका- श्री साईबाबा संस्थानचे उपरोक्त विषयांकित बांधकामे नियमानुकूल करणेसाठी प्रस्ताव दाखल करणेबाबत मा. तहसिलदार, राहाता यांचेकडून खालील विनंतीपत्र प्राप्त झालेले होते.

| अ.नं. | संदर्भ क्रमांक | विषय | तपशिल |
|---|---|---|---|
| ०१ | तहसिलदार, राहाता यांचे पत्र क्र.कावि.जमिन/८३५/ २०१६ दि.१५/१०/२०१६ (आवक क्र. १३४७८, दि. १९/१०/२०१६) | विना परवाना/ बांधकाम आराखडया व्यतिरिक्त करण्यात आलेली बांधकामे नियमानुकूल करणेबाबत. | महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ च्या तरतुदीप्रमाणे प्रादेशिक योजना अंमलात असलेल्या जिल्ह्यांमध्ये विना परवाना/बांधकाम आराखड्या व्यतिरिक्त करण्यात आलेली बांधकामे नियमानुकूल करणेबाबत कार्यवाही करणे आवश्यक आहे. याबाबत विहीत कालमर्यादा निश्चित केलेली असल्याने विनाविलंब प्रस्ताव दाखल करणेकामी संबंधितास आदेश होणेस विनंती. |
| ०२ | तहसिलदार, राहाता यांचे पत्र क्र. कावि. जमिन /तडजोड/६५/२०१६ दि.१५/११/२०१६ (आवक क्र.१५६७१, दि.१५/११/२०१६) | विना परवाना बांधकाम / बांधकाम आराखडया व्यतिरिक्त करण्यात आलेली बांधकामे नियमानुकूल करणेबाबत. | महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) अधिनियम २०१४, दि.२९/१२/२०१४ चे कलम ५२,५३ अन्वये प्रचलित कायदे, नियम व मार्गदर्शक सुचनांच्या अनुषंगाने जमिनीचे वापर प्रयोजनात बदल करण्याचे दृष्टीने निश्चित करणेत आलेल्या कार्यपध्दतीचा तपशिल संस्थानला कळविणेत आला आहे. |
| ०३ | तहसिलदार, राहाता यांचे पत्र क्र.कावि.जमिन/ तडजोड /६५/२०१६ दि.२१/१२/२०१६ (आवक क्र.१८४९८, दि.२१/१२/२०१६) | विना परवाना बांधकाम / बांधकाम आराखडया व्यतिरिक्त करण्यात आलेली बांधकामे नियमानुकूल करणेबाबत. | सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अहवालाप्रमाणे गट नं. ८० व ८५ मधिल बांधकामाचे मुल्यांकन रु.१२,११,३३,०००/- आहे. सदर मुल्यांकनाच्या १०% इतकी रक्कम तडजोड शुल्क (कंपाऊंडींग चार्जेस) भरुन इमारतींचे बांधकाम नियमानुकूल करणे आवश्यक असून त्याकरीता रक्कम रु.१,२१,१३,३००/-शासकीय खजान्यात भरणा करुन नियमानुकूल प्रस्ताव दाखल होणेस विनंती. |
| ०४ | तहसिलदार, राहाता यांचे पत्र क्र.कावि.जमिन/ तडजोड /५६/२०१७, दि. ०१/०२/२०१७ (आवक क्र. , दि.) | विना परवाना बांधकाम / बांधकाम आराखडया व्यतिरिक्त करण्यात आलेली बांधकामे नियमानुकूल करणेबाबत. | बांधकाम नियमानुकूल करणेकामी तडजोड शुल्क भरणेकामीचा प्रस्ताव या कार्यालयात दाखल केल्यास सदर प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांच्या मान्यतेस्तव सादर करता येईल व विलंब टाळणे शक्य होईल. याबाबत संबंधीतास आदेश होणेस विनंती आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| ०५ | तहसिलदार, राहाता यांचे पत्र क्र.कावि.जमिन/ तडजोड/८१४/२०१७ दि.०६/०७/२०१७, (आवकक्र.८७५५, दि.०६/०७/२०१७) | मौजे –निमगांव-को, ता. राहाता येथिल विना परवाना बांधकाम/ बांधकामा आराखड्या व्यतिरीक्त केलेले बांधकाम नियामानुकूल करणेबाबत | मौजे निमगांव-को, ता. राहाता येथिल विना परवाना बांधकाम/ बांधकामा आराखडयाव्यतिरिक्त केलेले बांधकाम नियमानुकूल करणेकामी एकूण रु.४,३२,९९,६७३/- तडजोड शुल्क भरणेकामी संबंधितांना आदेश होणेस विनंती. |

वर नमूद पत्रांद्वारे तहसिलदार, राहाता यांनी मौजे निमगांव – को-हाळे, ता. राहाता येथिल संस्थान मालकीच्या गट नं. १६९ मधिल स्टाफ क्वार्टर्स तसेच गट नं.८० व ८५ मधिल साई प्रसादालय या इमारतींच्या बांधकामासाठी ग्रामपंचायत निमगांव यांनी दिलेली परवानगी वैध नाही असे कळविले होते.

मौजे निमगांव को-हाळे गट नं.८०,८५ मधिल श्री साई प्रसादालय इमारतीचे बांधकामासाठी परवानगी मिळणेबाबत संस्थानकडील जा.नं.एसएसएसटी/वशी-बांधकाम/ १३३८४/२००५, दि.१८/११/२००५ चे पत्राद्वारे मा. सरपंच, ग्रामपंचायत, मौजे निमगांव- को-हाळे यांचेकडे अर्ज करणेत आला होता. त्यास अनुसरुन, ग्रामसेवक व सरपंच, ग्रामपंचायत, निमगांव- को-हाळे यांचेकडील जा.नं.४७/०६, दि.२४/०२/२००६ अन्वये बांधकाम परवाना प्राप्त झालेला आहे.सदर इमारतीचे वापर परवान्यासाठी संस्थानकडील जा.नं.एसएसएसटी/बांधकाम/ १३९५२/२००७, दि.३०/०८/२००७ चे पत्राद्वारे मा.सरपंच/ ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत, निमगांव– को-हाळे यांचेकडे अर्ज करणेत आला होता. त्यास अनुसरुन ग्रामपंचायत कार्यालय, निमगांव – को-हाळे यांचेकडील जा.नं.२१/०७, दि.०५/०९/२००७ अन्वये वापर परवाना प्राप्त झाला आहे.

तसेच मौजे निमगांव को-हाळे गट नं.१७२ मधिल साई आश्रम भाग-२ (साईधर्मशाळा) बांधकामासाठी मा. उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांचेकडील पत्र क्र. कावि-३/१७८१/२००७, दि. १०/०१/२००८ अन्वये काही अटी व शर्तीस अधिन राहून बांधकाम परवानगी प्राप्त झालेली आहे.

त्याचबरोबर मौजे निमगांव को-हाळे गट नं. १६९ पै. मधिल कर्मचारी निवासस्थाने इमारती बांधकामासाठी ग्रामपंचायत निमगांव को-हाळे यांचेकडील जावक नं. २४/०५, दि. १६/०९/२००५ अन्वये बांधकाम परवाना प्राप्त झालेला आहे.

त्यानंतर महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम आणि महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरीता दि.२९/१२/२०१४ रोजीचे अधिनियम २ (१) (क) पोट कलमे (१) आणि (२) याऐवजी, पुढील पोट कलमे दाखल करण्यात आलेली आहेत.

“...(१) ज्या गावाकरीता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ याच्या तरतूदीअन्वये प्रारुप प्रादेशिक योजना किंवा अंतिम प्रादेशिक योजना प्रसिध्द करण्यात आली असेल अशा कोणत्याही गावामध्ये कोणतीही व्यक्ती –

(एक) महाराष्ट्र जमिन महसूल संहिता. १९६६ याच्या कलम २ च्या खंड (१०) च्या अर्थांतर्गत त्या गावाच्या गावठाण क्षेत्रात विहीत रीतीने पंचायतीची पूर्वपरवानगी घेतल्याशिवायः

(दोन) त्या गावाच्या इतर क्षेत्रात जिल्हाधिका-याची किंवा ज्याच्याकडे जिल्हाधिका-याचे अधिकार सोपविण्यात आले असतील अशा तहसिलदाराच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या इतर कोणत्याही अधिका-याची पुर्वपरवानगी घेतल्याशिवाय कोणतीही इमारत उभारणार नाही किंवा पुन्हा उभारणार नाही अथवा उभारण्यास किंवा पुन्हा उभारण्यास सुरुवात करणार नाही.”

परंतु संस्थानने ग्रामपंचायत निमगांव को-हाळे यांचेकडून तत्पुर्वी सन २००६ मध्येच बांधकाम परवानगी घेतलेली आहे. तसेच वापर परवाना देखील घेतलेला आहे.त्यानंतर दि.२९/१२/२०१४ रोजी वर नमूद अधिनियम अंमलात आलेला आहे. त्यामुळे सदरहू अधिनियम वरील विषयांकित बांधकामासाठी लागू होणार नाही, असे मत आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५/०७/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्रं. ५४८ अन्वये श्री साईप्रसादालय इमारतीचे बांधकाम नियमानुकूल करणेसाठीच्या तडजोड शुल्काची फेर तपासणी करुन इकडील कार्यालयास कळविणेकामी त्यांना इकडील जा.नं.एसएसएसटी/बांधकाम-शताब्दी/१७२४/२०१७ दि.३०/०७/२०१७ रोजीचे पत्रान्वये कळविण्यात आले होते.त्यानुसार तहसिलदार, राहाता यांनी सदर विषयाबाबत झालेला पत्रव्यवहार व अनुषंगीक कायदेशीर तरतुदी यानुसार मुल्यांकनाचा तपशिल खालीलप्रमाणे कळविला होता.

| गावाचे नांव | इमारतीचे नाव | गट नं. | यापुर्वी कळविलेले मुल्यांकन (रु.) | फेरतपासणी अंती आलेले मुलयांकन (रु.) | तडजोड शुल्काची रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|---|
| निमगांव- को-हाळे | साई प्रसादालय | ८० व ८५ | १२,११,३३,००० | १२,११,३३,००० | १,२१,१३,३०० |
| निमगांव-को-हाळे | साई आश्रम भक्तनिवास | १७२ | २८,९०,१२,२०८ | २८,५३,१२,८५२ | २,८५,३१,२८५ |
| निमगांव- को-हाळे | स्टाफ कॉर्टर | १६९ | ३,६३,०१,४५७ | ३,५४,०१,१८१ | २६,५५,०८८ |
| | | | | एकूण | ४,३२,९९,६७३ |

उपरोक्त निर्णयानुसार मौजे निमगाव को-हाळे ता.राहाता येथील श्री साई प्रसादालय (गट नं.८०,८५), वर्ग -०४ कर्मचारी निवासस्थाने (गट नं.१६९) व साईआश्रम–०२ (गट नं.१७२) या संस्थान इमारतींचे बांधकाम नियमानुकूल करणेसाठी दि.०५/०९/२०१७ रोजी एकूण रु.४,३२,९९,६६७/- इतकी तडजोड शुल्क रक्कम तहसिलदार, राहाता यांचेकडे जमा करणेत आली आहे.

प्रस्ताव- वरीलपैकी साईआश्रम भाग-०२ बांधकामासाठी उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांचेकडील बांधकाम परवानगी आहे. सुधारित अधिनियम २०१४ साली अस्तित्वात येण्याअगोदर मुंबई ग्रामपंचायत अधिनियम अस्तित्वात होता. त्यातील तरतूदीनुसार संस्थानने साईप्रसादालय व कर्मचारी निवासस्थाने या इमारतींसाठी बांधकाम परवानगी सक्षम प्राधिकरण अर्थात ग्रामपंचायतकडून हस्तगत केलेली आहे. सदर परवानगी पूर्णतया वैध असून २०१४ साली सुधारित झालेल्या अधिनियमानुसार ग्रामपंचायतच्या अधिनियमात सुधारणा झालेल्या आहेत. त्या २०१४ पासून पुढे अंमलात येतील त्यामुळे तत्पुर्वीची संस्थानला सक्षम प्राधिकरणाव्दारे दिलेली बांधकाम परवानगी अवैध आहे असे होत नाही अशी संस्थानची धारणा आहे. सुधारित अधिनियमास Retrospective effect देता येत नाही ही वस्तूस्थिती असल्यामुळे संस्थानमार्फत भरलेले तडजोड शुल्क संस्थानला परत मिळणे रास्त आहे अशी धारणा आहे. तरी मा. मुख्यमंत्री महोदय यांचे अध्यक्षतेखाली गठीत श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव कृती आराखडा समितीचे दि.३१/०३/२०१७ रोजीचे बैठकीतील मा. मुख्यमंत्री महोदय यांचे निर्देशानुसार वरीलप्रमाणे शासकिय खजिन्यात भरलेली तडजोड शुल्क रक्कम रु.४,३२,९९,६७३/- संस्थानला परत मिळणेकरीता मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचेमार्फत शासनाकडे प्रस्ताव सादर करणेसाठी मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.४६६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मौजे निमगांव-को-हाळे, ता.राहाता येथिल गट नं.८०,८५ मधील श्री साई प्रसादालय, गट नं.१६९ मधील वर्ग ०४ कर्मचारी निवासस्थाने व गट नं.१७२ मधील साई धर्मशाळा या इमारतीचे बांधकाम नियमानुकूल करण्यासाठी जमा केलेले तडजोड शुल्क रु.४,३२,९९,६७३/-मात्र परत मिळणेकामी मा.विभागीय आयुक्त,नाशिक विभाग, नाशिक यांचेमार्फत शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२०** **श्री संतोष आहेरवाडी, पदाधिकारी, श्री साई मुक बधीर असोशिएशन, शिर्डी यांचे पत्रातील मागणीवर निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री संतोष आहेरवाडी, पदाधिकारी, श्री साई मुक बधीर असोशिएशन, शिर्डी यांनी त्यांचे दि. १४/०८/२०१९ रोजीचे इकडील कार्यालयास प्राप्त झालेल्या पत्रात शिर्डी येथे श्री साई मुक बधिर असोशिएशनचे स्थापनाचे नियोजन असून, सदर संस्थेव्दारे शिर्डीमधील ७५ ते १०० मुक बधीर व्यक्तीकरीता कल्याणकारी योजना राबविण्याचे नियोजनासाठी दि. २५/०८/२०१९ रोजी दुपारी १२ ते ४ वाजपर्यत संस्थानचा हॉल वापरण्यास परवानगी देण्याची विनंती केली आहे.

संदर्भीय पत्र आवक विभागाने कार्यवाहीसाठी इकडील विभागाकडे पाठविले आहे. इकडील विभागाकडे व्ही.आय.पी. कक्षालगत अति महत्वाचे व्यक्तींकरीता एक हॉल राखीव ठेवण्यात आलेला आहे. या हॉलमध्ये संस्थानअंतर्गत कार्यक्रम होत असतात. आजपावेतो कुठलाही खाजगी कार्यक्रमासाठी या हॉलचा वापर करण्यात आलेला नाही. सदर हॉल मागणी केलेल्या पत्रानुसार श्री साई मुक बधिर असोसिएशन यांना वापरण्यास दिल्यास भविष्यात अनेक संस्था संस्थानकडे या हॉलची मागणी करण्याची शक्यता नाकारता येत नाही. यासाठी सदरहु हॉल फक्त संस्थान कार्यक्रमासाठी राखीव ठेवणे उचित राहील.

तरी श्री संतोष आहेरवाडी, पदाधिकारी, श्री साई मुक बधीर असोशिएशन, शिर्डी यांनी मागणी केलेप्रमाणे दि. २५/०८/२०१९ रोजी दुपारी १२ ते ४ वाजपर्यंत श्री साई मुक बधीर असोशिएशन, शिर्डी यांचे नियोजन कार्यक्रमासाठी साई धर्मशाळा/श्री साई प्रसादालय किंवा संस्थानचे इतर परिसरातील हॉल उपलब्ध करुन दयावा किंवा कसे? याबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४६७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई मुक बधीर असोशिएशन, शिर्डी यांनी मागणी केल्याप्रमाणे श्री साई मुक बधीर असोशिएशन, शिर्डी यांचे नियोजन कार्यक्रमासाठी श्री साई प्रसादालयाचे वरील हॉल दि.२५/०८/२०१९ रोजी दुपारी १२ ते ४ या कालावधीकरीता विनामुल्य उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात आली.** **(कार्यवाही-प्रसादालय विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२१** **“साईटेक प्रकल्प-२” अंतर्गत नव्याने कार्यान्वीत करावयाच्या सर्व्हरसाठी आवश्यक असणारे युपीएस विहीत पद्धतीने ई-निविदा प्रक्रिया राबवून खरेदी करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद:- कलम १७ (१) भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे.

मा.व्यवस्थापन समितीचा ठराव क्रं.:- ०१. दि.०७.११.२००९ निर्णय क्र.७९९
०२. दि.०४.०४.२०१८ निर्णय क्र.२७५
०३. दि.०६.०६.२०१९ निर्णय क्र.१७४ (०२)

प्रास्ताविक:- मा. व्यवस्थापन समितीचे दि.०४.०४.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. २७५ अन्वये, मे.टाटा सन्स यांनी तयारी दर्शविलेप्रमाणे “साईटेक प्रकल्प-०२” अंतर्गत त्यांचेमार्फत Application बाबतची सर्व कार्यवाही तसेच Data Centre, Cloud Base Services, Hardware & Network बाबत सल्ला व व्यवस्थापनाबाबतची कार्यवाही विनामुल्य स्वरुपात करुन घेणेस मान्यता देणेत आली. तसेच “साईटेक प्रकल्प-२” अंतर्गत Hardware करीता मे.टाटा सन्स यांचे सल्ल्यानुसार, संस्थानचे प्रचलित पद्धतीनुसार खरेदी प्रक्रिया राबविणेत यावी. असे निर्देश देण्यात आलेले आहेत. सदर निर्देशान्वये मे.टाटा सन्स यांचेमार्फत मे.टाटा कन्स्लटंन्सी सर्व्हिसेस यांनी दि.०१ सप्टेंबर, २०१८ पासून प्रत्यक्ष कामकाजास सुरवात केलेली आहे.

प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत कार्यप्रणालींना वारंवार येणा-या अडचणींचे निरसण होणेकामी online.sai.org.in हि वेबसाईट क्लाऊड सर्व्हरवर होस्ट करणे व डेटा सेंटर येथे कार्यान्वीत असलेले सर्व्हर कालबाह्य झाल्याने नविन सर्व्हर खरेदी करुन कार्यान्वीत करणेबाबत मे.टिसीएस यांनी कळविलेले होते. मे.टिसीएस यांनी सुचविलेप्रमाणे विहीत पद्धतीने खरेदी प्रक्रिया राबवून online.sai.org.in हि वेबसाईट क्लाऊड सर्व्हरवर होस्ट करुन दि.०१.११.२०१८ पासून कार्यान्वीत करणेत आलेली आहे. तसेच Data Centre येथे नविन सर्व्हर खरेदी करुन कार्यान्वीत करणेकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत निम्मत्तम दरधारक निविदाधारक मे.सायबरनेट आयटी प्रा.लि., पुणे यांना मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६.०६.२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१७४ (०२) अन्वये जा.न.एसएसएसटी/वशी-आयटी/११३१/२०१९ दि.२६.०६.२०१९ नुसार पुरवठा आदेश देणेत आलेला आहे.

उपरोक्त पुरवठा आदेशाप्रमाणे मागणी केलेले सर्व्हर हे माहिती तंत्रज्ञान विभागातील Data Centre येथे कार्यान्वीत करावयाचे असल्याने मे.सायबरनेट आयटी प्रा.लि., पुणे यांनी प्रत्यक्ष शिर्डी येथे येऊन Data Centre येथील पायाभूत सुविधांची पहाणी केलेली आहे. सदर भेटीचे दरम्यान त्यांनी मे.टिसीएस यांचे तंत्रज्ञ व आयटी विभाग यांचेशी एकत्रीत चर्चा करुन नव्याने कार्यान्वीत करावयाचे सर्व्हरसाठी ०२ नग 45 KVA UPS कार्यान्वीत करणे अत्यावश्यक असल्याचे कळविलेले आहे. याबाबत त्यांनी त्यांचे दि.०२.०८.२०१९ रोजीचे ई-मेलद्वारेही कळविलेले आहे. सदर चर्चेदरम्यान मे.टिसीएस यांना सर्व तांत्रिक बाबींचा अभ्यास करुन त्यांचा अभिप्राय देणेस कळविणेत आले होते. त्यानुसार मे.टिसीएस यांनी त्यांचे दि.०३.०८.२०१९ रोजीचे ई-मेलद्वारे पुढीलप्रमाणे अभिप्राय दिलेला आहे.

सद्यस्थितीत Data Centre येथील कार्यान्वीत सर्व्हरसाठी 30 KVA क्षमतेचे 02 UPS हे Redundancy Mode (मुख्य युपीएस काही कारणास्तव बंद पडल्यास कार्यान्वीत सर्व्हर दुस-या युपीएसद्वारे कार्यान्वीत राहतात) मध्ये कार्यान्वीत आहेत. सध्या कार्यान्वीत असलेल्या सर्व्हर व अनुषंगिक साहित्यांसाठी

20 KVA इतका विजेचा वापर होतो. नविन युपीएस खरेदी करणेकामी लागणा-या कालावधीचा विचार करता, पुढीलप्रमाणे कार्यवाही करता येईल.

१. Redundancy Mode मध्ये जोडण्यात आलेले 30 KVA क्षमतेचे ०२ युपीएस स्वतंत्र करुन एकूण क्षमता 60 KVA इतकी करणे.

२. सदर 60 KVA क्षमतेमध्ये सध्या कार्यान्वीत सर्व्हर व नविन सर्व्हर यांची विभागणी करणेत यावी.

३. सुरवातीस आवश्यकतेप्रमाणेच नविन सर्व्हरची जोडणी करणे.

सद्यस्थितीत उपरोक्तप्रमाणेची कार्यवाही करुन तपासणी व कार्यप्रणाली कार्यान्वीत करणेची कार्यवाही करता येईल.

दरम्यानचे कालावधीमध्ये भविष्यातील गरजेचा विचार करता 60 KVA क्षमतेचे ०२ युपीएस खरेदी करणेकामी खरेदी प्रक्रिया राबविणेत यावी.

उपरोक्तप्रमाणे मे.सायबरनेट व मे.टिसीएस यांनी कळविलेप्रमाणे डाटा सेंटर येथे नविन सर्व्हर कार्यान्वीत करणेकामी 60 KVA क्षमतेचे ०२ युपीएस खरेदी करणे आवश्यक असल्याने सदर युपीएसचे दराबाबत या क्षेत्रातील पुरवठाधारकांकडे विचारणा केली असता त्यांनी पुढीलप्रमाणे दर कळविलेले आहेत.

| Sr. No | Description | Qty | M/s Mahavir Sys Power Pvt Ltd, Mumbai | M/s New Shradhha Enterprises, Nashik | Avge rate | Total Amount |
|---|---|---|---|---|---|---|
| 01 | 60 KVA UPS | 02 | 10,36,620/- | 9,22,310/- | 9,79,465/- | 19,58,930/- |
| | | | | | Total Amount | 19,58,930/- |

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०४.०४.२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२७५ यास अधिन राहून मे.टिसीएस यांनी कळविलेप्रमाणे 60 KVA क्षमतेचे ०२ युपीएस खरेदी करणेकामी ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये १९,५८,९३०/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेचा प्रस्ताव निर्णयार्थ मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

मागणी:- प्रास्ताविकेत नमुद केलेप्रमाणे, मे.टिसीएस यांनी कळविलेप्रमाणे "साईटेक प्रकल्प-०२" अंतर्गत Data Centre येथे नविन सर्व्हर कार्यान्वीत करणे व भविष्यातील गरज याचा विचार करता 60 KVA क्षमतेचे ०२ युपीएस खरेदी करणेकामी ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये १९,५८,९३०/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेचा प्रस्ताव निर्णयार्थ मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करणेस मान्यता असावी, हि नम्र विनंती.

संस्थान अधिनियम/ठराव या नुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:- तांत्रिक, प्रशासकीय व आर्थिक

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:- मे.टिसीएस यांनी कळविलेप्रमाणे "साईटेक प्रकल्प-०२" अंतर्गत Data Centre येथे नविन सर्व्हर कार्यान्वीत करणे व भविष्यातील गरज याचा विचार करता 60 KVA क्षमतेचे ०२ युपीएस खरेदी करणेकामी ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये १९,५८,९३०/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.४६८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, "साईटेक प्रकल्प-०२" अंतर्गत Data Centre येथे नविन सर्व्हर कार्यान्वीत करणे व भविष्यातील गरज याचा विचार करता 60 KVA क्षमतेचे ०२ युपीएस खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रुपये १९,५८,९३०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-माहिती तंत्रज्ञान विभाग)**

---

आजचे व्यवस्थापन समिती सभेमध्ये मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळी खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२२, निर्णय क्र.४६९** शिर्डी विकास योजनेतील शिर्डी-निमगांव रस्त्याचे (नगर-मनमाड रस्त्यांचे पश्चिमेकडील श्री साई प्रसादालयाकडे जाणारा रस्ता) रुंदीकरणासाठी भुसंपादन करणेकामी रक्कम रु.२.५५ कोटी संस्थानमार्फत आर्थिक अनुदान मिळणेस तत्वत: मान्यता देण्यात यावी, याबाबतचा प्रस्ताव शिर्डी नगरंपचायत, शिर्डी यांनी दिलेला आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी विकास योजनेतील शिर्डी-निमगांव रस्त्याचे (नगर-मनमाड रस्त्यांचे पश्चिमेकडील श्री साई प्रसादालयाकडे जाणारा रस्ता) रुंदीकरणासाठी शिर्डी नगरपंचायतीच्या हद्दीतील स.नं.१६४ व १६८ मधील किती क्षेत्र रस्त्यासाठी भुसंपादन करावयाचे आहे, किती व्यक्तींकडून भूसंपादन करावयाचे आहे. त्यासाठी द्यावयाच्या मोबदल्याची परिगणना कशी केली आहे. याबाबतचा सविस्तर प्रस्ताव शिर्डी नगरपंचायत यांचेकडून मागविण्यात यावा. तसेच सदर रस्ता पुर्ण झाला आहे काय? उपयोगात आला आहे काय? याबाबतची माहिती घेऊन सविस्तर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करावा, असे ठरले.

(कार्यवाही-लेखाशाखा विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२३, निर्णय क्र.४७०** आजचे सभेत शिर्डी हद्दीतील नगर-मनमाड रस्त्याचे सुशोभिकरण करणेबाबत चर्चा करणेत आली. शिर्डी शहरातून जाणाऱ्या अहमदनगर -मनमाड महामार्ग हा जागतीक बॅंकेच्या अखत्यारीत असल्याने लक्ष्मीनगर ते साई आश्रम पर्यंतचा रस्ता सुशोभिकरण करणेकामी त्यांची मान्यता घेणे आवश्यक आहे. त्यासाठी जागतीक बँकेचे प्रतिनिधी व शिर्डी नगरपंचायतीचे मुख्याधिकारी यांची संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे समवेत बैठक आयोजित करण्यात यावी. सदर रस्ता सुशोभिकरण करणेकामी शिर्डी नगरपंचायतीने जागतीक बँकेची परवानगी मिळाल्यानंतर सुशोभिकरण करणेकामी प्लॅनसह प्राथमिक आराखडे व अंदाजपत्रक शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांचेकडून मागविण्यात यावे. व त्यासह सविस्तर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करण्यात यावा, असे ठरले.

(कार्यवाही-बांधकाम विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२४, निर्णय क्र.४७१** उपविभागीय पोलीस अधिकारी,शिर्डी विभाग,शिर्डी यांनी दि.१९.०८.२०१९ रोजीचे पत्रान्वये सद्यस्थिती असलेल्या पोलीस स्टेशनचे जागेवर शिर्डी पोलीस स्टेशन प्रशासकीय कार्यालय व रहिवास इमारत प्रयोजनार्थ बांधकाम सुरु करण्यात येणार असल्याने शिर्डी शहरात येणारे भाविक, वृध्द, महिला व इतर नागरीकांचे सुरक्षेच्या दृष्टीने नविन पोलीस स्टेशन इमारतीचे बांधकाम पुर्ण होईपर्यंत ११ महिन्याचे करारावर शिर्डी बसस्टॅन्ड येथील पहिला मजला उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय,शिर्डी, शिर्डी पोलीस स्टेशन व शिर्डी शहर वाहतुक शाखा या कार्यालयांसाठी निशुल्क/ नाममात्र दराने मिळणेची विनंती केलेली आहे.

सद्यस्थितीत बांधकाम चालू असलेल्या दर्शन रांग इमारतीच्या जागेवर पुर्वी साईप्रसाद १ व २ ही निवासस्थाने साईभक्तांच्या निवासासाठी वापरात होती. परंतु या दोन्ही इमारती पाडल्याने शिर्डी बस स्टॅन्ड येथील पहिल्या मजल्यावरील दोन लहान हॉल व ७ रुम , दुसऱ्या मजल्यावरील दोन लहान हॉल व ७ रुम मध्ये रोज अंदाजे १०० ते १२० साईभक्तांची निवासव्यवस्था केली जाते. तसेच श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये ॲडमीट असलेल्या पेशंटच्या नातेवाईकांची पहिल्या मजल्यावरील ५ मोठया हॉल व दुसऱ्या मजल्यावरील ५ मोठया हॉलमध्ये रोज रात्री झोपण्यासाठी व्यवस्था केली जाते. पेशंटच्या नातेवाईकांची संख्या रोज ३०० ते ३५० असते.

उपविभागीय पोलीस अधिकारी,शिर्डी विभाग,शिर्डी यांनी मागणी केल्याप्रमाणे बस स्टॅन्ड येथील पहिला मजला त्यांना भाडेतत्वावर दिल्यास भक्तांची व पेशंटच्या नातेवाईकांची गैरसोय होणार आहे. यास्तव उपविभागीय पोलीस अधिकारी,शिर्डी विभाग,शिर्डी यांना ११ महिन्याचे करारावर जागा उपलब्ध करुन देता येईल किंवा कसे? याबाबतचा सविस्तर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.

(कार्यवाही-मालमत्ता विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.२५, निर्णय क्र.४७२ लेंडीबागेजवळील धबधब्यालगतच्या बाहेरील रिकाम्या जागेत (चप्पल स्टॅंड शेजारी) किंवा गेट नं.४ समोरील त्रिकोणातील मोकळया जागेत तसेच गेट नं.०३ समोरील मारुती मंदिराचे दक्षिण बाजुस नविन दोन ते तीन प्रसाद लाडु वितरण काऊंटर सुरु करण्यात यावे.

(कार्यवाही- लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग/बांधकाम विभाग/मेकॅनिकल विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.२६, निर्णय क्र.४७३ श्रींचे दर्शनाकरीता पायी पालखीमध्ये येणाऱ्या पदयात्रीनां लाडू प्रसाद पाकीटे हवी असल्यास सदरच्या पालखी मंडळाने शिर्डीत पालखी घेऊन येण्यापुर्वी आपल्या मंडळाचे लेटरहेडवर अध्यक्षांच्या स्वाक्षरीने लाडू व बर्फी प्रसाद विभागास कळविल्यानंतर त्यांचे मागणीनुसार जास्तीचे लाडू पाकीटे तयार करुन ठेवण्यात यावेत, सदर पाकिटे सशुल्क वाटपासाठी स्वतंत्र काऊंटरची व्यवस्था करण्यात यावी.

(कार्यवाही- लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.२७, निर्णय क्र.४७४ शेती महामंडळाची जमीन शासनाचे बाजारमुल्य दरानुसार खरेदी करणेसाठी पाठपुरावा करणेत यावा.

(कार्यवाही- मालमत्ता विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.२८, निर्णय क्र.४७५ शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी तयार केलेले प्रसाद,हार/फुले यांचे दरपत्रक तसेच पॉलीसवाले यांचेसाठी तयार करणेत आलेली नियमावली यांची अंमलबजावणी संबधीतांसाठी करणेबाबत मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत यांना अवगत करण्यात यावे.

(कार्यवाही- संरक्षण विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.२९, निर्णय क्र.४७६ मा.व्यवस्थापन समितीच्या दि.२६.०७.२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४०६ अन्वये श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शनरांग इमारतीवर वाढीव तिसऱ्या मजल्याचे बांधकाम करणेस व त्याकामी येणाऱ्या अपेक्षीत रक्कम रु.३४.०७ कोटी इतक्या अंदाजपत्रकीय खर्चास तसेच त्याव्यतिरिक्त अधिकचे FSI करीता प्रिमियम चार्जेस, विकसन शुल्क व छाननी शुल्क आदा करणेसाठी नियमानुसार येणाऱ्या अतिरिक्त खर्चास मान्यता देण्यात आली. सदरहु प्रस्ताव शासनाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात यावा, व शासनाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणे यावी, असे ठरले.

तथापी याबाबत सदर प्रकल्पाचे आर्किटेक्ट यांचे समवेत चर्चा करणेत आली. त्यावेळी सदर कामात टेरेस वॉटर प्रुफींग, ओव्हर हेड टॅंक, ममटी रुम, इलेक्ट्रीकल सबस्टेशन बिल्डींग विस्तारीकरण करणे, वॉटर सप्लाय पाईप लाईन, ड्रेनेज पाईप लाईन, एच.व्ही.ए.सी.पाईप लाईन, लिफ्ट संदर्भातील किरकोळ कामे, डी.जी.सेट, ट्रांसफार्मर, इले.केबलींग इत्यादी कामात वाढ होईल, त्यामुळे वर नमुद खर्चात रक्कम रु.६.२७ कोटी

**रुपयांनी वाढ होईल. त्यामुळे दर्शन रांग इमारतीचे तिसरा मजला बांधकामासाठी एकूण रक्कम रु.४०.३४ कोटी खर्च अपेक्षित आहे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शनरांग इमारतीवर वाढीव तिसऱ्या मजल्याचे बांधकाम करणेस व त्याकामी येणाऱ्या अपेक्षीत रक्कम रु.४०.३४ कोटी इतक्या अंदाजपत्रकीय खर्चास तसेच त्याव्यतिरिक्त अधिकचे FSI करीता प्रिमियम चार्जेस, विकसन शुल्क व छाननी शुल्क आदा करणेसाठी नियमानुसार येणाऱ्या अतिरिक्त खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३०, निर्णय क्र.४७७** **महाराष्ट्र विधानसभा निवडणूक आचारसंहिता लागु होण्याची शक्यता असल्याने संस्थानचे दैनंदिन कामकाजाकरीता सध्या राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम निविदाधारक यांचेशी चर्चा/वाटाघाटी करुन निम्नतम निविदाधारक यांना कार्यादेश देण्याचे अधिकार मा.स्थानिक उपसमितीला देण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- सर्व विभाग)**

---

वरील निर्णय क्र.४३९ ते ४७७ सर्वानुमते घेण्यात आले.
यानंतर सायंकाळी ०५.०० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| (दी.म.मुगळीकर,भा.प्र.से) | (सुरेश हावरे) |
| मुख्य कार्यकारी अधिकारी | अध्यक्ष |

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.